CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ३० । पाने १२ । किंमत रु. ६/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



## अटलजींचा दृढनिश्चय सर्वांसाठी आदर्श : पंतप्रधान

**लखनौ** : माजी पंतप्रधान दिवंगत अटल बिहारी वाजपेयींची जयंती हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून प्रेरणा घेण्याचा एक विशेष प्रसंग आहे. त्यांचे आचरण, विचार आणि अढळ दृढनिश्चय हे सर्वांसाठी आदर्श आहे, असे वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.



# मुंबईमध्ये महायुतीची सत्ता आणून अटलजींचे कार्य पुढे न्यायचे आहे

### मुख्यमंत्री फडणवीस : १६ जानेवारीला अटलजींना हिच खरी आदरांजली द्यायची

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ डिसेंबर:**


भारतमातेचे महान सुपुत्र अटलबिहारी वाजपेयी यांनी जवळपास ५ दशकांपर्यंत या देशाला दिशा देण्याचा यशस्वी प्रयत्न केला, त्यांनी ज्या प्रकारे भाजपा मुंबईमध्ये सुरुवात करून दिली होती त्याचप्रमाणे, पुन्हा एका मुंबईच्या महानगरपालिकेमध्ये महायुतीची सत्ता आणून त्यांचे कार्य पुढे न्यायचे आहे. आज त्यांना आदरांजली देतोच आहोत पण १६ जानेवारीला आपण त्यांना खरी आदरांजली द्यायची आहे., असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केले.

माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त मुंबई भाजपातर्फे चित्र-चरित्र प्रदर्शनीचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.अटलबिहारी यांच्या कार्याचा आढावा घेऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,आपली लढाई ही मुंबईकरांची लढाई आहे. पारदर्शी आणि प्रामाणिकतेतून मुंबईची महानगरपालिका चालली पाहिजे, हा संकल्प घेऊन आम्ही या निवडणूकीत उतरलो आहोत. देशामध्ये पंतप्रधान म्हणून अटलजींनी केलेलं कार्य हे अविस्मरणीय आहे. ते नेहमी म्हणायाचे रस्ते हे देशाला एकात्मतेकडे नेतात आणि त्यांच्याच संकल्पनेतून देशाला वर्ल्डक्लास हायवे पाहायला मिळाले. त्यांनी पहिल्यांदा प्रधानमंत्री ग्रामसडक योजना देशात सुरु केली. ज्यामुळे शहरे गावांशी जोडली गेली. भारत देश अणुसंपन्न करण्याचं काम त्यांनी केलं. मोठ्या राष्ट्रांकडून दबाव येत असताना अटलजी त्यांच्या निर्णायावर ठाम राहिले आणि आज भारत एक बलवान देश म्हणून उभा आहे. अणुस्फोटानंतर जगाने बहिष्कृत केलेल्या आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला ठामपणे उभं करणारे अटलजी होते. याप्रसंगी राष्ट्रीय सहसंगठन महामंत्री शिवप्रकाशजी, कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा, आ. कालिदास कोळंबकर, आ. विद्या ठाकूर, राजहंस सिंह, सरचिटणीस आचार्य पवन त्रिपाठी, श्वेता परुळकर आदी उपस्थित होते.






## विचारपुष्प



आपल्या मनात जर पुढे जायचा संकल्प असेल तसेच त्यासाठी परिश्रम करण्याची तयारी असेल तर मदत निश्चित मिळेल. आपण निवडलेला मार्ग बरोबर आहे की नाही हे वारंवार पडताळून पाहणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## बांगलादेशात पुन्हा हिंदू तरुणाची केली हत्या

**ढाका** : बांगलादेशात अल्पसंख्याक हिंदूंवरील हल्ल्यांचे सत्र सुरूच असून, दीपू चंद्र दास यांच्या निर्घृण हत्येनंतर आता आणखी एका हिंदू तरुणाची जमावाने बेदम मारहाण करून हत्या केल्याची घटना समोर आली आहे. राजधानी ढाकापासून साडेतीन तासांच्या अंतरावर असलेल्या राजबारी जिल्ह्यातील पांगशा उपजिल्हा परिसरात ही घटना घडली. अमृत मोंडल ऊर्फ सम्राट (२९) असे मृत तरुणाचे नाव आहे.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### तीन तासांत धनादेश वटण्याचा नियम पुढे ढकलला



**नवी दिल्ली :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने चेक क्लिअरन्सला गती देणारी फेज २ योजना पुढे ढकलली आहे. ही योजना ३ जानेवारी २०२६ पासून सुरू होणार होती. या टप्प्यात बँकांना चेकची इमेज मिळाल्यानंतर तीन तासांच्या आत त्याला मंजुरी द्यायची होती किंवा नाकारायचे होते. आता ती पुढील तारखेपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. रिझर्व्ह बँकेने २४ डिसेंबर रोजी परिपत्रक जारी करून सांगितले की, फेज २ पुढे ढकलण्यात आला आहे. फेज १ सुरूच राहील. चेक प्रेझेंटेशन विंडो (चेक जमा करण्याची वेळ) सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत खुली राहील. तर, बँका सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेदरम्यान चेकची पुष्टी किंवा नाकारू शकतील.

### चांदी जगातील तिसरी मौल्यवान मालमत्ता

**नवी दिल्ली :** सोने आणि एनव्हीडियानंतर चांदी आता जगातील तिसरी सर्वात मौल्यवान मालमत्ता बनली असून, चांदीने आयफोन निर्मिती करणारी कंपनी ॲपलला मागे टाकले आहे. या वर्षात चांदीच्या किमतींमध्ये सातत्याने वाढ होत आहे. फ्युचर्सने प्रति औंस ७१ डॉलरचा टप्पा ओलांडल्यामुळे, चांदीने वर्षभरात गुंतवणूकदारांना जवळपास १५० टक्के परतावा दिला आहे. मंगळवारी वॉल स्ट्रीटवरील बाजार बंद झाल्यानंतर, चांदीचे बाजार भांडवल ४.०४ ट्रिलियन डॉलर होते, जे ॲपलच्या ४.०२ ट्रिलियन डॉलरच्या मूल्यांकनापेक्षा थोडेसे जास्त आहे. चांदीचा वापर इलेक्ट्रॉनिक्स, सौर पॅनेल आणि वैद्यकीय उपकरणांसाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे औद्योगिक मागणी आणि ईटीएफमधील मजबूत गुंतवणुकीमुळे चांदीच्या किमती उच्च पातळीवर टिकून आहेत.

### रिलायन्स पुन्हा सुरू करणार रशियन तेलाची आयात

जामनगर : मुकेश अंबानींच्या रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने पुन्हा एकदा रशियाकडून कच्च्या तेलाची आयात सुरू केली आहे. ब्लूमबर्गच्या अहवालानुसार, कंपनीने गुजरातच्या जामनगर येथील आपल्या जगातील सर्वात मोठ्या रिफायनरीसाठी रशियन तेलाची खरेदी पुन्हा सुरू केली आहे. विशेष बाब म्हणजे, रिलायन्सला यासाठी अमेरिकेकडून एका महिन्याची विशेष सूट मिळाली आहे. ही बातमी अशा वेळी आली आहे, जेव्हा अलीकडेच पाश्चात्त्य देशांच्या निर्बंधांच्या भीतीमुळे रिलायन्सने रशियन तेलाची आयात मर्यादित केली होती.

### दिल्लीत पाच रुपयांत मिळेल जेवण

नवी दिल्ली : दिल्ली सरकारने माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त 'अटल कॅन्टीन' योजनेची सुरुवात केली. या योजनेअंतर्गत शहरात १०० ठिकाणी ५ रुपयांत एक प्लेट जेवण मिळेल. प्रत्येक कॅन्टीनमध्ये सुमारे ५०० लोकांना जेवण उपलब्ध करून दिले जाईल. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता म्हणाल्या, अटल कॅन्टीन दिल्लीचा आत्मा बनेल, हे असे ठिकाण असेल जिथे कोणालाही उपाशी झोपावे लागणार नाही.

### दहाव्या मजल्यावरून पडला आठव्या मजल्यावर अडकला

**सुरत :** गुजरातच्या सुरतमध्ये गुरुवारी ५७ वर्षांचा एक व्यक्ती घराच्या खिडकीतून खाली पडला. तो इमारतीच्या १०व्या मजल्यावरून घसरून ८व्या मजल्याच्या खिडकीत अडकला. सुमारे एक तास लटकल्यानंतर अग्निशमन दलाच्या पथकाने बचावकार्य करून त्याचे प्राण वाचवले. नितीनभाई आडिया सुरतमधील जहांगीराबाद परिसरातील गॅलेक्सी अपार्टमेंटच्या १०व्या मजल्यावर राहतात. सकाळी सुमारे आठ वाजता ते त्यांच्या घराच्या खिडकीजवळ झोपले होते.



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,३७,००० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. २,२०,२०० |

मो. 9373107772

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३0.४ | १५.१ |
| अमरावती | ३१.२ | १२.४ |
| भंडारा | २७.० | १०.० |
| बुलडाणा | २९.० | १३.० |
| चंद्रपूर | २९.८ | १२.४ |
| गडचिरोली | २९.२ | १०.२ |
| गोंदिया | २६.९ | १०.५ |
| नागपूर | २८.४ | ११.२ |
| वर्धा | २९.० | १०.२ |
| वाशीम | ३१.० | ११.४ |
| यवतमाळ | २९.० | १०.० |

# आज प्रत्येक महान व्यक्तीचा होतोय् सन्मान : पंतप्रधान मोदी

### लखनौमध्ये राष्ट्र प्रेरणा स्थळाचे उद्घाटन | अटल बिहारी वाजपेयींच्या जयंतीचे औचित्य

**◆ लखनौ, २५ डिसेंबर**

उत्तरप्रदेशात अशी स्थिती होती की, आधी एका कुटुंबाचे पुतळे लावले जात होते. आज प्रत्येक महान व्यक्तीला सन्मान मिळत आहे. आधी एकाच कुटुंबाचे गौरव-गान होत असे. भाजपाने प्रत्येकाच्या योगदानाचा सन्मान केला, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

पंतप्रधान मोदी यांनी गुरुवारी लखनौमध्ये राष्ट्र प्रेरणा स्थळाचे उद्घाटन केले. याप्रसंगी ते बोलत होते. पंतप्रधान म्हणाले, आज नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा दिल्लीच्या कर्तव्य पथावर आहे. अंदमानमध्ये नेताजींनी जिथे तिरंगा फडकवला, तिथे त्यांचा पुतळा आहे. डॉ. आंबेडकरांचा वारसा मिटवण्याचा प्रयत्न केला गेला, हे कोणीही विसरू शकत नाही. दिल्लीच्या शाही कुटुंबाने तो मिटवण्याचा प्रयत्न केला. येथे सपानेही असेच केले, पण भाजपाने ते मिटू दिले नाही.

हे स्थळ लखनौच्या भूमीच्या नवीन प्रेरणेची साक्ष देते. आज, अटलजींच्या जयंतीनिमित्त, सुशासन साजरे करण्याचा दिवस देखील आहे. बऱ्याच काळापासून 'गरिबी हटाव' सारख्या घोषणा सुशासन मानल्या जात होत्या, परंतु अटलजींनी खऱ्या अर्थाने सुशासन अंमलात आणले. आज ज्या डिजिटल ओळखीची खूप चर्चा आहे, ती अटलजींच्या सरकारनेच घातली होती.

प्रेरणा स्थळावर ६५-६५ फूट उंच दीनदयाल उपाध्याय, श्यामा प्रसाद मुखर्जी आणि अटल बिहारी वाजपेयी यांचे पुतळे उभारण्यात आले आहेत. प्रत्येक पुतळा ४२ टन वजनाचा आहे. प्रेरणा स्थळ ६५ एकर क्षेत्रात २३० कोटी रुपये खर्चून विकसित करण्यात आले आहे. २०२२ साली याचे बांधकाम सुरू झाले होते.



राष्ट्र प्रेरणा स्थळाचे पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी उपस्थित उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, संरक्षण मंत्री राजनाथसिंह, युपी भाजपाध्यक्ष पंकज चौधरी, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ व मान्यवर

**राष्ट प्रेरणा स्थळ स्वाभिमान, एकता, सेवाभावनेचे प्रतीक**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, राष्ट्रीय राष्ट प्रेरणा स्थळ हे भारताला स्वाभिमान, एकता आणि सेवेचा मार्ग दाखवणाऱ्या भावनेचे प्रतीक आहे. २५ डिसेंबर रोजी महाराजा बिजली पासी यांची जयंती देखील आहे.

महाराजा बिजली पासी यांनी सोडलेला शौर्य, सुशासन आणि समावेशाचा वारसा आपल्या पासी समुदायाने अभिमानाने पुढे नेला आहे. २००० मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांनी महाराजा बिजली पासी यांच्या सन्मानार्थ टपाल तिकिट जारी केले हा देखील एक योगायोग आहे. या महत्त्वपूर्ण दिवशी, मी महामना मालवीय, अटलबिहारी वाजपेयी आणि महाराजा बिजली पासी यांना आदरपूर्वक श्रद्धांजली आणि आदर अर्पण करतो. (वृत्तसंस्था)

# खलिदांचे पुत्र तारिक मायदेशी परतले

### ढाका विमानतळावर जंगी स्वागत, बीएनपी पक्षाचे शक्तिप्रदर्शन

**◆ ढाका, २५ डिसेंबर**

बांगलादेशमध्ये गेल्या काही दिवसांपासून कट्टरवाद्यांचा सुरू असलेल्या उन्माद आणि राजकीय गदारोळाच्या पृष्ठभूमीवर गुरुवारी बांगलादेशचे माजी राष्ट्रपती झियाउर रहमान आणि माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे पुत्र तारिक रहमान लंडनमध्ये निर्वासित म्हणून राहिल्यानंतर तब्बल १७ वर्षांनी मायदेशी परतले.

ढाका विमानतळावर आगमन होताच त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी बांगलादेश नॅशनल पार्टी अर्थात् बीएनपीच्या हजारो समर्थकांनी रस्त्यावर उतरत जोरदार शक्तिप्रदर्शन केले. तारिक रहमान बांगलादेशात पोहोचताच बीएनपी समर्थक आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांनी बनानी मार्गापासून ढाका विमानतळापर्यंत पायी रॅली काढली. त्यात पाच लाख कार्यकर्ते सहभागी झाले होते. अनेक वर्षे निर्वासित म्हणून आयुष्य जगल्यानंतर आता निवडणूक लढवण्यासाठी तारिक रहमान बांगलादेशमध्ये परतले आहेत. या घटनेकडे मोठी राजकीय घटना म्हणून पाहिले जात आहे. देशाचे भावी पंतप्रधान म्हणून देखील त्यांच्याकडे पाहिले जात आहे. रॅलीत कार्यकर्त्यांनी भावी पंतप्रधान असे



फलक हातात घेतले होते. विमानतळापासून काही अंतरावर रॅलीला संबोधित करताना तारिक म्हणाले, हा माझ्यासाठी अतिशय भावूक क्षण आहे. लंडन येथून परतताना मी विचारदेखील केला नव्हता की, लाखोंच्या संख्येने लोक माझ्या स्वागतासाठी एकत्र येईल. देशाला नव्या दिशेने नेण्यासाठी आपल्याला काम करायचे आहे. दरम्यान तारिक यांच्या आगमनाने सार्वत्रिक निवडणुकीत बीएनपी पक्षाला लक्षणीय यश मिळण्याची अपेक्षा आहे.

**भ्रष्टाचाराच्या आरोपानंतर सोडला होता देश**

२००८ ते २०२५ च्या अखेरपर्यंत रहमान हे स्वतःहून निर्वासित म्हणून लंडन येथे राहिले. भ्रष्टाचाराच्या आरोपानंतर त्यांच्यावर दाखल झालेल्या खटल्यानंतर त्यांनी सप्टेंबर २००८ मध्ये बांगलादेश सोडला होता. तारिक यांनी लंडनमध्ये व्हाईट अँड ब्लू कन्सल्टंट्स नावाने एक खाजगी पीआर कंपनीची सुरू केली होती. (वृत्तसंस्था)

**सुरक्षित बांगलादेश निर्माण करणार : रहमान**

तारिक रहमान यांनी संबोधित करताना म्हटले की, बांगलादेश मुस्लिम, हिंदू, बौद्ध आणि ख्रिश्चनांचा आहे. बीएनपी पक्षाचे शांतता आणि सुरक्षिततेला प्राधान्य आहे. महिला, पुरुष आणि मुलांचा बांगलादेशच्या विकासात सहभाग करून घेण्यासाठी माझ्याकडे एक योजना आहे. जनतेची साथ मिळाल्यास मी ती प्रत्यक्षात आणेल. देशात लोकशाही स्थापन करण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. आज, बीएनपीसोबत, समविचारी राजकीय पक्षांचे नेते व्यासपीठावर उपस्थित आहेत. सर्वांना देशवासीयांसोबत एकत्र काम करून शांततापूर्ण बांगलादेश निर्माण करायचा आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विद्यापीठ तंत्रज्ञान संस्थेचे उद्घाटन उद्या

**◆ गडचिरोली, २५ डिसेंबर**

गोंडवाना विद्यापीठाचे मेसर्स लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेड समवेत सार्वजनिक खाजगी-भागीदारी तत्त्वावर आयोजित 'विद्यापीठ तंत्रज्ञान संस्था' गडचिरोलीचे उद्घाटन २७ डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अडपल्ली येथे होणार आहे.

समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून वित्त, नियोजन राज्यमंत्री तथा गडचिरोलीचे सहपालकमंत्री आशिष जयस्वाल, विशेष अतिथी म्हणून गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन्, खासदार डॉ. नामदेव किरसान, प्रतिभा धानोरकर, आमदार अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, सुधीर मुनगंटीवार, विजय वडेट्टीवार, धर्मरावबाबा आत्राम, किर्तीकुमार भांगडीया, किशोर जोरगेवार, रामदास मसराम, देवराव भोंगळे, करण देवतळे, डॉ. मिलिंद नरोटे, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, पोलिस अधीक्षक नीलोत्पल, लॉयड्स



मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेडचे लेफ्टनंट कर्नल विक्रम मेहता, कार्यकारी संचालक व्यंकटेश सौंदर्यराजन, लॉर्ड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे निवासी संचालक हिंम्मत सिंग बेदला, प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे विद्यापीठ तंत्रज्ञान संस्थेत प्रवेशित विद्यार्थ्यांना विदेशी विद्यापीठात शिकण्याची संधी प्राप्त होणार आहे. ही तंत्रज्ञान संस्था गडचिरोली या मागास जिल्ह्यातील होतकरू व गुणवंत युवकांच्या तंत्र कौशल्य शिक्षणासाठी महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### अवामी लीगला निवडणूक लढण्याची परवानगी नाही

**◆ ढाका, २५ डिसेंबर**

बांगलादेशच्या अंतरिम सरकारने शेख हसीना यांचा पक्ष अवामी लीगला फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या निवडणुका लढवण्याची परवानगी दिली जाणार नसल्याचे गुरुवारी अधिकृतरित्या स्पष्ट केले आहे. बांगलादेश अंतरिम सरकारच्या मुख्य सल्लागारांचे सचिव शफीकुल आलम यांनी ढाका येथे प्रसार माध्यमांना संबोधित करताना, सांगितले की, अवामी लीगबाबत सरकारची भूमिका पूर्वी होती तीच राहणार आहे. पक्षावरील बंदी कायम राहणार असून, त्यांना निवडणूक लढवण्याची परवानगी नाही. १७ नोव्हेंबर रोजी आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने शेख हसीना आणि माजी गृहमंत्री असदुज्जमान खान कमाल यांना मृत्युदंडाची आणि दोन दिवसांपूर्वी त्यांना एका प्रकरणात १७ वर्षांची शिक्षा सुनावली आहे. देशातील परिस्थितीसाठी अवामी लीग पक्ष जबाबदार आहे. (वृत्तसंस्था)

# दोन मुलींना फासावर लटकवत विवाहितेने घेतला गळफास

### वंशाला दिवा दिला नसल्याच्या कारणाने होत होता छळ

**◆ लोणार, २५ डिसेंबर**

तालुक्यातील वढव येथील २५ वर्षीय विवाहितेने आपल्या दोन मुलींना गळफास देऊन लटकविले व स्वतः गळफास घेत आत्महत्या केली. मात्र, दैव बलवत्तर म्हणून मुली फासातून खाली पडल्याने बचावल्या. विवाहितेचा मृत्यू झाला. या संदर्भात पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, वढव येथील कांचन अमोल सोनवणे हिचे पतीसोबत वाद झाल्याच्या कारणाने रागाच्या भरात कांचनने आपली आकांक्षा (३) आणि प्रांजल (६) महिने यांना बुधवारी दुपारी घरातील अँगलला गळफासावर लावले व स्वतः गळफास घेतला.

मात्र, दोन्ही मुलींचा घरातून रडण्याचा आवाज ऐकताच गावकऱ्यांनी घराचा दरवाजा तोडला असता, त्यांना कांचनने गळफास घेतल्याचे दिसून आले, तर दोन मुली जवळपास आढळून आल्या. यात मुलींना तातडीने रुग्णालयात भरती करण्यात आले. त्यांच्या गळ्याला दोराचा वळ होता.

मृत कांचनला, तू वंशाचा दिवा दिला नाही, असे हिणवत शारीरिक व मानसिक त्रास तिचा पती देत होते. वेळोवेळी मारहाण करीत चारित्र्यावर संशय घेऊन पैशाची मागणी करीत होते. मात्र, कांचनच्या माहेरकडील गरीब असल्याने पैशाची मागणी पूर्ण करू शकले नाही. अशा प्रकारच्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून कांचनने आत्महत्या केल्याची फिर्याद नंदा भीमराव घुगे यांनी लोणार पोलिस स्टेशनला दिली आहे.


या फिर्यादीवरून अमोल विश्वनाथ सोनुने (पती), विश्वनाथ रामा सोनुने (सासरा), रामकोर सोनुने व सोनु कांगणे, शिवकन्या आघाव यांच्या विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. (तभा वृत्तसेवा)

# राम मंदिराचा दुसरा वर्धापन दिन बुधवारी

**◆ अयोध्या, २५ डिसेंबर**

२८ डिसेंबर २०२५ ते ०२ जानेवारी २०२६ पर्यंत राम मंदिराचा दुसरा वर्धापन साजरा केला जाणार आहे. २२ जानेवारी २०२४ रोजी पौष शुक्ल द्वादशी तिथीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी रामललाची प्राणप्रतिष्ठा करून राम मंदिराचे लोकार्पण केले होते. यंदा हा दिवस ३१ डिसेंबर २०२५ रोजी येत आहे. गेल्या वर्षी हा दिवस ११ जानेवारी २०२५ रोजी साजरा करण्यात आला होता. ३१ डिसेंबर २०२५ रोजी राम मंदिराचा दुसरा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे.

अयोध्येत प्राणप्रतिष्ठा द्वादशीनिमित्त राम मंदिर परिसरात पाच दिवसांचा सांस्कृतिक आणि धार्मिक विधी होणार आहे. राम मंदिराच्या बाहेर पडण्याच्या ठिकाणी म्हणजेच अंगद टीला येथे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. सामान्य रामभक्त यात सहभागी होऊ शकणार आहेत. ३१ डिसेंबर रोजी राम मंदिर आणि श्रीरामांचा दरबार नेहमीप्रमाणे रामभक्तांच्या दर्शनासाठी खुला राहील. ३१ तारखेला रामभक्तांना रामललाची विशेष पूजा आणि आरास पाहायला मिळू शकेल. राम मंदिर ट्रस्टने यासाठी व्यापक तयारी केली आहे. यावर्षी हा दिवस ३१ डिसेंबर रोजी आहे. सकाळी ९.३० वाजता विशेष पूजन होणार आहे. नेहमीप्रमाणे रामभक्तांना त्या दिवशीही दर्शन घेता येईल. भाविक अयोध्येत येऊ शकत नसतील, तर ते त्यांच्या घरातून राम मंदिरातील रामललाची पूजा पाहू शकतात. (वृत्तसंस्था)



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर गुरुवारी व्यावसायिक विमानसेवेला सुरुवात झाली. इंडिगो कंपनीचे बंगळूरूहून आलेले पहिले विमान सकाळी ८ वाजता धावपट्टीवर उतरल्यानंतर 'वॉटर कॅनन सॅल्यूट' ने त्याचे स्वागत करण्यात आले

# सेंगरच्या शिक्षेविरोधात सीबीआय सर्वोच्च न्यायालयात जाणार

### उन्नाव बलात्कार प्रकरण

**◆ नवी दिल्ली, २५ डिसेंबर**

उन्नाव बलात्कार प्रकरणातील मुख्य आरोपी भाजपाचे माजी आमदार कुलदीप सिंह सेंगर याची आजन्म कारावासाची शिक्षा रद्द करण्याच्या निर्णयाला सीबीआय सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार आहे. याबाबतची माहिती सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी दिली.

दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरूद्ध सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने सेंगरला जामीन मंजूर केला असून त्याची आजन्म कारावासाची शिक्षा देखील निलंबित करण्यात आली आहे.

याबाबत बोलताना सीबीआयचे प्रवक्त्यांनी सांगितले की, सेंगर हा अजूनही तुरुंगवासातच राहणार आहे. कारण तो अजून बलात्कार पीडित तरुणीच्या वडिलांच्या मृत्यू प्रकरणात दहा वर्षे कारावास भोगत आहे. सेंगरला २०१७ मध्ये मुलीचे अपहरण करून बलात्कार केल्याप्रकरणी दोषी ठरवण्यात आले होते. त्यावेळी ती पीडिता अल्पवयीन होती. त्यानंतर सेंगरने त्याच्या आजन्म कारावासाच्या शिक्षेविरूद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्याला सीबीआय आणि कुटुंबियांनी जोरदार विरोध केला होता.

दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सीबीआयने प्रतिक्रिया दिली की, सीबीआयने या प्रकरणात वेळेत आपले म्हणणे आणि युक्तिवाद लेखी स्वरूपात मांडले होते. सीबीआय उच्च न्यायालयाच्या निर्णयाला त्वरित आव्हान देणार आहे. (वृत्तसंस्था)

# टीजेएसबीच्या दिनदर्शिकेचे आशिष शेलारांच्या हस्ते प्रकाशन

### युनेस्कोच्या वारसास्थळ किल्ल्यांना समर्पित

**◆ ठाणे, २५ डिसेंबर**

टीजेएसबी सहकारी बँकेच्या २०२६ च्या दिनदर्शिकेचे सांस्कृतिक आणि माहिती तंत्रज्ञानमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते नुकतेच प्रकाशन करण्यात आले.



यावेळी टीजेएसबी सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल, उपाध्यक्ष सीए वैभव सिंघवी, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर, दिनदर्शिकेचे मार्गदर्शक प्रवीण जाधव आणि एजीएम स्नेहा फडके यांची उपस्थिती होती.

ज्ञान, माहिती आणि प्रबोधन यांच्या आधारे टीजेएसबी सहकारी बँक दरवर्षी आपली दिनदर्शिका प्रसिद्ध करत असते. मराठीसह इंग्रजी, कन्नड, गुजराथी आणि हिंदी अशा पाच भाषांतून टीजेएसबी बँकेची दिनदर्शिका प्रसिद्ध केली जाते. दिनदर्शिका उपयुक्त आणि संग्राह्य ठरावी याला प्राधान्य देत वर्ष दोन हजार सव्वीसची दिनदर्शिका बारा ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसास्थळ म्हणून दिलेल्या मान्यतेला समर्पित आहे. प्रत्येक किल्ल्यासोबत संक्षिप्त माहिती तसेच क्यूआर कोड देण्यात आला आहे. हा क्यूआर कोड स्कॅन केल्यावर संबंधित किल्ल्याचा इतिहास, वास्तुरचना आणि महत्त्व याबाबत सविस्तर ध्वनिमुद्रित माहिती उपलब्ध होते. ही दिनदर्शिका विचारांना चालना देणारी असून गौरवशाली इतिहासाबद्दल अभिमान निर्माण करणारी आहे. वा

# आता 'चहा'ची व्याख्या बदलली

### ग्रीन टी किंवा हर्बल आता 'चहा' नव्हे

**◆ नवी दिल्ली, २५ डिसेंबर**

केंद्र सरकारने आता चहाची व्याख्या बदलली आहे. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) स्पष्ट केले आहे की चहा ही केवळ कॅमेलिया सायनेन्सिस वनस्पतीपासून बनवलेले उत्पादन म्हणून परिभाषित केली जाऊ शकते. शिवाय, एफएसएसएआयने अन्न व्यवसाय संचालकांना कडक इशारा दिला आहे की औषधी वनस्पती किंवा फुलांपासून बनवलेल्या पेयांना चहा म्हणून लेबल करणे बेकायदेशीर आहे. त्यामुळे हर्बल किंवा ग्रीन टीला चहा म्हणून ब्रँड करणे दिशाभूल करणारी जाहिरात आणि चुकीचे 'लेबलिंग' होईल.



जारी केलेल्या निर्देशात एफएसएसएआयने म्हटले आहे की अनेक कंपन्या हर्बल टी, रुइबोस टी आणि फ्लॉवर टी सारखी उत्पादने विकत आहेत, जी प्रत्यक्षात चहा नाहीत. कारण ती चहाच्या वनस्पतीपासून बनवलेली नाहीत. नियमांनुसार, चहा हा शब्द फक्त कॅमेलिया सायनेन्सिसपासून बनवलेल्या पेयांसाठी वापरला जाऊ शकतो. यामध्ये कांगडा चहा, ग्रीन टी आणि इन्स्टंट टी सारख्या जातींचा समावेश आहे.

एफएसएएसएआयने स्पष्टपणे म्हटले आहे की कॅमेलिया सायनेन्सिस या वनस्पतीपासून न बनवलेल्या हर्बल किंवा वनस्पती-आधारित पेयांना चहा म्हणणे चुकीचे आणि दिशाभूल करणारे आहे आणि अन्न सुरक्षा तसेच मानके कायदा, २००६ चे उल्लंघन आहे. प्राधिकरणाने उत्पादन, पॅकेजिंग, विपणन, आयात, विक्री आणि ई-कॉमर्समध्ये गुंतलेल्या सर्व व्यवसायांना अशा उत्पादनांसाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे चहा हा शब्द वापरण्यापासून परावृत्त करण्याचे निर्देश दिले आहेत. एफएसएसआयने राज्य अधिकाऱ्यांना ऑनलाइन विक्रेत्यांसह सर्वांद्वारे नियमांचे काटेकोरपणे पालन सुनिश्चित करण्याचे आदेश देखील दिले आहेत. (वृत्तसंस्था)

**तर पेयांची नावे बदलावी लागतील का?**

अशा परिस्थितीत, हर्बल टी, डिटॉक्स टी आणि फ्लॉवर टी सारख्या पेयांची नावे आता बदलावी लागतील. ही पेये उपलब्ध राहतील, परंतु त्यांची विक्री आता चहा म्हणून केली जाणार नाही. एफएसएसएआयच्या या पावलामुळे चहाच्या व्याख्येबाबत बाजारपेठेत सुरू असलेल्या गोंधळाचे निराकरण होईल आणि ग्राहकांना त्यांच्या कपमधील पेय खरा चहा आहे की फक्त हर्बल इंफ्यूजन आहे हे समजण्यास मदत होईल.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/





# गुरुवार ठरला अपघातवार
# झोपेतच गाठले मृत्यूने

## कर्नाटक, तामिळनाडूत ३२ प्रवाशांचा मृत्यू

### ट्रकच्या धडकेनंतर बस जळाली; कुड्डालोरजवळ टायर फुटून बसचा अपघात

◆ **बंगळुरू/ चेन्नई, २५ डिसेंबर**
कर्नाटक आणि तामिळनाडू राज्यांत गुरुवारी पहाटे ४ ते ५ वाजताच्या सुमारास खाजगी बस आणि सरकारी बसच्या झालेल्या अपघातात ३७ प्रवाशांना झोपेतच मृत्यूने गाठले, तर ३५ जण जखमी झाले आहेत.

कर्नाटकातील चित्रदुर्ग जिल्ह्यात हिरीयुरजवळ भरधाव कंटेनर ट्रकने एका खाजगी लक्झरी स्लीपर बसला धडक दिली. यानंतर बसला आग लागली. घटनेच्या वेळी प्रवासी गाढ झोपेत असल्याने होरपळून २२ प्रवाशांचा मृत्यू झाला, तर २० जण जखमी आहे. दुसरीकडे तामिळनाडूत तरुचिरापल्लीहून चेन्नईला जाणाऱ्या राज्य परिवहनच्या बसचा टायर फुटला, आणि बस दुभाजक ओलांडून दरीत कोसळली. या घटनेत १० प्रवाशांचा मृत्यू झाला, तर १५ जण जखमी आहे. होरपळून मृत झालेल्या प्रवाशांची ओळख अद्याप पटलेली नसल्याने त्यांची डीएनए चाचणी करण्यात येणार आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की, खाजगी बस राष्ट्रीय महामार्ग ४८ वरून बंगळुरूहून शिवमोगाला जात असताना चित्रदुर्ग जिल्ह्यात हिरीयुर गावाजवळ विरुद्ध दिशेने येणारा एक अनियंत्रित ट्रक दुभाजक ओलांडून बसवर धडकला. यानंतर बसची डिझेल टँक फुटली आणि आगीचा भडका उडाला. ◂(वृत्तसंस्था)

**आपत्कालीन दरवाजा उघडलाच नाही**

आग इतकी वेगाने पसरली की, अनेक प्रवाशांना बाहेर पडण्यासाठी वेळच मिळाला नाही. यावेळी आपत्कालीन दरवाजा उघडलाच नाही, त्यामुळे प्रवासी बसमध्ये अडकले. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवत अपघातग्रस्तांना चित्रदुर्ग येथील रुग्णालयात पोहोचविले असता, डॉक्टरांनी २२ प्रवाशांना मृत घोषित केले, २० जणांवर उपचार सुरू आहे. अपघाताच्या सखोल चौकशीचे आदेश संबंधित विभागाला दिले आहे. ■

**विद्यार्थ्यांची बस थोडक्यात वाचली**

अपघात झालेल्या बसच्याच मागे विद्यार्थ्यांना घेऊन येणारी बस होती. ही बस बेंगलुरू येथून दांडेलीकडे जात होती. या बसचा चालक आदित्यने या भीषण अपघाताबद्दल सांगितले की, दुभाजक ओलांडून ट्रक बसच्या थेट डिझेल टँकला धडकला. माझी बस मागेच होती. धडक बसताच मी बसचा वेग कमी केला आणि वाहन डावीकडे वळविले. मी धाव घेत सात जणांना वाचविले. काही क्षणांनंतर अचानक स्फोट झाल्याने बसला आगीने वेढले. लोक किंचाळत होते पण कुणीही त्यांच्या मदतीला जाऊ शकले नाहीत. ■

**चालकाचे नियंत्रण सुटल्याने झाला घात**

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, तामिळनाडूच्या कुड्डालोर जिल्ह्यात तिरुचिरापल्लीहून चेन्नईला जाणाऱ्या राज्य परिवहनच्या बसचा टायर फुटला आणि त्यानंतर चालकाचे नियंत्रण सुटून बस दुभाजक ओलांडून दोन कारला धडक देत रस्त्याच्या पलीकडे दरीत कोसळली. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी अपघातग्रस्तांनी रुग्णालयात नेले असता, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी १० प्रवाशांना मृत घोषित केले, तर १५ जणांवर उपचार सुरू आहे. बसची धडक इतकी भीषण होती की दोन्ही कार पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. अपघातानंतर, राष्ट्रीय महामार्गावरील वाहनांची वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती. ■

## कार पुलावरून कोसळली, ४ महिला ठार

**५ जण गंभीर जखमी**

**सोंडो गावाजवळ भीषण अपघात**

◆ **राजुरा, २५ डिसेंबर**
नागपूरहून कागजनगरकडे जात असलेली कार राजुरा-तेलंगाना मार्गावरच्या सोंडो गावानजीक पुलाखाली कोसळली. या भीषण अपघातात माय-लेकीसह ४ महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर ५ जण गंभीर जखमी झालेत. ही घटना बुधवारी मध्यरात्रीनंतर दीडच्या सुमारास घडली.



सोंडो गावाजवळ पुलाखाली कोसळलेली कार

तेलंगणातील कागजनगर येथील निजामुद्दीन वसाहतीतील रहिवासी असलेले मृतक व जखमी हे नागपूर येथील रुग्णालयात उपचार घेत असलेल्या बहिणीची प्रकृती बघायला २३ डिसेंबरला किरायाच्या आर्टीका कारने गेले होते. बहिणीची प्रकृती बघून ते सर्व २४ डिसेंबरला नागपूर येथून कागजनगरकडे परतत असतानाच, राजुरा-तेलंगणा मार्गावर सोंडो गावाजवळील पुलावर चालकाचे वाहनावरून नियंत्रण सुटल्याने वाहन पुलावरून खाली कोसळले. यात ४ महिलांचा जागीच मृत्यू झाला. तर ५ जण गंभीर जखमी आहेत. यात एकाच घरातील माय-लेकींचा समावेश आहे. मृतांमध्ये आई सलमा बेगम, मुलगी अक्सा शबरीन या मायलेकीसह अफजल बेगम, साहिरा बेगम यांचा समावेश आहे. गंभीर जखमी असलेल्या नुसरत बेगम, नजहत बेगम, शाहीन निशा, अब्दुल अरहान व वाहन चालक अब्दुल रहमान यांना चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.

घटनेची माहिती कळताच राजुरा पोलिसांनी घटनास्थळ गाठून जखमी व मृतांना राजुरा येथील उप जिल्हा रुग्णालयात दाखल केले. काहींची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना चंद्रपूर येथील रुग्णालयात पाठविण्यात आले. वाहन चालक अब्दुल रहमान याच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास राजुरा पोलिस करीत आहे.

**राष्ट्रीय महामार्गावरील ढिसाळ नियोजनाचे बळी**

गेल्या अनेक दिवसांपासून राष्ट्रीय महामार्गाचे काम दिवस-रात्र सुरू आहे. परंतु, कंत्राटदाराच्या ढिसाळ नियोजनाने प्रवाशांचा बळी जात असल्याचा आरोप होत आहे. रस्त्यांवर योग्य दिशादर्शक फलक नाहीत, कुठेही कसेही काम सुरू असते, धुळीने तर मागचे पुढचे काहीच दिसत नाही, कित्येकदा मोठमोठ्या यंत्रामुळे वाहतूक व्यवस्थेची कोंडी होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला मर्यादा ठरविणारे फलक किंवा सीमांकन नसल्याने अनेकदा वाहतुकीचा रस्ता लक्षात येत नाही. या महामार्ग बांधकामात कोणाचे नियंत्रण आहे की नाही, असा सवाल नागरिक करीत आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

## चालत्या कारला आग लागून तीन ठार

◆ **नारनौल, २५ डिसेंबर**
हरियाणातील नारनौल येथे राष्ट्रीय महामार्गावर बुधवारी रात्री उशिरा झालेल्या भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला. राष्ट्रीय महामार्ग १५२-डी वरील टोल प्लाझापासून काही अंतरावर एका वेगवान ट्रकने एका कारला धडक दिली. यामुळे कार लगेचच पेटली. या घटनेत माजी जिल्हा परिषद सदस्य आणि वकील राजकुमार यदुवंशी, कापड व्यापारी रवी दत्त उर्फ दारा सिंग आणि टॅक्सी चालक प्रवीण उर्फ पौमी यांचा मृत्यू झाला.

अपघात रात्री सुमारे २:३० वाजता झाला. अपघातग्रस्त कार किआ क्रेनने एका कामावरून परतत होती. ट्रकच्या धडकेनंतर कार आणि ट्रक दोघांनाही आग लागली. कॅन्टर चालक स्वतःला वाचवण्यासाठी पळाला तर कारमध्ये अडकलेल्या तिघांनाही बचावासाठी वेळ मिळाला नाही. अग्निशमन दल, पोलिस आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. अग्निशामन दलाला आग आटोक्यात आणण्यात यश मिळाले. ◂(वृत्तसंस्था)

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघातात दोघांचा मृत्यू

◆ **कारंजा लाड, २५ डिसेंबर**
समृद्धी महामार्गावरील लोकेशन क्रमांक १९७ वर गुरुवारी पहाटे चारच्या दरम्यान दोन ट्रकचा भीषण अपघात झाला. दुरुस्तीसाठी रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला मागून येणाऱ्या दुसऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. यात दोघांचा मृत्यू, तर एक जण गंभीर जखमी झाला. संतोष सिंग व सुभाष वाघ अशी मृतांची नावे आहेत. अनिकेत सिंग हा गंभीर जखमी झाला. ट्रक दुरुस्तीसाठी रस्त्याच्या कडेला उभा असताना मागून येणाऱ्या दुसऱ्या ट्रकने उभ्या ट्रकला मागून धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच श्री गुरूमंदिर रुग्णवाहिकेचे रुग्णसेवक रमेश देशमुख यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.

याचवेळी शेलूबाजार १०८ समृद्धी महामार्ग येथून रुग्णवाहिका पायलट आतिश चव्हाण व डॉ. गणेश यांच्यासह घटनास्थळी दाखल झाली. जखमींना तातडीने कारंजा उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. डॉ. स्नेहलता चव्हाण यांनी दोघांना मृत घोषित



रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला मागून धडकलेला ट्रक

केले, तर एका जखमीवर प्राथमिक उपचार करण्यात आले. अपघातानंतर महामार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. ◂(तभा वृत्तसेवा)

## ख्रिसमसला नरेंद्र मोदी चर्चमध्ये उपस्थित



◆ **नवी दिल्ली, २५ डिसेंबर**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ख्रिसमसनिमित्त दिल्लीतील 'कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशन'मध्ये पोहोचले आणि तिथे प्रार्थना सभेत भाग घेतला. दिल्लीतील ऐतिहासिक कॅथेड्रल चर्च हे सर्वात जुन्या चर्चपैकी एक आहे. याठिकाणी पंतप्रधान मोदी यांनी भेट देत ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या. त्यावेळी चर्चमध्ये मोदींसह अनेक लोक उपस्थित होते. हे चर्च सेंट्रल सेक्रेटेरिएट मेट्रो स्टेशनजवळच आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या समाज माध्यम अकाऊंटवर हे फोटो पोस्ट करत म्हटले आहे की, दिल्लीतील 'कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशन'मध्ये नाताळच्या सकाळी होणाऱ्या प्रार्थनेत सहभागी झालो. ही प्रार्थना प्रेम, शांती आणि करुणेचा शाश्वत संदेशाचे प्रतिक आहे. नाताळची भावना आपल्या समाजात सुसंवाद आणि बंधुता आणेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पंतप्रधान मोदी यांच्या स्वागतासाठी येथे फार विशेष आयोजन करण्यात आले नाही.

पंतप्रधान शांततेत त्या ठिकाणी पोहचले. सर्वसामान्यासारखे ते प्रार्थनेत सहभागी झाले. त्यानंतर कॅरल्समध्येही ते हजर होते असे येथील बिशप पॉल स्वरूप यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

## भारताशी आमचे संबंध धोरणात्मक

### अमेरिकेच्या अहवालामुळे चीन संतापला, द्विपक्षीय संबंधात अडथळा आणण्याचा डाव

◆ **बीजिंग, २५ डिसेंबर**
चीन भारतासोबतच्या संबंधांना धोरणात्मक आणि दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहत असून, कोणत्याही देशाच्या भागावर ताबा मिळविण्याचा अथवा त्यासाठी संघर्ष करण्याची आमची भूमिका नसल्याचे स्पष्ट करीत चीनने अमेरिकेच्या संरक्षण विभाग पेंटागॉनने प्रसिद्ध केलेल्या अहवालावर टीका केली.

चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी पत्रपरिषदेत सांगितले की, अमेरिकेच्या अहवालात अमेरिका-भारत संबंधांना आणखी मजबूत होण्यापासून रोखण्यासाठी चीन सीमेवरील तणाव कमी करण्याचा दिखावा करीत असल्याचा उल्लेख म्हणजे द्विपक्षीय संबंधांना अडथळा आणण्याचा प्रयत्न आहे. आमच्यासाठी भारताशी असलेले संबंध धोरणात्मक आणि दीर्घकालीन दृष्टिकोनावर आधारित आहेत. सीमा प्रश्न हा चीन



आणि भारत यांच्यातील मुद्दा आहे आणि या विषयावर कोणत्याही देशाने भाष्य केल्यास आम्ही त्याचा विरोध करतो. पेटांगॉनचा अहवाल केवळ तर्कावर आधारित आहे. चीन भारताशी संवाद मजबूत करण्यास, परस्पर विश्वास वाढविण्यास आणि द्विपक्षीय संबंध स्थिर, निरोगी आणि शाश्वत विकासाकडे नेण्यास तयार आहे. आमचा हेतू कोणत्याही देशाच्या भागावर ताबा मिळविण्याचा नाही, तर शांततेने तोडगा काढून संबंध मजबूत करण्याचे आमचे धोरण आहे. अमेरिका स्वतःचे हितसंबंधाला पूरक अहवाल तयार करतो, त्यांच्याकडे पुरावे असल्यास जगासमोर आणावे. अमेरिकेचा अहवाल चीनच्या संरक्षण धोरणाचे चुकीचे प्रतिनिधित्व करतो आणि अनावश्यक अटकळ निर्माण करतो. चीनने नेहमीच शांततापूर्ण विकास आणि बचावात्मक संरक्षण धोरणावर भर दिला आहे. ◂(वृत्तसंस्था)

**कर्नाटक मंत्र्यांच्या घरात सापडली १४ कोटी रोख**

**बंगळुरू :** कर्नाटक सरकारमधील अल्पसंख्यक विभागाचे मंत्री आणि कॉंग्रेस नेते झमीर अहमद आणि त्यांच्या स्वीय सचिवांच्या घरावर गुरुवारी लोकायुक्तांनी छापा टाकला. या कारवाईत १४ कोटींची रोख जप्त करण्यात आली. स्थानिक लोकायुक्त पोलिस ठाण्यात बेहिशेबी मालमत्ता बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकायुक्त अधिकाऱ्याने सांगितले की, बंगळुरू येथील सहकार संचालनालयातून गृहनिर्माण विभागात प्रतिनियुक्तीवर असलेले आणि मंत्री झमीर अहमद यांचे स्वीय सचिव सरदार सरफराज खान आणि मंत्री अहमद यांचे घर आणि कार्यालयावर छापे टाकण्यात आले. ■

## सैनिकांना इंस्टाग्रामवर पोस्ट करण्यास बंदी

◆ **नवी दिल्ली, २५ डिसेंबर**
भारतीय लष्कराने समाज माध्यमाच्या वापराबाबत आपल्या धोरणात महत्त्वाचा बदल केला आहे. नव्या निर्देशांनुसार आता लष्करातील जवान आणि अधिकारी इंस्टाग्रामचा वापर केवळ पाहणी आणि निरीक्षणापुरताच करू शकणार आहेत. ते कोणतीही पोस्ट टाकू शकणार नाहीत, तसेच कोणत्याही पोस्टला लाईक किंवा त्यावर टिप्पणी करण्याचीही त्यांना मुभा नसेल.

सूत्रांच्या माहितीनुसार, डिजिटल व्यवहारांबाबत आधीपासून लागू असलेले इतर सर्व नियम कायम राहणार असून हे नवे आदेश सेनेच्या सर्व युनिट्स आणि विभागांना जारी करण्यात आले आहेत.

या धोरणामागील उद्देश असा आहे की जवानांनी समाज माध्यमांवर फिरणारी माहिती पाहावी, त्याबाबत जागरूक राहावे आणि खोटी, दिशाभूल करणारी किंवा संशयास्पद सामग्री ओळखता यावी. अशा प्रकारची कोणतीही पोस्ट आढळल्यास ती त्वरित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्याची मुभा जवानांना देण्यात आली आहे. यामुळे माहिती युद्ध आणि दुष्प्रचाराविरोधात सेनेची अंतर्गत सतर्कता अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे. भारतीय सेना यापूर्वीही फेसबुक, एक्स आणि इंस्टाग्रामसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सच्या वापरावर वेळोवेळी मार्गदर्शक सूचना जारी करत आली आहे.

**'हनी ट्रॅप'मध्ये अडकण्याची भीती**

सुरक्षेच्या कारणास्तव यापूर्वी या माध्यमांवर कडक निर्बंध घालण्यात आले होते. काही प्रकरणांमध्ये परदेशी गुप्तचर यंत्रणांनी रचलेल्या 'हनी ट्रॅप'मध्ये अडकून काही जवानांकडून नकळत संवेदनशील माहिती लीक झाल्याच्या घटना समोर आल्या होत्या. ◂(वृत्तसंस्था)

## विवेक भावसार यांना राईट वॉटर प्रकरणी न्यायालयाची मनाई

**भाजपा प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांना दिलासा**

**नागपूर, दि.२५ डिसेंबर-**
नागपूर स्थित राईट वॉटर सोल्युशन्स या कंपनीस भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सहमुख्य प्रवक्ते व महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांच्यामुळे लाभ झाला अशा बदनामीकारक बातम्या ताबडतोब वेबसाईटवरून हटवाव्यात आणि कंपनीविरोधात कोणताही मजकूर प्रकाशित करू नये, अशा स्वरुपाचा मनाई आदेश नागपूर मधील न्यायालयाने द न्यूज २१ डॉट कॉम आणि द राजकारण डॉट कॉम या वेबसाईटचे संपादक विवेक भावसार यांना बुधवारी दिला. यामुळे विश्वास पाठक यांना दिलासा मिळाला आहे.

मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत निवडक कंत्राटदारांना पंप बसविण्याची कामे मिळाली असून त्या कंपन्यांपैकी एक असलेल्या राईट वॉटर या कंपनीस मा. विश्वास पाठक यांच्यामुळे लाभ झाल्याचा दावा करणाऱ्या बातम्या विवेक भावसार यांनी त्यांच्या वेबसाईटवर प्रसिद्ध केल्या होत्या. ट्वीटर व व्हॉट्स ॲपवरून त्याला अधिक प्रसिद्धी दिली होती. या बदनामीच्या विरोधात राईट वॉटरने नागपूरमधील न्यायालयात धाव घेतली. विश्वास पाठक यांचे राईट वॉटरमध्ये अल्प समभाग असून त्यांचा कंपनीच्या दैनंदिन कामाशी काही संबंध नाही, राईट वॉटरला महावितरणच्या टेंडर प्रक्रियेतून स्पर्धात्मक व पारदर्शी पद्धतीने पंप बसविण्याची कामे मिळाली आहेत व महावितरणच्या संचालक मंडळात राईट वॉटरविषयी निर्णय होत असताना मा. विश्वास पाठक त्या निर्णयप्रक्रियेपासून दूर राहिले होते, असे मुद्दे राईट वॉटरने मांडले. या याचिकेची दखल घेऊन जॉईट सिव्हिल जज (सिनिअर डिव्हिजन) न्या. आनंद करभाजन यांनी विवेक भावसार यांच्याविरोधात मनाई हुकूम बजावला. न्यायालयाच्या आदेशात म्हटले आहे की, राईट वॉटरच्या संदर्भातील चार बातम्या प्रसिद्ध करण्यास, पुन्हा प्रसिद्ध करण्यास, वितरित करण्यास अथवा कोणत्याही प्रकारे उपलब्ध करण्यास मनाई करण्यात येत आहे. तसेच कंपनीच्या विरोधातील कोणत्याही स्वरुपातील बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध करण्यास तात्पुरती मनाई करण्यात येत आहे.

आदेशात असेही म्हटले आहे की, या प्रकरणी पुढील सुनावणी होईपर्यंत विवेक भावसार आणि वेबसाईटची प्रकाशक कंपनी कल्पक डिजिटल मीडिया यांनी संबंधित बातम्या आपल्या वेबसाईटवरून हटवाव्यात तसेच त्यांच्या नियंत्रणातील सर्व सोशल मीडिया हँडल्स आणि अन्य प्लॅटफफॉर्मवरूनही हटवाव्यात. या बातम्यांमधील छायाचित्रे व शब्दांकन ध्यानात घेता असे दिसते की, त्या अपुऱ्या माहितीवर आधारित आहेत तसेच त्यामध्ये राईट वॉटरने दिलेल्या नोटिशीला उत्तरही दिलेले नसून कंपनी यशस्वी झालेल्या निविदा प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्या व असंतोष निर्माण करणाऱ्या आहेत. अपुऱ्या माहितीवर आधारित या वृत्तलेखांमुळे कंपनीचा लौकिक धोक्यात आला आहे व त्यामुळे न्यायालयाचा हस्तक्षेप आवश्यक आहे. पाठक यांनी सांगितले, 'न्यायालयाने राईट वॉटर कंपनीबाबत विवेक भावसार यांना मनाई हुकूम दिल्याबद्दल आपण समाधानी आहोत. नागपूरमधील एक मराठी तरूण पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणारा उद्योग उभा करत असल्याने मी या कंपनीत अनेक वर्षांपूर्वी छोटी गुंतवणूक केली होती.

सौर कृषिपंप बसविणाऱ्या अनेक कंपन्यांपैकी केवळ राईट वॉटर कंपनीला टार्गेट करून त्या आधारे कंपनीसोबत माझीही बदनामी करण्यात येत होती. न्यायालयाच्या पुढील सुनावणीत सत्य समाजासमोर येईल व बदनामी करणाऱ्या संबंधितांना शिक्षा होईल, अशी मला आशा आहे.' विवेक भावसार यांनी राईट वॉटरविषयी बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध करण्यास न्यायालयाने मनाई केली असून संबंधित बातम्या हटविण्यास सांगितले आहे. अन्य कोणी या बातम्यांना अथवा तशा मजकुराला वृत्तपत्रे, वेबसाईट, व्हॉट्स ॲप इत्यादी सोशल मीडियावर प्रसिद्धी दिली तर त्यामुळेही न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होईल. त्यामुळे पत्रकार मित्रांनी या बाबतीत काळजी घ्यावी, असे आवाहन विश्वास पाठक यांनी केले.

## १९६५ पूर्वीच्या जुन्या हिंदी गाण्यांवर कोणाचाही मालकी हक्क नाही

**दिल्ली उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय**

◆ **नवी दिल्ली, २५ डिसेंबर**
लता मंगेशकर, मोहम्मद रफी, किशोर कुमार, आशा भोसले यांसारख्या दिग्गज गायकांनी गायलेली हिंदी चित्रपटसृष्टीची सुवर्णकाळातील गाणी आजही हॉटेल्स, कार्यक्रम, टीव्ही आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात ऐकली जातात. ही गाणी प्रामुख्याने सारेगामा इंडिया लिमिटेडशी संबंधित असली, तरी त्यांचे कॉपीराइट कायमस्वरूपी नसतात, हा महत्त्वाचा मुद्दा आता समोर आला आहे.

भारतातील कॉपीराइट कायदा १९५७ मधील कलम २७ नुसार, एखाद्या साउंड रेकॉर्डिंगचा कॉपीराइट हा त्याच्या पहिल्या प्रकाशनानंतरच्या वर्षापासून ६० वर्षे असतो. ही मुदत संपल्यानंतर ते गाणे पब्लिक डोमेनमध्ये जाते. म्हणजेच, अशा गाण्यांचा वापर करण्यासाठी कोणताही परवाना (लायसन्स) घेण्याची गरज नाही. उदाहरणार्थ, १९६५ साली प्रसिद्ध झालेल्या गाण्यांचा कॉपीराइट २०२५ च्या अखेरीस संपतो. त्यामुळे १९५० आणि १९६० च्या सुरुवातीला आलेली अनेक लोकप्रिय हिंदी गाणी लवकरच सार्वजनिक वापरासाठी खुली होत आहेत.



**न्यायालयात नेमके काय घडले?**

ऑक्टोबर २०२५ मध्ये बिग्नेट सोल्यूशन्स एलएलपी या संस्थेला एका खाजगी कार्यक्रमात काही जुनी हिंदी गाणी वाजवण्यासाठी नोव्हेक्स कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेडकडून परवाना घेण्यास सांगण्यात आले. याविरोधात बिग्नेटने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली.

१० ऑक्टोबर २०२५ रोजी न्यायालयाने स्पष्ट केले की, नोव्हेक्स ज्या गाण्यांचे मालक नाही किंवा जी गाणी आधीच पब्लिक डोमेनमध्ये आहेत, त्यांच्यावर कोणताही हक्क सांगत नाही. यानंतर बिग्नेटने फक्त १९६५ पूर्वीची गाणी वाजवण्याची हमी दिली आणि कार्यक्रम कोणत्याही अडथळ्याशिवाय पार पडला. २१ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या सुनावणीत, नोव्हेक्सने पुन्हा सांगितले की, १९६५ पूर्वी प्रकाशित झालेल्या साउंड रेकॉर्डिंगवर ते कॉपीराइटचा दावा करत नाहीत. कार्यक्रम शांततेत पार पडल्याने, न्यायालयाने ही केस निकाली काढली. या निर्णयामुळे एक महत्त्वाचा मुद्दा समोर आला आहे. दरवर्षी अनेक जुनी गाणी कॉपीराइटमुक्त होत आहेत. ◂(वृत्तसंस्था)

## नायजेरियात मशिदीत स्फोट ५ ठार, ३० जखमी

### नमाज पठणाच्या वेळी घटना

◆ **अबुजा, २५ डिसेंबर**
नायजेरियातील ईशान्येकडील मैदुगुरी शहरातील एका मशिदीत बुधवारी रात्री एका मशिदीत नमाज पठणाच्या वेळी शक्तिशाली स्फोट झाला, ज्यामध्ये पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि ३० हून अधिक जण गंभीर जखमी झाले. हा स्फोट आत्मघातकी हल्ला असल्याचे तपासात उघड झाले आहे.

बोर्नो पोलिस कमांडचे प्रवक्ते नहूम यांनी सांगितले की, प्राथमिक तपासात आत्मघातकी बॉम्बस्फोट असल्याचे समोर आले. घटनास्थळावरून स्फोट घडविणाऱ्याचे जॅकेटचे तुकडे सापडले तथापि, घटनेचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. मशिदीवरील बॉम्बस्फोटाची जबाबदारी अद्याप कोणीही स्वीकारलेली नसली तरी, अशा आत्मघाती हल्ल्यांचा संबंध अनेकदा बोको हरामशी जोडला जातो, ज्याने यापूर्वी नायजेरियात असेच अनेक हल्ले केले आहेत.

हल्ला नायजेरियाच्या सर्वात अशांत उत्तरेकडील प्रदेशात अलिकडच्या हल्ल्यांच्या मालिकेचा एक भाग आहे, जिथे स्थानिक सरकार बोको हराम आणि इस्लामिक स्टेट ऑफ वेस्ट आफ्रिका यासह अनेक दहशतवादी गटांशी लढत आहे. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## अग्रलेख...

# एक लाट 'जोडी' दोघां...

कविमनाच्या माणसांकडे द्रष्टेपण असते असे म्हणतात. म्हणूनच त्यांच्या मनात उमलणाऱ्या कविकल्पना यादेखील दृष्टान्तासारख्याच असाव्यात. कवीच्या द्रष्ट्या कल्पनांना मान्यता मिळते हे खरे असले, तरी वास्तवालाही कधी कधी अपवादाचा छेद मिळतो, हेही तितकेच खरे. किंबहुना अपवादामुळेच वास्तवाचे सिद्धान्त सिद्ध होतात, असेही म्हटले जाते. 'दोन ओंडक्यांची होते, सागरात भेट, एक लाट तोडी दोघां, पुन्हा नाही गाठ' या 'गदिमां'नी गीत रामायणात उद्धृत केलेल्या दृष्टान्तालाही अपवाद ठरावा, अशा दुर्मिळ गोष्टी कधी कधी घडतात. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेच्या गडास गेल्या सुमारे सहा दशकांच्या वाटचालीत अनेक भगदाडे पडली. अनेक बिनीच्या मोहऱ्यांनी पक्षास जय महाराष्ट्र करून आपापल्या वेगळ्या वाटा धरल्या, पण त्यांच्या मनात बाळासाहेबांविषयीच्या ममत्वाचा हळवा कोपरा कायम जिवंत राहिला. पुढे ठाकरे घराण्यातच नेतृत्वाच्या मुद्यावरून निर्माण झालेल्या वादातून खुद्द राज ठाकरे यांनीही शिवसेना सोडली तेव्हा मात्र पक्षाची खऱ्या अर्थाने शकले झाली. या वादाच्या वादळात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचे वेगळे होणे म्हणजे, सागरात भेटलेल्या दोन ओंडक्यांना लाटेच्या तडाख्याने दूर सारण्यासारखेच ठरले असले, तरी आता दोन दशकांनंतर त्यांनीच या कविकल्पनेस अपवाद असल्याचे सिद्ध करून दाखविले आहे.

उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व स्वीकारण्यास ठाम नकार देऊन राज ठाकरे यांनी २० वर्षांपूर्वी शिवसेना सोडली आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना नावाचा स्वतंत्र पक्ष स्थापन केला. 'ज्याला दीड दमडीचेही राजकारण कळत नाही, त्या लोकांसाठी आपण शिवसेनेचे नेतेपद सोडत आहोत' असे सांगून राज ठाकरे यांनी शिवसेनेला पहिले भगदाड पाडले, त्याला दोन दशके पूर्ण झाल्यानंतर एका नव्या लाटेमुळे पुन्हा त्यांना उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसोबत जाणे भाग पडले आहे. भाजपाप्रणीत महायुतीने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत महाविकास आघाडी नावाची गाजराची पुंगी पुरती मोडून टाकली. या आघाडीतील अन्य पक्षाप्रमाणेच ठाकरे यांच्या शिवसेनेसाठी पराभवाच्या लाटेचा फटका बसला. त्यामुळे अन्य पर्याय जोडण्याचे सारे मार्ग संपल्यानंतर अखेरचा पर्याय म्हणूनच ठाकरे गट आणि राज ठाकरेंचा पक्ष यांच्या युतीकडे पाहावे लागेल.

'जे शिवसेना संपविण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यांच्या पापाचा भागीदार होण्याची आपली इच्छा नाही' हे राज ठाकरे यांचे २० वर्षांपूर्वीचे विधान होते. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेस सातत्याने पराभवाच्या लाटा झेलाव्या लागत असून पक्षास लागलेली गळती व गमावत चाललेला जनाधार यांमुळे ही शिवसेना संपण्याची प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली आहे आणि या स्थितीच्या पापाचे खापर कोणाच्या माथ्यावर फोडले जात आहे, हेही स्पष्ट झाले आहे. राज ठाकरे यांनी त्या वेळी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय जाहीर करताना, या पापात सहभाग नको, अशी भावना व्यक्त केली होती. आता शिवसेना संपविण्याच्या पापात आपला सहभाग नाही हे स्पष्ट झाल्यानंतरच ते पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसोबत आले आहेत. ज्यांना दीड दमडीचेही राजकारण कळत नाही त्यांच्यासोबत काम करण्याची इच्छा नाही, असे त्यांनी पक्षत्यागाच्या वेळी सांगितले, तेव्हा त्या वक्तव्याचा रोख थेट उद्धव ठाकरे यांच्याकडेच होता. गेल्या २० वर्षांत शिवसेनेच्या राजकारणाच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. राज ठाकरे यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून शिवसेनेच्या निष्ठावंतांना मोठ्या अपेक्षा होत्या. राज ठाकरे यांच्या तुलनेत तेव्हा फारच तोकडा अनुभव असलेले उद्धव ठाकरे बाळासाहेबांचा राजकीय वारसा समर्थपणे चालवून पक्ष पुढे नेऊ शकतील, याविषयी शंका असलेले अनेक निष्ठावंत राज ठाकरे यांच्याकडे अपेक्षेने पाहात होते, पण त्यांचा अपेक्षाभंग झालाच, पण उद्धव ठाकरे यांच्याविषयीदेखील भ्रमनिरास झाला. ज्यांना दीड दमडीचाही अनुभव नाही असे राज ठाकरे म्हणत होते, त्या उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांच्या राजकारणास बगल देत महाविकास आघाडीचा झेंडा हाती घेऊन राज्याच्या मुख्यमंत्री पदापर्यंत मजल मारली आणि राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या राज ठाकरे यांचा पक्ष मात्र, सत्तेच्या गणितात सातत्याने कच्चा राहिला. या पक्षाला राजकारणातही फारसे स्थान उरले नाही. राजकारणातला अनुभव आणि डावपेचांचा नेमका वापर या दोन वेगळ्या बाबी असल्याचे उद्धव ठाकरे यांनी दाखवून दिलेच, पण आपले राजकारण बाळासाहेबांच्या राजकारणाहूनही दोन पावले पुढचे आहे, याचीही चुणूक त्यांनी दाखविली. बाळासाहेब भोळे होते, मी भोळा नाही तर धूर्त आहे, असे जाहीरपणे सांगणाऱ्या ठाकरेंनी त्याच धूर्तपणाचा वापर करून भाजपासोबतच्या युतीला दगा देऊन शरद पवारांचे बोट धरत महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री पद हस्तगत केले, तेव्हाच कदाचित राज ठाकरे यांना आपल्या २० वर्षांपूर्वीच्या त्या वक्तव्याचा पश्चात्तापही झाला असावा. तेव्हा राजकारणात दीड दमडीचाही अनुभव नसल्याची भावना व्यक्त करणाऱ्या राज ठाकरेंनी नंतरच्या दोन दशकांत उद्धव ठाकरेंच्या राजकारणातील कोलांटउड्यांसकट सारे अनुभव पाहिले आणि भाजपाच्या देशव्यापी लाटेच्या तीव्र तडाख्यामुळे ठाकरेंच्या जर्जर झालेल्या शिवसेनेसोबत पुन्हा जाण्याची वेळ राज ठाकरे यांच्यावर आली. नाराजीच्या लाटेमुळे वेगळे झालेले हे दोन भाऊ भाजपा लाटेच्या तडाख्याने एकत्र आले आणि लाटेच्या तडाख्यात वेगळे झालेले ओंडके पुन्हा भेटत नाहीत या कविकल्पनेस त्यांच्या राजकारणाने छेद दिला.

राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना गेल्या दोन दशकांत महाराष्ट्राच्या राजकारणात आपला ठसा उमटवू शकली नाहीच; उलट या पक्षाचे अस्तित्व वर्षागणीक अधिकाधिक क्षीणच होत गेले. नेतृत्वाचा एकखांबी तंबू असलेल्या कोणत्याही पक्षाची हीच अवस्था होत असते. त्यातही घराण्याच्या पुण्याईची शिदोरी घेऊन राजकारण करणाऱ्यांना ती पुण्याई असेपर्यंतच स्थान टिकविणे शक्य होत असते. ती उतरणीस लागली की, त्यांचे राजकारणही उतरणीस लागते. उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी बाळासाहेबांची पुण्याई होती आणि राज ठाकरेंच्या राजकारणाही बाळासाहेबांच्या पठडीचे संस्कार होते. ही पुण्याई व संस्काराचा वारसा टिकविण्यात हे दोघेही नेते पुरेसे यशस्वी ठरले नाहीत, त्यामुळे बाळासाहेबांच्या राजकारणाचा प्रभावाने भारावलेला मतदारही या दोघांपासून दुरावत गेला. बाळासाहेबांनी कधीच मान्य केल्या नसत्या अशा अनेक तडजोडी उद्धव ठाकरे यांना अस्तित्व टिकविण्याच्या धडपडीत कराव्या लागल्या आणि त्यामध्ये त्यांच्या पक्षाची प्रतिमादेखील पणास लागली. आता राज ठाकरे यांची मनसे आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेस महाराष्ट्राच्या राजकारणातून पुरती गळती लागल्याचे स्पष्ट झाल्याने, अस्तित्वाच्या लढाईचा अखेरचा मार्ग म्हणून या दोघांना अपरिहार्य परिस्थितीने एकत्र आणले आहे आणि आपल्या अस्तित्वाच्या लढाईला मराठी माणसाच्या अस्तित्वाच्या लढाईचा मुलामा देऊन जुन्याच भावनिक मुद्यानिशी आपले उरलेसुरले अस्तित्व जपण्याची धडपड सुरू केली आहे. राज आणि उद्धव यांचे मनोमीलन हा प्रीतिसंगम आहे, असा दावा संजय राऊत यांनी केला होता. त्यावर उत्तर देताना, हा प्रीतिसंगम नसून भीतीसंगम आहे, अशी थेट खिल्ली भाजपाने उडविली होती. मराठी माणसाच्या अस्तित्वाची आणि मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याची भीती दाखविण्याचा गुळगुळीत झालेला मुद्दा हेच या उभयतांच्या राजकारणाचे भावी भांडवल असणार हे सिद्ध झाले आहे. मुंबईसारख्या महत्त्वाच्या महापालिकेवर सत्ता होती, तेव्हा मराठी माणसाचे मुंबईतून नामशेष होणारे अस्तित्व जपण्यासाठी उद्धव ठाकरेंच्या पक्षाने काय केले असा सवाल मराठी माणूस आता त्यांना विचारणारच आहे. त्याचे उत्तर देऊन मगच उद्धव आणि राज यांना आपल्या मनोमीलनाच्या हेतूमागील पारदर्शकता सिद्ध करावी लागेल. अन्यथा, आपले राजकारणातून संपत चाललेले अस्तित्व टिकविण्याच्या धडपडीपायी अपरिहार्यतेने एकत्र आलेले कुटुंब एवढाच त्यांच्या युतीचा निष्कर्ष असेल. राज आणि उद्धव यांनाही त्याची जाणीव नसेल असे नाही, पण अन्य कोणताच मार्ग शिल्लक नसेल, तर भाजप लाटेच्या तडाख्यामुळे एकत्र येणाऱ्या या दोघांना आता एकमेकांसोबत राहणे हाच पर्याय शिल्लक राहिलेला असेल.

## विशेष

# 'स्थानिक' निवडणुकांचा सांगावा

भागा वरखडे

राज्यात महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुढील महिन्यात होणार असताना नगरपालिका आणि नगर पंचायतीच्या निवडणुकीच्या निकालाने पुढे काय होणार, याचे जणू संकेत दिले आहेत. राज्यात ज्यांची सत्ता, त्यांच्याच हाती स्थानिक स्वराज्य संस्था असे गणित आता बऱ्यापैकी रुजवण्यात राजकीय पक्ष यशस्वी झाले आहेत. केरळचा अपवाद वगळता उर्वरित राज्यांमध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतून हे सिद्ध झाले आहे. केंद्र आणि राज्याची सत्ता असणाऱ्यांकडे सत्तेची धुरा सोपविल्यास विकास कामांना पैसे कमी पडत नाही, अडवणूक केली जात नाही, हे मतदारांच्या गळी उतरवण्यात राजकीय पक्षांना यश आले आहे. मतदारांमध्ये रुजलेली ही मानसिकता दूर करण्यात विरोधकांना अपयश आले आहे. नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत होण्याची अपेक्षा केली जात असताना प्रत्यक्षात बहुतांश ठिकाणी शिवसेना (शिंदे), भाजपा आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्यात लढत होऊन संघर्ष झडला. एकत्र येऊन सत्तेचा फायदा घ्यायचा आणि परस्परांवर टीका करून, परस्परांविरोधात लढून विरोधकांचेही राजकीय अवकाश व्यापायाचे, ही भाजपाची रणनीती आता त्यांच्या मित्रपक्षांनीही अंगीकारली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आपल्या पक्षांसाठी संपूर्ण राज्य पिंजून काढले. विरोधक मात्र घरातून बाहेरच पडले नाहीत.

भारतीय जनता पक्ष हा फक्त शहरी लोकांचा पक्ष आहे, हा समज या निवडणुकीच्या निकालाने पुन्हा एकदा खोडून काढला. निमशहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातही या पक्षाची पाळेमुळे रुजली आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस हे ग्रामीण भागातील पक्ष. आता ग्रामीण भागातूनही त्यांची सद्दी संपवण्यात भाजपला यश आले आहे. महायुतीला मिळालेले यश सरकारमधील तीनही पक्षांच्या प्रमुखांचे आहे. विधानसभेतील निकालाप्रमाणेच एकूण निकालाचे सूत्र आहे. विधानसभा निकालांचे प्रतिबिंब असलेल्या नगरपालिका निवडणुकांच्या निकालात भाजपा राज्यात पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला खरा; पण त्यातून मिळालेला धडाही महत्त्वाचा आहे. अनेक नगरपालिकांमध्ये महायुतीतील भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या तीन पक्षांमध्ये लढत झाली आहे. त्यामुळे हा निकाल भाजपा किंवा महायुतीतील पक्ष स्वबळावर लढल्यास निकाल कसे असतील, याची चुणूक किंवा धडा दाखवणाराही आहे. त्यातूनच भाजपाला मित्रपक्षांची गरज आहे, हे अधोरेखित झाल्याचे मानले जात आहे. निवडणुकीत इतिहास घडला, असे फडणवीस म्हणत असताना सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केलेल्या भावना पक्षाला विचारात घ्याव्या लागतील. भाजपाने नागपूर, गडचिरोली जिल्ह्यात चांगली कामगिरी केली; मात्र चंद्रपूर जिल्ह्यात काँग्रेसने भाजपला धक्का देत बाजी मारली. ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी या जिल्ह्यांमध्ये चांगली मेहनत घेतली. रायगड जिल्ह्यात शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांचे वर्चस्व दिसून आले. मुक्ताईनगरमध्ये मंत्री गिरीश महाजन यांना फटका बसला. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांना रायगडने धडा शिकवला. राज्यभरात काही ठिकाणी महायुती एकत्र लढली, स्थानिक आघाड्या केल्या तर अनेक ठिकाणी महायुतीतील भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यात लढत होती. महायुतीतील तीनही पक्षांनी ७५ टक्के जागा जिंकल्या. भाजपाने पहिला क्रमांक मिळविला असला, तरी सत्तेत असताना शिंदे आणि अजित पवार गटाचीही ताकद वाढली आहे. भाजपा २०२९ मध्ये स्वबळावर विधानसभा निवडणुका लढवेल, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मध्यंतरी कार्यकर्त्यांच्या बैठकीत सांगितले होते. नगरपालिकांचा निकाल अतिशय मर्यादित स्वरुपाचा आणि स्थानिक राजकारणावर आधारित असला, तरी भाजपाने पुढील काळात स्वबळाचा नारा दिला, तरी त्याला मित्रपक्षांच्या कुबड्या घ्याव्याच लागतील, असा या निकालाचा अर्थ आहे.

ताज्या निवडणुकीप्रसंगी संसाधने, पैसा, यंत्रणा आणि कार्यकर्ते अशा सर्वच बाबतीत महाविकास आघाडीपेक्षा महायुती सरस होती. महाविकास आघाडीमध्ये संवादाचा अभाव होता. राज्यात काही ठिकाणी शिंदेसेना-ठाकरे सेना, काही ठिकाणी शिंदेसेना-काँग्रेस, काही ठिकाणी भाजपाविरोधी सर्व अशा आघाड्या झाल्या. त्यातही महायुतीतील तीन पक्षांचाच फायदा झाल्याचे आकडेवारी सांगते. राज्याच्या कोकण वगळता अन्य सर्वच विभागात भाजपाने जास्त जागा मिळवल्या. शिंदे यांच्या शिवसेनेचा स्ट्राईक रेट जास्त आहे. शिवसेना आता फक्त ठाण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर चांद्यापासून बांद्यापर्यंत आणि धुळ्यापासून कोल्हापूरपर्यंत पसरली असल्याचे चित्र दिसले. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे महायुतीतील तीनही पक्ष कमी-अधिक फरकाने राज्यभरात पोचले असून त्यांचे नगराध्यक्ष आणि नगरसेवक निवडून आल्याचे दिसते. नगरपालिका आणि नगर पंचायत निवडणुकीच्या निकालाने महायुतीच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे, तर महाविकास आघाडीला मानसिकता बदलावी लागणार आहे.

राज्यात १५ जानेवारी रोजी २९ महापालिकांच्या आणि त्यानंतर जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात १५ जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. त्यावर या निकालाचा परिणाम संभवतो. १५ जानेवारी रोजी होणाऱ्या बृहन्मुंबई महानगर पालिका आणि इतर २८ महानगर पालिका निवडणुकांसाठी हे निकाल जणू उपांत्य फेरी होते. महाराष्ट्रातील नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीत भाजपाला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. राज्य पातळीवर युती असूनही स्थानिक पातळीवर भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेना अनेक जिल्ह्यांमध्ये एकमेकांविरुद्ध लढल्या. सिंधुदुर्ग, सातारा, धाराशिव, पुणे, नाशिक, पालघर आणि ठाणे यासारख्या महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांनी एकमेकांविरुद्ध उमेदवार उभे केले, जिथे सत्ताधारी महायुतीने एकमेकांविरोधात निवडणूक लढवली, तिथे विरोधी महाविकास आघाडीत एकवाक्यता नव्हती. त्याचा महायुतीला फायदा झाला.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# देव, दवा, हवा आणि पाणी!

'द ग्रेट वॉल ऑफ चायना' जगातील सात आश्चर्यांपैकी एक आणि तेही मानवनिर्मित! पण, आपल्याला निसर्गाने त्याहीपेक्षा चांगली सुरक्षा भिंत जवळपास तीन अब्ज वर्षांपूर्वीच दिली. अरावली पर्वतरांग गुजरातमधील माऊंट अबूपासून सुरू होऊन राजस्थान, हरयाणा आणि दिल्लीपर्यंत म्हणजे उत्तरेपासून पूर्वेपर्यंत सुमारे ६९० किमी पसरलेली आहे. अरावलीतील गुरू शिखर हे सर्वोच्च शिखर असून त्याची उंची सुमारे १७२२ मीटर आहे. ही जगातील सर्वात प्राचीन पर्वतरांगांपैकी एक आहे. हडप्पा संस्कृतीच्या काही वसाहती अरावलीच्या आसपास आढळतात. चित्तोडगड, कुंभलगड हे किल्ले अरावलीतच वसलेत. लूनी, बनास आणि साबरमती नद्यांचे उगमस्थान अरावलीने थारचा विस्तार वर्षानुवर्षे रोखून धरला आहे. अरावली म्हणजे पृथ्वीच्या इतिहासाचे जिवंत अवशेष, काळाच्या साक्षीने उभी असलेली भारताची सर्वात प्राचीन नैसर्गिक भिंत! भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने अरावली ही प्रिकॅम्ब्रियन काळातील निर्मिती असून तिचे आजचे कमी उंचीचे स्वरूप म्हणजे कोट्यवधी वर्षांच्या नैसर्गिक क्षयाचे परिणाम आहेत. ही झीज नैसर्गिक होती; मात्र सध्याची झीज मानवनिर्मित आहे आणि ती अधिक चिंताजनक आहे. या पर्वतरांगेने उत्तर भारताला भौगोलिक ओळख तर दिलीच; सोबत हवामान संतुलनाचे कामही केले. थार वाळवंटाचा विस्तार रोखणे, पावसाच्या ढगांची दिशा बदलणे आणि अनेक नद्यांना जन्म देणे ही सर्व कामे अरावली शांतपणे करत आली. शत्रूंपासून संरक्षण करणारी ही पर्वतरांग आज मात्र स्वतःच्या संरक्षणासाठी आक्रोश करतेय.

अरावलीचे आध्यात्मिक महत्त्वही आहे. आदिवासी बांधवांसाठी हे पर्वत 'भाखर देवता' आणि 'आबू राज' म्हणून पूजनीय आहेत. अरावलीचा विनाश त्यांच्या दैवताचा अपमान आहे. अरावलीच्या लहान-मोठ्या गुहांमध्ये दुर्मिळ औषधी वनस्पती असून त्या आयुर्वेदिक उपचार पद्धतीचा मुख्य आधार आहेत. अरावली शुद्ध प्राणवायू, औषधी, पाणी आणि आध्यात्मिक साधनेच्या संधी देणारी अरावली एक परिपूर्ण नैसर्गिक रुग्णालय आहे. नैसर्गिक अनियंत्रित खणन, कल्पनेपलिकडचं शहरीकरण आणि अफाट जंगलतोड, अरावलीच्या मुळावर उठले आहेत. 'ऊस गोड लागला म्हणून मुळापासून खायचा नसतो' ही पूर्वजांची शिकवण साफ विसरून आपण अरावलीला कुरतडत आलोय. काही स्क्वेअर फुटांचा हिशोब मांडणाऱ्या यच्चयावत मानवजातीला अरावलीचा अतिविशाल व्याप, त्यातील नैसर्गिक परिसंस्था आणि त्याचा विनाश समजून घेण्याचा आवाकाच उरलेला नाही. नैसर्गिक अधिवास वेगाने कमी झाल्यामुळे वन्यजीव-मानव संघर्ष वाढतोय. राजधानीत दररोज प्रदूषणाचे नवे विक्रम तयार होत असताना अचानक पूर, दुष्काळ, कडाक्याची थंडी, धुकं किंवा जीवघेणा उकाडा अशा बदलत्या ऋतुचक्राकडे बघायलाही आम्हाला वेळ नाही. उकडतंय मग लावा एसी, हवा प्रदूषित झाली तर लावा प्युरिफायर, थंडी वाढली लावा हिटर... सुखाच्या अतर्क्य कल्पनांसोबत मानव निसर्गाच्या जिवावर उठला आहे. अरावलीचा प्रश्न केवळ पर्यावरणाचा नाही तर पुढील पिढ्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. कायदे आहेत, न्यायालयांचे आदेश आहेत मात्र, अंमलबजावणीचा अभाव स्पष्टपणे दिसतो. संवर्धनाचे कागदी वाघ नाचवणे आम्ही कधी बंद करणार आहोत? आधीच खूप उशीर झालाय. आता निर्णय प्रत्यक्षात उतरवण्याची वेळ आली आहे.

अरावलीची झुंज निसर्गाशी नाही तर माणसाच्या अमर्याद लोभाशी आहे. काळ, वारा, पाऊस यांना समर्थपणे तोंड देणारी अरावली आज बुलडोझर, स्फोटके आणि प्रशासकीय निष्क्रियतेपुढे हतबल आहे. अरावली ही केवळ पर्वतरांग नाही; ती उत्तर भारताची हिरवी ढाल आहे. या विशाल पर्वतांच्या 'टेकड्या' होणं, हे अपयश केवळ प्रशासनाचे नाही, तर संपूर्ण व्यवस्थेचे नैतिक अपयश आहे. प्रश्न इतकाच की, आपण प्रगती करतोय की, पायाखालची जमीनच उखडतोय? कालच्या निर्णयांवर आज कृती केली नाही तर, उद्या उरणारच नाही. निसर्गाशी संघर्ष करून माणूस कधीच जिंकलेला नाही आणि यावेळीही तो जिंकणार नाहीच. अरावली ही भूतकाळाची आठवण नाही, तर भविष्याचा इशारा आहे. अन्यथा इतिहासात अरावलीचा उल्लेख 'होती एक पर्वतरांग' असा होण्यास फारसा काळ लागणार नाही. अरावली वाचवणे म्हणजे भूतकाळ जपणे नव्हे, तर भविष्य सुरक्षित करणे होय.

९८५०३३९२४०

## दखल

# ठाकरे बंधूंचा प्रीतिसंगम नव्हे, भीतिसंगम!

मोरेश्वर बडगे

महाराष्ट्राच्या राजकारणात बरेच काही घडतंय. एकत्रीकरणाचे वारे फिरतेय. राजकीय पक्ष एकत्र येत आहेत. काँग्रेसला स्वबळ आठवले आहे. अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या उबाठा शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना म्हणजेच मनसे यांच्या महापालिका निवडणूक युतीची घोषणा झाली आहे. शरद पवार आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे दोन गट पुण्यात एकत्र येत आहेत. ठाकरे बंधूंचे एकत्रीकरण हा प्रीतिसंगम आहे, असे ठाकरे सेनेचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. प्रत्यक्षात हा 'भीतिसंगम' आहे. भाजपाच्या भीतीने दोन चुलत भाऊ एकत्र आले आहेत. २०१९ मध्ये आणि नंतर सत्तेच्या राजकारणाने खूप तोडफोड पाहिली. भाजपाला सोडून उद्धव ठाकरे हे शरद पवार आणि काँग्रेसकडे जाऊन बसले. त्यांनी महाआघाडीचे सरकार बनवले. अडीच वर्षातच ते कोसळले. शिवसेना फुटली. ४० आमदारांसह बंड करून एकनाथ शिंदे यांनी सत्तेचे नवे गणित बसवले. नंतर अजितदादा पवार यांनी काकांविरुद्ध तलवार उपसली. तेही आपल्या आमदारांसह महायुतीकडे आले. अशा हवेत कित्येक वर्षांनंतर महापालिकेच्या निवडणुका लागल्या आहेत. त्या पृष्ठभूमीवर पुन्हा उलथापालथ होत आहे. तोडलेले, तुटलेले नेते पुन्हा एकत्र येत आहेत. मुंबईतले जागावाटप ठाकरे बंधू अजून जाहीर करू शकलेले नाहीत. बंडखोरी होऊ नये म्हणून अखेरच्या टप्प्यात ते जाहीर केले जाईल असे दिसते. तिकडे राष्ट्रवादीचे दोन्ही गट म्हणजे काका-पुतण्या एकत्र काम करणार म्हणत आहेत. ते 'घड्याळा'वर लढणार की 'तुतारी'वर याची उत्सुकता असेल. अजितदादा हे महायुती सरकारमध्ये भाजपासोबत असले, तरी पुण्यात भाजपाच्या विरोधात लढणार आहेत. त्याच वेळी मुंबईत भाजपासोबत त्यांची चर्चा सुरू आहे. शरद पवारांचा पक्षही अन्यत्र ठाकरे सेना आणि काँग्रेससोबत आघाडीला उत्सुक आहे. भांडून वेगळे झालेले हे पक्ष एकत्र का येत आहेत हा प्रश्न मतदारांना नक्कीच पडला असणार. त्यांना भाजपाची भीती आहे का? सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटल्याप्रमाणे भाजपाची अवस्था शनी शिंगणापूरसारखी आहे. शनी शिंगणापूरला दरवाजे सदैव उघडे असतात. निवडणुका जाहीर झाल्या असतानाही भाजपाने इनकमिंग थांबवलेले नाही. भाजपाचे तिकीट म्हणजे विजयाची गॅरंटी. त्यामुळे साऱ्यांना भाजपाचे तिकीट हवे आहे. 'एक फूल, पचास माली' अशी परिस्थिती आहे. अशा प्रकारची निवडणूक प्रथमच लोक पाहात आहेत. काय होणार?

किती वातावरण पेटवले होते विरोधकांनी? अनेक महिने मनोज जरांगे पाटील चालवले. बच्चू कडू यांना शेतकरी नेते केले. लोकसभा, विधानसभा



निवडणुकीत विरोधकांनी व्होट चोरी, ईव्हीएममधली गडबड तसेच मतदार याद्यांचा गोंधळ हे मुद्दे लावून धरले होते.

मतदार याद्यांमधला घोळ दूर झाल्याशिवाय निवडणुका होऊ देणार नाही, असे खुद्द राज ठाकरेंनी जाहीर केले होते. पण निवडणुका जाहीर होताच ठाकरे बंधू सारे विसरले आणि चूपचाप निवडणुकीच्या कामाला लागले. नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीच्या निकालांनी विरोधकांची तोंडं बंद केली. जिंकले तर लोकांनी जिंकवले आणि हरले तर निवडणूक आयोग काम करतो असे म्हणायचे. नगर परिषद निवडणुकीच्या निकालांनी विरोधकांचा दुटप्पीपणा उघडा पडला. उद्धव ठाकरे नगर परिषद निवडणूक हरले, असे म्हणायची सोय नाही. कारण ते निवडणूक लढलेच नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र पालथा घातला. विकास कामांच्या जोरावर मतं मागितली. कोमट पाणी पिऊन निवडणूक जिंकता येत नाही, हे ठाकरेंनी समजून घेतले पाहिजे. तुम्ही घराच्या बाहेरच पडणार नाही तर मग लोकांकडून कसली अपेक्षा बाळगता? 'अकेला देवेंद्र क्या करेगा?' असे सुप्रिया सुळे एकेकाळी म्हणाल्या होत्या. अकेला देवेंद्र काय काय करू शकतो ते पाच वर्षांत राज्याने पाहिले. नगर परिषद निवडणुकीची त्यांची रणनीती तर मास्टरस्ट्रोक होती. विरोधकांची जागा संपवण्याची रणनीती यशस्वीपणे राबविली गेली. महायुतीतले घटक पक्ष भांडत नव्हते, भांडल्यासारखे दाखवत होते. विरोधकांना अखेरपर्यंत हा गेम समजलाच नाही. मराठी आणि मराठी माणसाच्या मुद्यावर ठाकरे बंधू ही निवडणूक लढवणार आहे. मराठी अस्मितेच्या मुद्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत, असे ठाकरे बंधूंनी म्हटले आहे. त्यात नवे काही नाही. यांच्याकडे दुसरा मुद्दाच नाही. गेली २५ वर्षे शिवसेना मराठीचाच मुद्दा चालवत आली आहे. दिल्लीला मुंबईचे तुकडे पाडायचे आहेत, हा ठाकरे कुटुंबाचा आवडता आरोप. अगदी बाळासाहेब ठाकरे हेही हेच बोलत. 'फुटाल तर संपाल' या शब्दात यावेळी राज ठाकरे कडाडले आहेत. इतकी वर्षे ठाकरे कुटुंबाकडे मुंबईची सत्ता होती. काय केले यांनी मराठी माणसासाठी? यांच्याच काळात मराठी माणूस मुंबईबाहेर फेकला गेला. महापालिकेचे ठेके कोणाला दिले? यांचे बिझनेस पार्टनर कोण? हे तपासले तर यांचे बेगडी मराठी प्रेम लक्षात येते.

मराठीचा एवढा कळवळा आहे तर राज्यसभेवर पाठवायला यांना अमराठी माणूसच का दिसतो? ठाकरे बंधूंनी आता 'इमोशनल ब्लॅकमेलिंग' सुरू केले आहे. निवडणूक त्यांना भावनात्मक लाटेवर न्यायची आहे. हे काम ते वर्षानुवर्षे करत आले आहेत, पण आता मराठी माणूस भुलणार नाही. मुळात ठाकरे बंधू किती भावनाप्रधान आहेत? ते शुद्ध हिशोबी आहेत. ठाकरे बंधू मराठी अस्मितेसाठी नाही, तर स्वतःच्या अस्तित्वासाठी एकत्र आले आहेत. अन्यथा जे भाऊ २० वर्षे एकत्र येऊ शकले नाहीत त्यांना आज एकत्र यायची गरज वाटावी असे काय आभाळ कोसळले होते? ठाकरे शरद पवारांकडे गेले तेव्हाच 'ठाकरे ब्रँड' संपला होता. पित्याचे कडवे हिंदुत्व सोडून मुस्लिमांचे लांगूलचालन सुरू केले तेव्हा 'ठाकरे ब्रँड' संपला होता. खऱ्या अर्थाने हे दोन भावांचे मनोमिलन नाही. गड वाचवण्याची ही धडपड आहे; पण उशीर झाला. मराठी माणूस हा 'कालचा' राहिलेला नाही. आजचा मराठी माणूस शिकला आहे. नोकरीसाठी इंग्रजी शिकावे लागते हे त्याला उमगले आहे. आजचा मराठी माणूस स्वतःकडे 'हिंदू' म्हणून आधी बघतो. हिंदुत्वाला बाधा आणणाऱ्या शक्ती त्याला अजिबात पसंत नाहीत. त्यामुळे 'ठाकरे ब्रँड' म्हणून जी चर्चा चालते तो ब्रँड चालण्याची किंवा धावण्याची शक्यता दूर दूरपर्यंत नाही. उद्धव ठाकरे यांची मदार मुस्लिम मतांवर आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत त्यांना मुस्लिम मतं मिळाली. आपण 'मुस्लिम हृदयसम्राट' झालो असे त्यांना वाटते. म्हणून यावेळी उद्धव 'ममू फॉर्म्युला' चालवू पाहत आहेत. म म्हणजे मराठी आणि मु म्हणजे मुस्लिम. मुंबईत मराठी टक्का ३८ टक्के आहे आणि मुस्लिम टक्का २० ते २३ आहे. पण मुस्लिम मतांचे मोठ्या प्रमाणावर विभाजन होणार आहे. काँग्रेस तसेच एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजितदादांची राष्ट्रवादी यांना हेच काम करायचे आहे. निवडणुका चौरंगी करण्याचा भाजपाचा डाव भाजपाचा गेमप्लॅन यशस्वी झाला आहे. ठाकरे सेना आली तर एखादा खान महापौर होऊ शकतो, असे सांगून भाजप नेते अमित साटम यांनी आग लावलीच आहे. आता मुंबई महापालिका एका कुटुंबाचा व्यवसाय नाही असे भाजपाकडून सांगितले जात आहे. तुम्ही लिहून ठेवा. ठाकरे बंधूंसाठी ही निवडणूक शेवटची असेल.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## आजचे संघगीत-८४

शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५

### दिशादिशांतुन कोटि मुखांतुन निनाद एकच आता

दिशादिशांतुन कोटि मुखांतुन निनाद एकच आता
अजिंक्य आमुची भारतमाता, जय जय भारतमाता ॥धृ॥

इथे जान्हवी नित्य वाहते घेउन अमृतधारा
इथे झुळझुळे मलयगिरीचा शीतल गंधित वारा
धवल हिमालय या भूमीचा जगात उन्नत माथा ॥१॥

इथे जन्मले राम दाविण्या कर्तव्याचा पंथ
कृष्ण सांगती धनंजयाला अमोल गीताग्रंथ
वेदामधुनी इथे वाहती ज्ञानसुधेच्या सरिता ॥२॥

बालशिवाही इथे न झुकवी अधमापुढती मान
प्रतापराणा रणराणीचा असे अम्हा अभिमान
इतिहासातुन इथे रंगते पुरुषार्थाची गाथा ॥३॥

मानवतेची चाड अम्हां परि दानवतेची चीड
सत्यासाठी मनी न कधिही धरू भीति वा भीड
प्राणदीप हा विझवू हासत आम्ही देशाकरिता ॥४॥

## वर्षाअखेरची गर्दी

यावर्षी नाताळ, वीकेंड, इयर एंड हे सगळे ओळीने आल्यामुळे तसेच शासनाच्या निर्णयामुळे काही सुट्या या दिवसात जाहीर केल्यामुळे शाळा, कॉलेजला सुट्या मिळाल्या आहेत. ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या सेलिब्रेशनसाठी अनेक लोक उत्सुक आहेत. विदेशात राहणारे लोक याच दिवसात मायदेशी येतात. अनेकांचे पर्यटनाचे बेत आखले जातात. त्यामुळे बस प्रवास, रेल्वे प्रवास, विमान प्रवास यात आयत्या वेळी काढलेल्या तिकिटांसाठी भरपूर भाडे आकारले जाते. तसेच पर्यटन स्थळे, जवळपासचे पिकनिक स्पॉट्स येथेही सगळे गर्दी करतात. धार्मिक स्थळी देवळात भली मोठी रांग असते तसेच भक्त निवास गच्च भरलेले दिसतात. याच दिवसात सुट्या असल्याने असे कार्यक्रम आखणे साहजिकच आहे. पण त्याच बरोबर खरोखरीच इतक्या गर्दीत लहान मुलांना किंवा ज्येष्ठांना नेऊन गैरसोय करणे कितपत योग्य आहे याचा विचार व्हावा. या सगळ्या गर्दीचा, पर्यटकांना येणाऱ्या समस्यांचा गैरफायदा घ्यायला गुन्हेगार टपून बसले असतात. डिजिटल अरेस्टचे प्रकारही वाढू शकतात. त्यामुळे अशा प्रकारचे कार्यक्रम आखताना योग्य काळजी घ्यावी. बरेचदा खिशाला परवडत नसतानाही उत्साहात लोक प्रवास करतात. पण गैरसोय झाली तर अतिरिक्त पैशाचा भार सहन करूनही निराशा पदरी पडते. या सगळ्या शक्यता घेऊनच प्रवासाला किंवा एक दिवसीय सहलीला निघावे आणि आनंद घ्यावा.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

## वाचक पत्रे

### शिक्षणात स्वैराचाराचा शिरकाव

महाराष्ट्र विधान मंडळाचे हिवाळी अधिवेशन नुकतेच झाले. अनेक मुद्दे चर्चिले गेलेत. या संपूर्ण चर्चेत राज्यातील शाळा, महाविद्यालयांचे विद्यार्थी व्यसनाधीनतेच्या आहारी जात असल्याची चिंता सभागृहाने व्यक्त केली. हे सत्य आहे की अनेक विद्यार्थी मद्य, मादक पदार्थ, धूम्रपानाच्या मार्गी लागले आहेत. अनेक पालकांना, शिक्षकांना याची साधी कल्पना सुद्धा नाही. हे सर्व समाज विघातक आहे, वेळीच नियंत्रण घालणे शहाणपणाचे ठरेल. मागील एक दोन महिन्यांत घडलेल्या काही घटना बघा. नांदेड जिल्ह्यातील शेकापूर शाळेतील शिक्षकाने वर्गामध्ये दारू पिऊन धिंगाणा घातला. मलकापूर येथे एका शिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार केला. राजगुरूनगर खेड येथे दहावीतील विद्यार्थ्याकडून वर्गमित्राचा खून करण्यात आला. नागपूर जिल्ह्यातील राष्ट्रीय मनोविकास दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापकाचे शिक्षिकेसोबत लज्जास्पद वर्तन. अशाप्रकारच्या अनेक घटना समाज माध्यमावर आपण पाहिल्या. शाळा, महाविद्यालयात कर्मचाऱ्यांच्या टेबल, कपाटातून तंबाखू, सिगारेट, गुटखा, मद्य, अश्लील साहित्य, सीडीज, मेमरी कार्ड्स, मोबाईल्ससारख्या आक्षेपार्ह वस्तू आढळल्या. भांडणे, मारामारी नवीन नाही. काहींनी तर आत्महत्येपर्यंतचे पाऊल उचलले आहे. शासन वेळोवेळी कर्मचाऱ्यांकरिता मूल्यवर्धन प्रशिक्षण सुद्धा आयोजित करतात त्याचं हेच का फलित? विद्यार्थ्यांचे वर्तन सुधारण्यासाठी शाळेला प्रमाणात शिक्षा करता आली पाहिजे आणि ती पालकांनी सुद्धा मान्य करायला पाहिजे. त्याचप्रमाणे शाळा कर्मचारी यांचे आपसातील आणि विद्यार्थ्यांसोबतचे वर्तन योग्य राखण्याकरिता कठोर नियमावली आणि शिक्षा करण्याची गरज आहे. कर्मचारी, विद्यार्थी आपल्या बॅगमध्ये, कपाटात काय ठेवतात? काही आक्षेपार्ह वस्तू असतात काय? यावर सातत्याने तपासण्या, नियंत्रण कोण ठेवणार? शासनाने आणि शिक्षण व्यवस्थापनाने यावर गंभीर विचार करून पावले उचलावीत.घ्यावा.

**प्रा. विलास डोईफोडे**/सावनेर

## महत्वाचे...



### एस. पी. प्रतिष्ठानतर्फे सामुदायिक विवाह सोहळा

**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

एस.पी. प्रतिष्ठान व भीम युवक क्रीडा मंडळाच्या वतीने सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता. यंदाचे विवाह सोहळ्याचे ८ वे वर्ष असून या सोहळ्यात या सोहळ्यात ८ जोडप्यांनी रेशीमगाठ बांधत आयुष्याला सुरवात केली. सिध्देश्वर पांडगळे यांच्या मार्गदर्शनाखाली व समीर पांडगळे यांच्या नेतृत्वाखाली हा विवाह सोहळा पार पडला. रमाबाई पाडंगळे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी पद्मश्री खा.उज्वल निकम, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, प्रा. शंकर नवले, शशिकांत कांबळे, बाबुराव जमादार, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, जगन्नाथ बनसोडे, सुरेश बिद्री, शशिकांत कंची, श्रीकांत गायकवाड, संजय कोळी, बाळासाहेब नष्टी, राजकुमार पाटील, प्रणव लोंढे, जोडभावी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज मुलाणी, डॉ. ऋत्विक जायकर, अंबदास नडगेरी, दीपक बनसोडे, संघपाल काकडे, योगेश शिंदे उपस्थित होते.



### गैबीपीर उर्दू प्राथमिक शाळेत फुड फेस्टिव्हल संपन्न

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

होटगी रोड येथील गैबीपीर उर्दू प्राथमिक शाळेत फुड फेस्टिवलचे उदघाटन अॅड. अहमदसाब सिराजअहमद बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले. या फुड फेस्टिवलच्या उपक्रमांत शाळेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळे चवीचे बनवलेल्या खाद्य पदार्थांचे विद्यार्थ्यांनी ५० स्टॉल लावण्यात आले होते. या कार्यक्रमास वाइस ऑफ मिडियाचे प्रमुख तौफिक नदाफ, समाजसेवक हाजी कासीम सय्यद, हाजी सादिकभाई पिरजादे, मौलाना मुजमिल आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते. पाहुण्याचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक अ. मजीद शेख यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका निलोफर शेख, तहसीन चाँदा, शबाना जमादार, अकबर मुतवल्ली, सलमा नदाफ, मसरत शेख, शब्बीर शेख, आदिनी परिश्रम केले.



### 'एसव्हीसीएस'मध्ये गणित दिनानिमित्त विद्यार्थ्यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

एस. व्ही. सी. एस. हायस्कूल एमआयडीसी येथे थोर गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती राष्ट्रीय गणित दिवस म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. सुरुवातीस मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांच्या हस्ते रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षण संतोषकुमार तारके यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यानंतर ज्येष्ठ शिक्षिका सुलोचना विजपुरे यांनी रामानुजन यांनी गणित विषयांमध्ये मांडलेल्या संकल्पनेविषयी विस्तृत माहिती दिली. गणित संबोध स्पर्धा परीक्षेत प्रशालेतील ७० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. प्रशालेचा निकाल १००% लागला असून ४ गुणवंत विद्यार्थ्यांना शहर गणित अध्यापक मंडळाकडून सुवर्णपदक, प्रमाणपत्र व शाळेला एक सन्मानचिन्ह म्हणून ट्रॉफी देण्यात आली होती त्याचप्रमाणे श्रद्धा संस्था सोलापूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय अबॅकस व वैदिक गणित स्पर्धेत सूयश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गणित दिनाचे औचित्य साधून मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीची
# मतमोजणी होणार विविध ७ ठिकाणी



**ईव्हीएम व मतदान साहित्य वितरण, स्ट्राँग रूम व मतमोजणी ठिकाणे निश्चित**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान व १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे.

निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले ईव्हीएम मशीन, मतदान साहित्य वितरण व स्वीकृती, मतदानानंतर ईव्हीएम मशीन सुरक्षित ठेवणे तसेच मतमोजणीची ठिकाणे निश्चित करण्यात आले आहे.

सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी व राजकीय प्रतिनिधींनी निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

त्या अनुषंगाने आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी सोलापूर महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली असलेल्या इमारतींमधील खोल्या व खुल्या जागा अधिकृत केल्या आहेत.

या ठिकाणांचा वापर मतदान साहित्य वितरण व स्वीकृती, ईव्हीएम मशीनसाठी स्ट्राँग रूम तसेच मतमोजणीसाठी करण्यात येणार असल्याचे डॉ. ओंबासे यांनी यावेळी सांगितले.

**निवडणूक निर्णय अधिकारी व त्यांना नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या याप्रमाणे**

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १ भैरप्पा राजू माळी**

प्रभाग क्रमांक १, २, ३ व ४.

मतमोजणी ठिकाण : वेलणकर हॉल, दयानंद कॉलेज, सोलापूर.

ईव्हीएम स्ट्राँग रूम : वेलणकर हॉल येथील रूम नं. १ (पहिला मजला) व रूम नं. २, दयानंद कॉलेज, सोलापूर .

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. २ विजया पांगरकर**

प्रभाग क्रमांक ५, ६, ७ व १५.

मतमोजणी ठिकाण : सेंट्रल लायब्ररी बिल्डिंग, सिंहगड कॉलेज, केगाव, सोलापूर.

ईव्हीएम स्ट्राँग रूम : मॅनेजमेंट बिल्डिंग, तळमजला, सिंहगड कॉलेज, केगाव, सोलापूर.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ३ सचिन इथापे**

प्रभाग क्रमांक ८, ९ व १४

मतमोजणी ठिकाण : शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर

ईव्हीएम स्ट्राँग रूम : रूम नं. ४ व ५, शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ४ अंजली मरोड**

प्रभाग क्रमांक १०, ११, १२ व १३.

मतमोजणी ठिकाण : कुचन प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय इमारत, सोलापूर.

ईव्हीएम स्ट्राँग रूम : मातोश्री आशाताई अंबादास सरगम शाळा, रूम नं. ३, नर्सरी स्ट्रॉबेरी, कुचन प्रशाला, सोलापूर.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ५ अभिषेक देशमुख**

प्रभाग क्रमांक १६, १७, १८ व २१.

मतमोजणी ठिकाण : विलासचंद मेहता माध्यमिक प्रशाला, जुळे, सोलापूर.

ईव्हीएम स्ट्राँग रूम : विलासचंद मेहता माध्यमिक प्रशाला, तळमजला, जुळे सोलापूर.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ६ सदाशिव पडदुणे**

प्रभाग क्रमांक १९, २० व २५. मतमोजणी ठिकाण : नूतन मराठी विद्यालय, सोलापूर.

ईव्हीएम स्ट्राँग रूम : नर्सरी फुलपाखरू कलादालन, नूतन मराठी विद्यालय.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ७ जयश्री आव्हाड**

प्रभाग क्रमांक २२, २३, २४ व २६.

मतमोजणी ठिकाण : शहीद राहुल शिंदे बहुउद्देशीय सभागृह, एसआरपीएफ कॅम्प, विजापूर रोड, सोलापूर.

ईव्हीएम स्ट्राँग रूम : शहीद राहुल शिंदे बहुउद्देशीय सभागृह, एसआरपीएफ कॅम्प, विजापूर रोड, सोलापूर.

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्यावतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ सोलापूरच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान व जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण सोहळा हॉटेल सेंटर पॉइंट येथे मोठ्या थाटात संपन्न झाला. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते तर अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, शहर मध्येचे आ. देवेंद्र कोठे, पत्रकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत, राष्ट्रवादीचे शहर प्रमुख संतोष पवार, शहाजी पवार, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, गुरुशांत धुत्तरगावकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत, श्रीकांत मोरे, सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. सिद्धांत गांधी, प्रा.प्रमोद अवताडे, अक्षय खताळ, किरण मस्तानी, निसार शेख, पत्रकार भगवान परळीकर, छायाचित्रकार रामदास काटकर, वसीम आत्तार, अय्युब कागदी, विजय आवटे, श्रावणी सूर्यवंशी आदी मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर आभार जिल्हाध्यक्ष अभिषेक आदेप्पा यांनी मानले.



## जिजाऊ गुरुकुलच्या चार विद्यार्थ्यांची पुणे विभागीय आष्टे-डू आखाडा स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.२५ डिसेंबर**

जिल्हास्तरीय शालेय आष्टे-डू आखाडा स्पर्धेत जिजाऊ गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. या कामगिरीवर १४ व १७ वयोगटातील प्रथम क्रमांक प्राप्त राजवर्धन पारेकर, आर्यन गाडेकर, स्वागत शेळके व प्रथमेश भजनावळे यांची पुणे येथे होणाऱ्या विभागीय आष्टे-डू आखाडा स्पर्धेसाठी निवड झाली.

या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, सचिवा वर्षाताई घाडगे, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, डायरेक्टर संदेश कदम फिजिकल कोच जे. बी. शिंदे मेजर तसेच मार्गदर्शन करणारे आयाज शेख, गणेश वडेकर, दत्ता झांबरे आदींनी अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**जिल्हा कामगिरी : १४ वर्षाखालील :** २७ ते ३० किलो : राजवर्धन पारेकर (प्रथम), ३१-३५ किलो : समर्थ गुंजाळ ( द्वितीय), वैभव पवार ( तृतीय). **१७ वर्षाखालील :** ३५ ते ४० किलो : आर्यन गाडेकर (प्रथम), समर्थ पवार (द्वितीय). ४१ ते ४५ किलो : स्वागत शेळके ( प्रथम) मंथन चौधरी ( द्वितीय). ४५-५० किलो : प्रथमेश भजनावळे (प्रथम).



### सोलापुरातील पूरग्रस्तांना मदत

**सोलापूर, दि.२५डिसेंबर-**

सोलापूर : उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने सोलापूर येथे अलिकडच्या पुरामुळे बाधित झालेल्या समुदायांना आपत्तीत मदतीचा हात पुढे केला आहे. उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने प्रभावित भागातील १ हजार कुटुंबांना रेशन किटचे वाटप केले. प्रत्येक किट एका महिन्यासाठी चार जणांच्या कुटुंबाला आधार देण्यासाठी तयार केले होते. ज्यामुळे पुनर्प्राप्ती टप्प्यात आवश्यक अन्नपदार्थांची उपलब्धता राखण्यास मदत होते. उपक्रमामुळे ४ हजारहून अधिक व्यक्तींना मदत मिळाली आणि २ डिसेंबर २०२५ रोजी हे वितरण पूर्ण झाले आहे.



## 'सहस्त्रार्जुन'च्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५डिसेंबर-**

येथील सहस्त्रार्जुन प्रशालेच्या वतीने हुतात्मा स्मृती मंदिर येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सहस्त्रार्जुन शिक्षण संस्थेचे सचिव गजाननसा गोयल हे अध्यक्षस्थानी होते. उद्योजक सुनील मेंगजी यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, समूहगीत, देशभक्तीपर गीत सादरीकरण उपस्थितांची मने काबीज केली.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष राजुसा भूमकर, ट्रस्टचे सचिव जयकुमार कोल्हापुरे, भरतकुमार शालगर, श्रीरामपवार, गणेश दामजी , संजीवसा रंगरेज, सहस्त्रार्जुन शैक्षणिक संस्थेचे सदस्य तुकाराम पवार, विद्या गोयल, गीता हबीब, राजश्री बंकापूर, मुख्याध्यापक भगवंत उमदीकर, मुख्याध्यापिकाद्वय मंजुषा माने, सविता हातवळणे आदी उपस्थित होते. शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन प्रशांती काटवे यांनी केले. धनश्री महाजन यांनी आभार मानले.

### ओलाचे हायपरसर्व्हिस सेंटर्स सुरू

**सोलापूर** : पात्र ग्राहकांना कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय त्याच दिवशी सेवा हमी देण्यासाठी डिझाइन केलेले समर्पित हायपरसर्व्हिस सेंटर्स लाँच करून ओलाने त्यांच्या हायपरसव्हिस उपक्रमाचा विस्तार करण्याची घोषणा केली. या विस्ताराचा एक भाग म्हणून, ओला त्यांच्या विद्यमान सेवा केंद्रांना हळूहळू हायपरसर्व्हिस सेंटर्समध्ये अपग्रेड करेल, ज्याची सुरुवात बंगळुरूपासून होईल.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **RAISA BEGAM SARDARKHN PATHAN** HAS BEEN CHANGED TO **RAISA RAHIM PATHAN**

Resi. - 216, Shastri Nagar, Solapur

**KINDLY NOTE**

**THE SAME. (62215 Dtd.24.12.2025)**


## मुळेगाव तांडा येथे धाड; दारूच्या भट्ट्या उध्वस्त!

**सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या अनुषंगाने मुळेगांव तांडा ता. दक्षिण सोलापूर येथील ०३ अवैध हातभट्टी दारुच्या भट्टया उध्दवस्त करुन ०३ गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण १४ हजार ६०० लि. गुळमिश्रित रसायन व साहित्य असे एकूण ६ लाख १८ हजार ४०० रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या अनुषंगाने अतुल कुलकर्णी, पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण यांनी सोलापूर ग्रामीण जिल्हयामध्ये अवैध दारु निर्मिती भागात छापाकारवाई करुन हातभट्टी दारुची वाहतूक होणार नाही या करीता कारवाई करणेबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांना आदेशीत केले होते. त्याप्रमाणे दिनांक २५/१२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे वेगवेगळे ०४ पथके तयार करुन स्वत: पोलीस निरीक्षक संजय जगताप यांचेसह स्थानिक गुन्हे शाखेकडील पथकांनी मुळेगांव तांडा येथील हातभट्टी दारु निर्मिती व विक्री होत असलेल्या ठिकाणांची माहिती काढून एकूण ०३ अवैध हातभट्टी दारु निर्मितीच्या ठिकाणी छापे मारुन हातभट्टी दारु तयार करण्याकरीता लागणारा गुळमिश्रीत रसायन साठा असा एकूण ७३ बॅरेलमधील १४,६०० लिटर गुळमिश्रित रसायन साठा मिळून आल्याने



जागीच नाश करुन कारवाई करण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या कालावधीमध्ये अवैध दारुधंदयावर कडक कारवाई करण्यात येणार असून वारंवार गुन्हे करणाज्या इसमांविरुध्द कडक प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.ही कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि विशाल वायकर, नागनाथ खुणे, विजय शिंदे, भिमगोंडा पाटील यांचेसह एकूण २४ पोलीस अंमलदार यांनी सदरची कारवाई केली आहे.

जा.क्रं.बांध १४४४/२०२५
दि. २४/१२/२०२५

**माढा नगरपंचायत, माढा**

ई-निविदा प्रसिध्दीकरण सुचना क्रं. MCMDH/ /2025

मुख्याधिकारी माढा नगरपंचायत यांचेकडून शासनाच्या महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान योजने अंतर्गत अ. क्र ०१ योजने अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या विकासकामाची ई-निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार-अर्हता प्राप्त निविदा धारकाकडून तांत्रिक ब-१ नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई निविदेद्वारे मागविण्यात येत आहे. सदरच्या ई निविदेमध्ये एकुण ०१ काम आहेत. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि. २६/१२/२०२५ ते दि. ०४/०१/२०२६ पर्यंत सायं ०५ वाजेपर्यंत असुन कामाच्या किंमतीबाबत तसेच निविदा किंमत निविदा स्वीकृती अटी व शर्ती इत्यादींची माहिती http//mahatenders.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध आहेत.

सही/-
**मुख्याधिकारी**
**माढा नगरपंचायत**

**जाहीर समन्स**

**सोलापूर येथील. मा. श्रीमती. एस. डी. मुक्कनवार, न्यायाधिश, सहकार न्यायालय, सोलापूर यांचे कोर्टात**

**श्री. मलिक सयाजी रोकडे**
रा.२२, श्रेयश हौसिंग सोसायटी, -- वादी
शिवाजी नगर, बाळे ता. उत्तर सोलापुर, जि. सोलापुर
**विरुध्द**
०१. महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर
रा. १६, व्यंकटेशवर कॉम्पलेक्स, न्यू पाच्छा पेठ, -- प्रतिवादी
अशोक चौक सोलापूर

| अ. क्र. | सहकार केस नंबर | प्रतिवादीचे नांव नंबर व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१ | ४८/२०२२ | **०२. आप्पासाहेब यशवंत नामदास** रा.तळे हिप्परगा रोड, बाकळे नगर, प्लॉट नं. बी ५९, शेळगी, सोलापुर | ४,६७,२२८/- | ०५.०१.२०२६ |

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्या विरुध्द या न्यायालयामध्ये दावा दाखल केलेला आहे त्यामुळे या जाहीर समन्स/नोटीसीव्दारे आपणांस असे सूचित करण्यात येते की, आपण व्यक्तिशः अथवा योग्य रितीने अधिकार प्रदान करण्यात आलेला अधिकृत प्रतिनिधी, जो या दाव्याच्या संदर्भातील सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकेल, असा अधिकृत प्रतिनधीमार्फत या न्यायालयामध्ये दि. ०५/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता सदरील दाव्यामधील आपल्या विरुध्द करण्यात आलेल्या मागणीच्या संदर्भात आपले म्हणणे व पुरावे दाखल करण्यासाठी हजर रहावे. वर उल्लेखिलेल्या तारखेस व वेळेवर आपण हजर न राहिल्यास सदरील दाव्याचा निकाल आपले गैरहजेरीमध्ये करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

दि. १५/११/२०२५ रोजीच्या मा. न्यायाधिश साहेब यांचे हुकूमान्वये हे जाहीर समन्स दिले असे.

**कार्यालयाचा पत्ता :-**
सहकार न्यायालय सोलापूर
सोलापूर जिल्हा महसूल कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्थेची इमारत, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात, सोलापूर

सही/-
(एन.एस.देवराज)
**न्यायालयीन लिपीक**
**सहकार न्यायालय, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### कपिल शर्मा शोमधून स्मृती मंधाना गायब



**मुंबई** : ट्रेलरमध्ये कर्णधार हरमनप्रीत कौर, जेमिमाह रॉड्रिज व शेफाली वर्मा यांसारखे प्रमुख चेहरे दिसत असले तरी, स्मृती मंधाना या कार्यक्रमात गैरहजर असल्याचे चाहत्यांच्या लगेच लक्षात आले. मंधानाच्या अनुपस्थितीचे मुख्य कारण तिच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित असल्याचे मानले जात आहे. नेटफ्लिक्सवरील द ग्रेट इंडियन कपिल शोच्या अलीकडील प्रोमोजमधून हे निश्चित झाले आहे की, भारतीय महिला क्रिकेट संघ पाहुणा म्हणून येणार असला तरी, स्टार फलंदाज स्मृती मंधाना त्यात अनुपस्थित आहे. द ग्रेट इंडियन कपिल शोचा (हंगाम ४) आगामी भाग, शनिवार, २७ डिसेंबर, २०२५ रोजी प्रसारित होणार आहे, तो भारतीय महिला क्रिकेट संघाच्या ऐतिहासिक विश्वचषक विजयाचा उत्सव साजरा करण्यासाठी चित्रित करण्यात आला होता.

# भारताच्या आडकर, माया, वैदेही, श्रीवल्ली यांचा उपांत्य फेरीत प्रवेश


## जामश्री-इलिझियम सोलापूर ओपन महिलांच्या आयटीएफ टेनिस स्पर्धा

**सोलापूर, २५ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत जामश्री -इलिझियम सोलापूर ओपन २०२५ महिलांच्या ३० हजार रकमेच्या आयटीएफ टेनिस स्पर्धेत भारताच्या वैष्णवी आडकर, माया राजेश्वरन रेवती, वैदेही चौधरी, श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच कायम राखली.

जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका येथील एमएसएलटीए टेनिस सेंटर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये दुसऱ्या फेरीत आठव्या मानांकित भारताच्या वैष्णवी आडकर हिने बेलारूसच्या पोलिना बखमुतकिनाचे आव्हान ६-१, ६-१ असे एकतर्फी मोडीत काढले. चुरशीच्या लढतीत भारताच्या युवा टेनिसपटू माया राजेश्वरन रेवती हिने रशियाच्या एना सेडीशेवाचा ४-६, ७-५, ६-३ असा तीन सेटमध्ये पराभव करून आपली विजयी मालिका कायम ठेवली. सहाव्या मानांकित भारताच्या वैदेही चौधरीने रशियाच्या मारिया कल्याकिनाचा ३-६, ६-२, ७-५ असा संघर्षपूर्ण पराभव केला. दुसऱ्या मानांकित भारताच्या श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती हिने कझाकस्तानच्या अरुझान सगंडिकोवाचा ६-१, ६-१ असा सहज पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली.





काल अव्वल मानांकित खेळाडूवर सनसनाटी विजय मिळवणाऱ्या रशियाच्या मारिया गोलोविना हिने क्वालिफायर भारताच्या सोनल पाटीलचा ६-२, ६-४ असा पराभव केला. फ्रान्सच्या सेनिया इफारमोव्हाने रशियाच्या व्लादा मिन्चेवाचा ६-१, ६-२ असा तर, जपानच्या होनोका कोबायाशीने नेदरलँडच्या एम्मा व्हॅन पॉपेलचा ६-२, ६-४ असा पराभव केला. संघर्षपूर्ण लढतीत जपानच्या मिचिका ओझेकीने रशियाच्या एकतेरिना याशिनाचे आव्हान ६-७(९), ६-४, ६-४ असे मोडीत काढले.

दुहेरीत उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या होनोका कोबायाशी व मिचिका ओझेकी या जोडीने जपानच्या अव्वल मानांकित मना कावामुरा व हिरोको कुवाटा यांचा ७-५, ६-२ असा पराभव करून सनसनाटी निकाल नोंदवला.

भारताच्या दुसऱ्या मानांकित वैष्णवी आडकर व अंकिता रैना यांनी रशियाच्या एना सेडीशेवा व नेदरलँडच्या एम्मा व्हॅन पॉपेलचा ६-१, ६-४ असा पराभव केला. भारताच्या चौथ्या मानांकित श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती व वैदेही चौधरी या जोडीने थायलंडच्या लुंडा कुम्होम व तनुचापोर्न योंगमोडचा ६-३, ६-० असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

भारताच्या झील देसाईने एलिना नेपलीच्या साथीत डेन्मार्कच्या एलेना जमशिदी व मारिया मिखाइलोवा यांचा ६-४, ६-४ असा पराभव केला.



# कठोर ट्रेनिंग हेच आपल्या यशाचे खरे गमक

## नेदरलँड्सची अव्वल मानांकित टेनिसपटू एम्मा व्हॅन पॉपेल

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

कडक शिस्त, सात्विक आहार, कुटुंबीयांकडून मिळणारे सातत्यपूर्ण प्रोत्साहन आणि दररोज किमान ६ तास न थकता केलेली कठोर ट्रेनिंग हेच आपल्या यशाचे खरे गमक असल्याचे, नेदरलँड्सची अव्वल मानांकित टेनिसपटू एम्मा व्हॅन पॉपेल हिने स्पष्ट केले.

जामश्रीइलिझियम सोलापूर ओपन महिला आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेच्या निमित्ताने खास नेदरलँड्स येथून आलेली जागतिक क्रमवारीतील अव्वल मानांकित टेनिसपटू एम्मा व्हॅन पॉपेल सोलापूर विकास मंचच्या सत्कारानंतर बोलत होती.

सोलापूरबाबत बोलताना ती म्हणते, सोलापूरची हवा, वातावरण आणि येथील लोक अतिशय छान आहेत. ती पहिल्यांदाच भारतात आली असून, इथले आदरातिथ्य पाहून ती मनापासून भारावून गेली आहे. सोलापूरमधील शाकाहारी तसेच मांसाहारी खाद्यपदार्थ तिला फारच आवडले.

सोलापूरची थेट विमानसेवा सुरू झाल्याबद्दल समाधान व्यक्त करताना एम्मा व्हॅन पॉपेल म्हणाली, ''मी नेदरलँड्स येथून मुंबईला उतरले आणि तेथून थेट विमानाने सोलापूरला पोहोचले. त्यामुळे माझ्या प्रवासाचा मोठा वेळ वाचला आणि मला सोलापूरमध्ये सरावासाठी अधिक वेळ मिळाला.

आज तिचा सामना संपल्यानंतर तिला सोलापूरची चादर भेट देण्यात आली. विशेष बाब म्हणजे आज ख्रिसमसचा दिवस असल्याने, आपल्या देशापासून व कुटुंबापासून दूर असलेल्या परदेशात अशा प्रकारच्या आपुलकीने केलेल्या सत्कारामुळे ती भावूक झाली. ''भारत आणि सोलापूरच्या लोकांना मी माझ्या आयुष्यात कधीच विसरणार नाही,'' हे तिचे शब्द ऐकून उपस्थितांच्या मनाला विशेष समाधान वाटले. या संपूर्ण स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामागे सोलापूर डिस्ट्रिक्ट लॉनटेनिस असोसिएशनचे सचिव राजीव देसाई आणि त्यांच्या संपूर्ण टीमने गेल्या १० वर्षांपासून घेतलेली अथक मेहनत मोलाची ठरली आहे. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धेसाठी १३ देशांतील ४६ अव्वल मानांकित महिला टेनिसपटू सोलापूरात दाखल झाल्या आहेत. यावेळी सोलापूर विकास मंचचे विजय कुंदन जाधव, ॲड.दत्तात्रय अंबुरे, अर्जुन रामगिर, डॉ. दिलीप जोशी, राजेश नाईक, कार्तिक अंबुरे आदी मान्यवर उपस्थित होते.



### पाच किलोमीटर धावण्याच्या स्पर्धेत साईश्वर व श्रद्धा गुंटूक यांना सुवर्ण

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

स्पोर्ट्स अथोरिटी ऑफ तेलंगाणा, हैदराबाद डिस्ट्रिक्ट ॲथलेटिक असोसिएशन व उस्मानिया युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने अवेअरनेस ऑन स्पोर्ट्सवर आधारित या इंटरनॅशनल स्पर्धेत राष्ट्रीय धावपटू साईश्वर व श्रद्धा गुंटूक बंधू भगिनीनी खुल्या पुरुष गटात ५ किलोमीटर अंतरमध्ये साईश्वर व खुल्या महिला गटात श्रद्धा प्रथम क्रमांक पटकाविला. ही स्पर्धा हैदराबाद येथील सर्वात जुने असलेले उस्मानिया युनिव्हर्सिटी येथील सिंथेटीक ट्रॅकवर सकाळी पार पडली. नॅशनल आर. ॲथलेटीक फौंडेशन हैदराबादच्या वतीने साईश्वर व श्रद्धाला मेडल, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत १७८२ स्पर्धक सहभागी झाले होते. सोलापुरात सिंथेटीक ट्रॅक नसल्याने साईश्वर व श्रद्धा आठवड्यातून तीन दिवस विजयपुराच्या सिंथेटिक ट्रॅकवर धावण्याचा सराव करतात. दोघे गेल्या ५ ते ६ वर्षांपासून धावण्याचा सराव करतात. २०२८ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकच्या धावण्याच्या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करून देशासाठी पदक मिळविण्याचा ध्यास त्यांनी घेतला आहे. त्यांचे सोलापूर ॲथलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश पवार यांनी अभिनंदन केले. साईश्वर व श्रद्धा यांना सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह, स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडा प्रशिक्षक कृष्णा कोळी आदींचे मार्गदर्शन लाभत आहे.

# जिल्हा लंगडी स्पर्धेत लोहारवस्ती शाळा प्रथम

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, लोहारवस्ती, करजगी (ता.अक्कलकोट) शाळेने जिल्हा परिषदेच्या क्रीडा स्पर्धेत लहान गटात मुलांच्या लंगडी स्पर्धेत विजेतेपद पटकाविले.

जिल्हा परिषद,सोलापूर व पंचायत समिती शिक्षण विभाग, पंढरपूर यांच्या वतीने आयोजित ही स्पर्धा सतू कृष्णा केणी विद्यालय, अनवली येथे झाली. यशस्वी खेळाडूंना ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन पंढरपूर तालुक्याचे गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्यालय शिक्षण विस्तार अधिकारी. गोदावरी राठोड, पंढरपूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी विष्णू चव्हाण साहेब, केंद्रप्रमुख हनुमंत भोसले या मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. करजगी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी लक्कप्पा पुजारी यांनी खेळाडूंना २ हजार १०० रुपयांचे रोख बक्षीस दिले.



यशस्वी खेळाडूंचे खेळाडूंचे आणि त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक बसवराज परतबादी, इसाक नागणसुरे यांचे शिक्षणाधिकारी (प्राथ) कादर शेख, अक्कलकोट तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, करजगी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी लक्कप्पा पुजारी, मैंदर्गी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, करजगी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.मल्लिकार्जुन पाटील यांनी अभिनंदन केले. या स्पर्धेचे पंच म्हणून बाबासाहेब दराडे, गजेंद्र पवार, नागनाथ क्षीरसागर, अविनाश कदम, पांडुरंग कुंभार, राहुल बनसोडे, धनाजी जाधव, संदीप खेडकर यांनी उत्कृष्ट नियोजन करून क्रीडा स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडली.

**विजयी संघ :** वसीम मुबारक कोरबू (कॅप्टन), सुशांत सिद्धाराम पुजारी (उपकॅप्टन), आहील दस्तगीर शेरीकर, प्रवीण नरसप्पा नायकोडी, सरवर्ष श्रीशैल नायकोडी, रहिमान सादिक शेरीकर, साजीद इब्राहिम मदरी, चरण चंद्रशेखर नायकोडी, वेद पिरोजी माळी, विलास शरणप्पा नायकोडी, ऋषिकेश परशुराम संकद, प्रितम परशुराम नायकोडी, प्रमोद नरसप्पा नायकोडी, विनायक नागप्पा नायकोडी.



# अमेरिकेतील शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांनी अवगत कराव्यात : डॉ. खंडागळे

## राष्ट्रसंत शाळा, विश्वभूषण विद्यालयात क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

अमेरिकेतील शिक्षण पद्धती संशोधनाच्या संधी अभ्यासातील शिस्त इत्यादी सर्व बाबी भारतीय विद्यार्थ्यांनी अवगत करून घ्याव्यात जेणेकरून भारतीय विद्यार्थी जगाच्या पटलावर कुठेही मागे राहणार नाही.भारताचे नाव निश्चितच उज्वल करतील असे विचार अमेरिकेत वैद्यकीय उच्च शिक्षण घेणाऱ्या डॉ. क्रांती खंडागळे यांनी मांडले.

त्या सदसंकल्प शिक्षण समूह सोलापूर संचलित राष्ट्रसंत प्राथमिक शाळा आणि विश्वभूषण विद्यालयात नामदेवराव (बापू) भालशंकर यांच्या ८७ व्या जयंतीनिमित्त आयोजित क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करतेवेळी बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विश्वभूषण विद्यालयाचे मुख्याध्यापक सत्यवान पाचपुडवे हे होते. सुरुवातीला डॉ. क्रांती खंडागळे यांचा अस्मिता भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

डॉ. क्रांती खंडागळे यांच्या हस्ते नाणी उडवून खो-खो सामन्याचे उद्घाटन करून सामना सुरू करण्यात आला , खेळाच्या सामन्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉ. क्रांती खंडागळे यांना कुतूहल पूर्वक अनेक प्रश्न विचारले. तितक्याच सहजतेने डॉ. क्रांती यांनी सर्व प्रश्नांना मनमोकळेपणाने उत्तरे दिली. त्यांनी खो-खोच्या सामन्यांमध्ये स्पर्धक म्हणून भागही घेतला. या क्रीडा सप्ताहाच्या वेळी शाळेचे मुख्याध्यापक सत्यवान पाचकुडवे, ज्येष्ठ शिक्षक मिलिंद भालशंकर, प्रविण पाटील, रामचंद्र व्हनकडे,क्रीडा शिक्षक भोजराज गायकवाड तसेच शाळेतील इतर सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.



### इंडियन मॉडेल स्कूलच्या अपुर्वा अंधारेला राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत दोन पदके

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

दिल्ली येथे झालेल्या शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कुल स्टेट बोर्डच्या अपुर्वा अंधारे हिने १७ वर्षाखालील मुलींच्या गटात १ मीटर स्प्रिंग बोर्डमध्ये रौप्य व हायबोर्डमध्ये कांस्य पदक मिळविले. तिला प्रशिक्षक श्रीकांत शेटे व क्रीडा शिक्षक अक्षय माने यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

# सोलापूरच्या दोन्ही संघाची विजयी सलामी

## ३९ वी किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २५ डिसेंबर-**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने तसेच मुंबई खो-खो असोसिएशन व श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर यांच्या संयुक्त विद्यमाने ३९ वी किशोर व किशोरी (सब ज्युनिअर-१४ वर्षाखालील) राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ, सहकारनगर, वडाळा, मुंबई येथे दणक्यात सुरु झाली असून गुरुवारी सोलापूरच्या किशोर व किशोरी संघाने दणदणीत विजय मिळविले. किशोर गटात सोलापूरने परभणीवर २० गुणांनी मात केली. किशोरी गटात सोलापूरने रायगडवर एक डाव ३० गुणांनी दणदणीत विजय मिळविला.

**किशोर गट : ठाण्याचा जळगाववर वर्चस्वपूर्ण विजय :** किशोर गटातील सामन्यात ठाण्याने जळगाववर सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत ३९-१० असा स्पष्ट विजय मिळवला आणि एक डाव २९ गुणांनी सामना खिशात घातला. ठाणे संघाकडून साई धोंडकर (२.४५ व २.२० मि. संरक्षण), सचिन हुले (२.२० मि. संरक्षण व ६ गुण), अरुण गरेल (२.५० मि. संरक्षण व ४ गुण), अभय सावंत (३ मि. संरक्षण व २ गुण) यांनी सलग प्रभावी कामगिरी करत विजय निश्चित केला, तर जळगावकडून प्रीतम पावरा (१ मि. संरक्षण) याने एकाकी झुंज दिली.

**पुण्याची लातूरवर धडाकेबाज सरशी :** पुण्याने लातूर विरुद्ध सर्वांगीण खेळाचे दर्शन घडवत ४४-८ असा विजय नोंदवला आणि एक डाव ३६ गुणांनी सामना जिंकला. पुण्याकडून कर्तव्य गांडेकर (३ मि. संरक्षण, व २ गुण), सोहम देशमुख (३ मि. संरक्षण), ओम वाघ (३.२० मि. संरक्षण), श्रीराज तांगडे (१.५५ मि. संरक्षण व ६ गुण), वेदांत गायकवाड (नाबाद २ मि. संरक्षण व ८ गुण) यांनी आक्रमण व संरक्षणात सातत्य राखले. लातूर संघाकडून श्रीराम कदम (१ मि. संरक्षण, २ गुण) याने चांगला प्रतिकार करीत एकाकी लढत दिली.

**सांगलीचा सिंधुदुर्गवर प्रचंड फरकाने विजय :** सांगलीने सिंधुदुर्ग विरुद्ध ५४०४ असा दणदणीत विजय मिळवत एक डाव ५० गुणांनी सामन्यावर विजयी शिक्कामोर्तब केले. सांगलीकडून दक्ष जाधव (६.०५ मि. संरक्षण व ४ गुण), शुभम माने (४.४५ मि. संरक्षण व ४ गुण), समर्थ जाली (१४ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ केला, तर सिंधुदुर्गकडून गौरांग मालंदकर (१ मि. संरक्षण संरक्षण) याचे एकाकी प्रयत्न अपुरे पडले.

**किशोरी गट : सांगलीची लातूरवर मात :** किशोरी गटात सांगलीने लातूर विरुद्ध ३३-१४ असा विजय मिळवत एक डाव १९ गुणांनी सामना जिंकला. मध्यंतराला सांगलीकडे २६०६ अशी आघाडी होती. सांगलीकडून वेदिका तामखडे (२.२५ मि. संरक्षण व २ गुण), श्रावणी माने (२.३० मि. संरक्षण), आराध्या पाटील (२.३० मि. संरक्षण व ८ गुण) यांनी प्रभावी खेळ केला, तर लातूरकडून सायली देशमुख (१.३० मि. संरक्षण), संस्कृती शिंदे (१.०५ मि. संरक्षण व २ गुण) यांनी झुंज दिली.

**धाराशिवचा सिंधुदुर्गवर एकतर्फी धक्का :** धाराशिवने सिंधुदुर्ग विरुद्ध ५३-१० असा एक डाव ४३ गुणांनी मोठा विजय मिळविला. धाराशिवकडून मुग्धा सातपुते (२.५० मि. संरक्षण व ६ गुण), भार्गवी बागल (२.५० मि. संरक्षण व ४ गुण), राही पाटील (१.२० मि. संरक्षण व ६ गुण), पियुषा पालमलकर (२.५० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी दमदार कामगिरी केली, तर सिंधुदुर्गकडून ऋतिका परब (१ मि. संरक्षण संरक्षण) हिने एकहाती लढत दिली.

**पुण्याची जळगाववर ठसठशीत सरशी :** पुण्याने जळगाव विरुद्ध ४०-१२ असा विजय मिळवत एक डाव २८ गुणांनी बाजी मारली. पुण्याकडून सई गरड (४.१० मि. संरक्षण), सुप्रिया करे (३.२५ मि. संरक्षण व ४ गुण), प्राप्ती देशमुख (२.३० मि. संरक्षण व १० गुण), अपर्णा वर्धे (१४ गुण) यांनी चमकदार कामगिरी केली. जळगावकडून सोनाली खेनगट (१, १.२५ मि. संरक्षण) हिने चांगले योगदान दिले.





### उर्वरित सामन्यांचे संक्षिप्त निकाल

**किशोर गट :** सातारा विरुद्ध हिंगोली सातारा एक डाव २२ गुणांनी विजयी; नाशिक विरुद्ध धुळे नाशिक एक डाव ०९ गुणांनी विजयी; छत्रपती संभाजीनगर विरुद्ध नांदेड संभाजीनगर एक डाव ०२ गुणांनी विजयी;

**किशोरी गट :** नाशिक विरुद्ध बीड नाशिक एक डाव १६ गुणांनी विजयी; सातारा विरुद्ध हिंगोली सातारा एक डाव ४२ गुणांनी विजयी; ठाणे विरुद्ध परभणी ठाणे एक डाव १० गुणांनी विजयी; रत्नागिरी विरुद्ध नांदेड नांदेड ०७ गुण व ३० सेकंद राखून विजयी

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### स्व. गायक मोहम्मद रफी यांच्या जयंतीनिमित्त बार्शीतील हौशी कलाकाराकडून आदरांजली

**बार्शी, दि.२५ डिसेंबर-**

स्वर्गीय गायक मोहम्मद रफी यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त बुधवारी बार्शीतील हौशी कलाकार गृप यांनी मोहम्मद रफी यांना रफीच्या गीतांचा आदरांजली पर कार्यक्रम घेतला. सदर कार्यक्रम फक्त हौशी कलाकार ग्रुप सदस्य गोविंद तापडिया यांच्या तापडिया टी सेंटर, घोडे गल्ली येथील हॉलवर पार पडला. या कार्यक्रमात मेजर अविनाश हिंगमीरे, अशोक डहाळे, गोविंद तापडिया, राहुल झोंबाडे, अजय खंडेलवाल आणि सुनिल फल्ले या सदस्यांनी तसेच सौ. सुजाता हिंगमीरे, सौ. लक्ष्मी तोरड, सौ. रुपाली पवार, सौ स्वाती डोळे, सौ. निमा कांबळे या महिला सदस्यांनी एकापेक्षा एक सरस, दर्जेदार रफी यांची लोकप्रिय, गाजलेली गीते सादर केली. बार्शीतील एक नवीन गायिका स्मिता बोरा गेस्ट कलाकार म्हणून यांनीही दोन सुंदर गीते गायली. ग्रुपमधील सर्व सदस्यांनी २-२ गीते गायली. सदर कार्यक्रमात मस्त बहारो का आशिक, ओ मेरी मेहबुबा, मेरे देश प्रेमियो, मुझे कितना प्यार तुमसे, मुझे दुनिया वाले शराबी ना समझो, डफफली वाले, छुप गये सारे नजारें, बदन पे सितारे, मांग के साथ तुम्हारा, वादा करले साजना, जनम जनम का साथ हो, मै जिंदगी का साथ निभाता, ये दिल तुम बिन लगता नहीं इत्यादी गीते गायली. गोंविंद तापडिया यांनी कार्यक्रमासाठी हॉल उपलब्ध करुन दिल्याबद्दल अशोक डहाळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन सुनिल फल्ले आणि गोविंद तापडिया यांनी केले होते.



### केंद्रिय मंत्री रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळे वाटप

**श्रीपूर, दि. २५ डिसेंबर-**

श्रीपूर (ता.माळिशरस) येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट चे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे वाढदिवसानिमित्त डॉ. सुहास बनसोडे यांच्या श्रीसेवा रुग्णालयामध्ये आरपीआय श्रीपूर शहर शाखा यांचे वतीने रुग्णांना फळे वाटप करण्यात आली. श्रीपाद ऊर्फ भाऊसाहेब कुलकर्णी व आरपीआयचे जिल्हा संघटक तुकाराम बाबर यांच्या हस्ते फळे वाटप झाले. जिल्हा सचिव भारत आठवले,बी.टी.शिवशरण,गणेश सावंत रमेश भोसले, गौतम आठवले, भालचंद्र शिंदे पाटील, के.बी. शिखरे, राजू पाटील, समाधान साठे, पोपट आखाडे, गटू वजाळे उपस्थित होते. यावेळी डॉ. सुहास बनसोडे यांनी परिवर्तन घडवून पक्षाला मजबूत करण्याचे काम आठवले यांनी केल्याचे सांगितले. त्यामुळे आरपीआयची ताकद तळागाळा पर्यंत पोहोचली आहे.

## निधन वृत्त...

### बलभीम धावणे



**मंगळवेढा, दि.२५ डिसेंबर-**

मोहोळ तालुक्यातील डिकसळ येथील बलभिम शंकर धावणे (वय-८६) यांचे बुधवार दि. २४ डिसेंबर रोजी पहाटे सहाच्या सुमारास हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. डिकसळ व मंगळवेढा येथील डॉ. हणमंत धावणे यांचे ते वडिल होत.

### सविता शहा



**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

राघवेन्द्र नगर मुरारजी पेठ येथील सविता कांतीलाल शहा, आष्टीकर (वय ८०) यांचे गुरुवारी याचे दुपारी सल्लेखनापूर्वक समाधी निधन झाले. त्यांचा १२ वर्षाचा सल्लेखनाचानियम होता. त्यांचय पार्थिवार मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रा. सत्यजित शहा व रणजित शहा यांच्या त्या मातोश्री होत.

### माजी सर्कल अधिकारी मच्छिंद्र भालशंकर



**वैराग, दि. २५ डिसेंबर-**

महसूल विभागातील निवृत्त अधिकारी कै. मच्छिंद्र भाऊसाहेब भालशंकर यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातू असा परिवार आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातू असा परिवार आहे. वैराग नगरपंचायतीचे विद्यमान नगरसेवक श्रीशैल(पप्पू) भालशंकर यांचे ते वडील होत. निवृत्तीनंतरही त्यांचा सामाजिक कामात मोठा सहभाग असायचा.

### क्रीडा शिक्षक तुळशीराम शेतसंदी



**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विंचूर येथील शिक्षक तुळशीराम शेतसंदी (वय ५२) यांचे गुरुवारी हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मित निधन झाले. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर विंचूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली असा परिवार आहे. अनेक राज्यस्तरीय खो-खो घडवित असताना त्यांनी अंत्रोळी व विंचूरमध्ये जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजनही केले होते. सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे ते सदस्य होते.

# अकलूजमध्ये ७० वर्षांच्या प्रस्थापित सत्तेला भाजपाची तगडी धडक

## १० हजार मतांसह भाजपाचा 'नैतिक विजय'

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २५ डिसेंबर-**

गेल्या ७० वर्षांपासून अकलूजमधील राजकीय व्यवस्थेवर असलेल्या वर्चस्वाला यंदा भारतीय जनता पार्टीने जोरदार आव्हान दिले. अकलूज नगरपरिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच प्रस्थापित व्यवस्थेविरोधात भाजपाने 'कमळ' चिन्हावर आपले पॅनल उभे करून निकराची लढत दिली. जरी पूर्ण सत्ता मिळाली नसली, तरी मिळालेला जनादेश हा आमचा 'नैतिक विजय' असून हा प्रस्थापितांच्या पतनाचा प्रारंभ आहे, अशी भूमिका भाजपा माजी आमदार राम सातपुते यांनी मांडली.

अकलूज येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. यावेळी भाजप अकलूज मंडळ अध्यक्ष सुजयसिंह माने पाटील, शहर अध्यक्ष महादेव कावळे, शैलेश कोतमिरे, नूतन नगरसेवक राहुल लोंढे, महेश शिंदे, नगरसेविका दिपाली वाघमोडे, जयश्री एकतपुरे व सर्व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.



या निवडणुकीत भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार पूजाताई कोतमीरे यांना अकलूजच्या जनतेने सुमारे १० हजार मतांचा भरघोस कौल दिला. विजयी उमेदवाराला ५१ टक्के मते मिळाली असली, तरी एकट्या भाजपाने कोणाचीही मदत न घेता ४१ टक्यांहून अधिक मते मिळवून विरोधकांच्या गोटात धडकी भरवली आहे. अनेक प्रभागांमध्ये भाजपाचे उमेदवार अवघ्या २० ते ३० मतांच्या फरकाने पराभूत झाले असल्याचे मा.आ.सातपुते यांनी सांगितले. कोणतेही संस्थात्मक पाठबळ, साखर कारखाने किंवा मोठी आर्थिक रसद नसताना भाजपाचे चार सामान्य पार्श्वभूमीचे उमेदवार निवडून आले आहेत. नूतन नगरसेवक महेश शिंदे चळवळीतील कार्यकर्ता म्हणून आक्रमक विरोधी आवाज मांडणार असून दिपाली वाघमोडे या एका सामान्य रिक्षाचालकाच्या पत्नी असून त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला. राहुल लोंढे हे बौद्ध समाजातील आणि दलित चळवळीतील कार्यकर्ता, ज्यांनी सामान्यांच्या प्रश्नांसाठी लढा दिला तर जयश्रीताई एकतपुरे या माळी समाजातून निवडून आलेल्या सक्षम महिला प्रतिनिधी आहेत.

माजी आमदार सातपुते म्हणाले की, 'विरोधकांना विजयासाठी गल्लीबोळात फिरावे लागले. हा विजय म्हणजे एखादा पेशंट 'आयसीयू' मधून 'जनरल वार्ड' मध्ये शिफ्ट झाल्यासारखा आहे. त्यांची सत्ता आता खिळखिळी झाली आहे. कार्यकर्त्यांवर होणारे हल्ले आणि राऊत नगरमधील दगडफेकीसारख्या घटना खपवून घेतल्या जाणार नाहीत. संविधानाच्या मार्गाने या विकृत राजकारणाचा प्रतिकार केला जाईल. अकलूजमध्ये लवकरच भाजपाचे भव्य कार्यालय सुरू होणार असून, सर्व नगरसेवक तिथे जनतेच्या कामासाठी उपलब्ध असतील. बांधकाम परवाने किंवा जमिनींचे दाखले यासाठी अकलूजच्या जनतेला एक रुपयाही कोणाला द्यावा लागणार नाही, याची काळजी भाजपाचे चारही नगरसेवक घेतील. या लढ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिलेल्या पाठबळाबद्दल त्यांचे आभार मानत ही केवळ निवडणुकीची सांगता नसून, अकलूजमधील नव्या पर्वाची सुरुवात आहे, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

# वैराग पोलिस ठाण्याची गुन्हेगारी नियंत्रणात मोठी झेप

### पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्याकडून कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२५ डिसेंबर-**

विस्तीर्ण आणि संवेदनशील असलेल्या वैराग पोलीस ठाण्याने यावर्षी सर्व प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये अत्यंत समाधानकारक कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे गेल्या वर्षभरात या परिसरात दरोडा आणि जबरी चोरी यांसारखा एकही गंभीर गुन्हा दाखल झालेला नाही. पोलिसांच्या या चोख कामगिरीचे जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी कौतुक केले आहे.

वैराग पोलीस ठाण्याच्या वार्षिक निरीक्षणासाठी मंगळवारी (दि.२४) आले असता ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी त्यांनी पोलीस ठाण्यातील अद्ययावत कार्यप्रणालीची पाहणी करून समाधान व्यक्त केले.यावेळी बार्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर, वैरागचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वजीत जगदाळे, पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव, शिवाजी हाळे व इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



> वैराग पोलीस ठाण्याची व्याप्ती मोठी असूनही यावर्षी येथील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे. दरोडा आणि जबरी चोरीसारखे गंभीर गुन्हे शून्य असणे, हे पोलिसांच्या अथक परिश्रमाचे फळ आहे. आम्ही आता 'ग्राम सुरक्षा यंत्रणा' अधिक मजबूत करण्यावर भर देत आहोत. तंत्रज्ञानाचा वापर वाढवून सीसीटीव्हीच्या माध्यमातून शहरावर तिसरा डोळा ठेवला जाईल, जेणेकरून गुन्हेगारांवर वचक बसेल.
> -अतुल कुलकर्णी, जिल्हा पोलीस अधीक्षक, सोलापूर

पोलिसांच्या सतर्कतेमुळे गेल्या वर्षभरात दरोडा, जबरी चोरी आणि इतर गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले आहे.नवीन कार्यप्रणाली आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे, ज्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेत वाढ झाली आहे. महत्त्वाच्या आणि मोठ्या चौकांमध्ये लवकरच सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. संवेदनशील भागांमध्ये गस्त (पेट्रोलिंग) वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, ग्राम सुरक्षा यंत्रणेला अधिक सक्रिय करण्यात आले आहे. संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी व्हॉट्सप ग्रुप्स तयार करण्यात आले असून, याद्वारे माहितीची देवाणघेवाण केली जात आहे.




### बार्शीच्या किरण मस्तानीचा सोलापुरात पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.२५ डिसेंबर -**

सोलापूर येथील महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातर्फे समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या बार्शीच्या पारलिंगी (तृतीयपंथी) किरण मस्तानी हिचा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

स्मार्ट ॲकॅडमीचे संचालक सचिन वायकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तृतीयपंथी किरण मस्तानी यांचे सामाजिक कार्यात मोठे योगदान आहे. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, संतोष पवार, राकेश टेळे व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत, पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल जिल्ह्यासह बार्शी परिसरातून किरण मस्तानी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विविध सामाजिक, राजकीय व पत्रकार बांधवांकडून त्यांच्या कार्याचे कौतुक केले जात आहे. हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नसून, समाजातील सर्वसामान्य घटकांच्या संघर्ष व योगदानाची पावती असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.



# सीना नदी काठच्या गावात वीजपुरवठा सुरळीत करा

### मनसेचा आंदोलनाचा इशारा; महावितरणला दिले निवेदन

**मोहोळ,दि.२५ डिसेंबर-**

सीना नदीच्या पुरामुळे खंडित झालेला विद्युत पुरवठा अद्यापही चालू करण्यात आला नाही. त्यामुळे नदीकाठच्या गावातून संताप व्यक्त होत आहे. लवकर विद्युत पुरवठा सुरळीत केला नाही तर मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने शहर प्रमुख शाहू राजे देशमुख यांच्या नेतृत्वाखाली महावितरणचे अभियंता यांना निवेदन देण्यात आले. सीना नदीला मागील ३ महिन्यापूर्वी आलेल्या महापुरामुळे आष्टी, भांबेवाडी, शिरापूर यासह नदीकाठच्या १२ गावांचा विद्युत पुरवठा खंडित झाला होता. काही अपवाद वगळता अद्यापही नदीकाठची गावे अंधारात आहेत. एक तर पूराने शेतकऱ्याची शेती उध्वस्त झाली. पिके वाहून गेली इतकंच काय जमीन ही खरडून गेली. विद्युत पुरवठा सुरू असल्याशिवाय शेतकऱ्याला कोणतीही कामे करता येत नाहीत.महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आता शेतकऱ्यांचा अंत पाहू नये. अन्यथा १० दिवसांत तीव्र आंदोलन करावे लागेल असा इशारा शाहूराजे देशमुख यांच्या नेतृत्वाखालीं उप आभियंता पटवेगार यांना देण्यात आला. यावेळी नागनाथ सोडगे, बबन खरात, किसन सोडगे, अभिमान खरात, गोदावरी सोडगे उपस्थित होते.

# वेळापूर-अकलूज मार्गावर झाले रस्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.२५ डिसेंबर-**

वेळापूर-अकलूज रस्ता अत्यंत खड्डेमय व जीर्ण झाल्याने तो कायम स्वरूपी दुरुस्त करावा तसेच माळिशरस तालुक्यातील विविध प्रमुख रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) माळिशरस तालुक्याच्या वतीने अकलूज-वेळापूर मार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

अकलूज येथील अशोका चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, शिवामृत ते उदयनगर, निमगाव पाटी ते यशवंतनगर अकलूज, वेळापूर-धानोरे, वेळापूर-उघडेवाडी-माळखांबी-चव्हाणवाडी, तसेच मंजूर असूनही प्रलंबित असलेला वेळापूर-निमगाव म्हेत्रे मळा-पिसेवाडी रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची मागणी आंदोलकांनी केली. रिपाइं तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. यावेळी रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व वाहनचालकांना येणाऱ्या अडचणींबाबत एन. के. साळवे, सोमनाथ भोसले, किरण धाईजे,बाळासाहेब धाईजे, सरपंच रजनीश बनसोडे, विजय बनसोडे,रणजित सरवदे, गोपाळ घार्गे,स्वप्निल सरवदे आदींनी मनोगत व्यक्त केले. एस. एम. गायकवाड, शामराव भोसले,रमेश धाईजे, दादाराजे घाडगे, संजयकाका देशपांडे, मारुती खांडेकर, गोपाळकाका घार्गे, आबा बनसोडे, बापूसो पोळके, भास्कर बनसोडे, दिलीप सरतापे, संतोष कांबळे, पोपट गेजगे, सुनील ओवाळ, दादासाहेब नामदास, शिवाजी बनसोडे, भागवत गायकवाड, अशोक बनसोडे, शरद साठे, विनायकराव माने, राजकुमार शिंदे, धनाजी धांडोरे, अजितदादा साठे, डॉ.धनंजय म्हेत्रे, राहुल सराटे, विनायक भगत, शिवाजी मोहिते, प्रदीप सरवदे, बॉबी वाघमारे, जहांगीर आतार, गौतम वाघंबरे, संतोष बनसोडे, शरद साबळे, राहुल गायकवाड, मिलिंद गायकवाड, महेश साठे, महेंद्र धांडोरे, वैभव बनसोडे, लखन साळवे, ऋतिक लोंढे, गणपत कदम, राहुल सातपुते, मनोज सुरवसे, दिलीप वाघमारे, प्रवीण साठे, दीपक भोसले, महादेव नाईकनवरे, गोपी भगत, चंद्रकांत चंदनशिव, राजू नाईक उपस्थित होते. दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता ए. डी. पवार यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले. कार्यकारी अभियंता सुनीता पाटील यांनी दूरध्वनीद्वारे दोन दिवसांत बैठक घेण्याचे आश्वासन दिले. आंदोलनाची तातडीने दखल घेऊन रस्त्यांच्या कामास सुरुवात करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अन्यथा पुढील टप्प्यात बांधकाम विभागाच्या कार्यालयाला टाळे ठोकून हालगीनाद आंदोलन करण्याचा इशारा श्री.सरतापे यांनी दिला.



# कलासाधना मंडळातर्फे वक्तृत्व स्पर्धा व कलोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२५ डिसेंबर -**

येथील कलासाधना सांस्कृतिक मंडळातर्फे विवेकानंद जयंतीनिमित्त वक्तृत्व तसेच कलोत्सव अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या स्पर्धा दि. ९, १० व ११ जानेवारीला पांडुरंग भवन व आदर्श विद्यालयात होणार असल्याची माहिती मंडळाचे श्रीकांत बडवे यांनी दिली.

यासाठी रोख रक्कम, मानचिन्ह, सहभाग प्रमाणपत्र असे पारितोषिकाचे स्वरुप आहे. वक्तृत्व स्पर्धेचे विषय व गट याप्रमाणे : **अ गट- इयत्ता १ली ते ५ वी -** १) माझी शाळा स्वच्छ शाळा सुंदर शाळा २) स्वामी विवेकानंद ३) माझे बाबा ४) माझे आवडते कार्टून ५) माझे गाव ६) माझा आवडता खेळ. **ब गट--इयत्ता ६ वी ते १० वी** - १) स्वच्छ भारतअभियान एक जनआंदोलन २) मला आवडलेले विवेकानंद ३) देशभक्त राजगुरु ४) माझ्या स्वप्नातील भारत ५) माझी आवडती कला ६) आरोग्य हीच खरी संपत्ती. **क गट--इयत्ता १२वी ते खुला गट -** १) पुरस्कारांचा बाजार की खरेच प्रोत्साहन. २) स्वा.सावरकरांची मार्सेलीस समुद्रातील ऐतिहासिक उडी ३) अखंड भारताचे प्रणेते -सरदार वल्लभभाई पटेल ४) स्पर्धा आणि संधी यात अडकलेला युवावर्ग ५) भारतीय परंपरा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ६) शिवरायांचे सागरी आरमारी धोरण ७) वृध्दाश्रम -एक सामाजिक कलंक की काळाची गरज? ८) ए. आय. (कृत्रिम बुद्धिमत्ता) व आपला भविष्यकाळ ९) भारतीय लोकशाही समोरील आव्हाने.

यासोबतच सुंदर हस्ताक्षर,नृत्य, रांगोळी, विविध वेशभूषा याही स्पर्धा होतील. बक्षिस वाटप १५ फेब्रुवारी रोजी मा. आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते होईल. अध्यक्ष बडवेंसह उपाध्यक्ष प्रा. विनायक परिचारक, ज्ञानेश्वर मोरे, डॉ. कैलाश करांडे, अमरसिंह चव्हाण, अभियंता राजेंद्र माळी, रणजीत पवार, अरिहंत कोठाडिया, अक्षय बडवे, डॉ. किरण बहिरवाडे, अभिराज बडवे, प्रा. राजेंद्र मोरे, राजकुमार शहा, प्रा. मंदार परिचारक, राजकुमार आटकळे, बसवराज बिराजदार, महेश अंबिके, डॉ. बसवराज सुतार, डॉ. आनंद भिंगे, अमृतभाई शहा, अनंता नाईकनवरे, महेश देशपांडे, नारायण बडवे, मंदाकिनी देशपांडे, डॉ.मैत्रेयी केसकर, प्रतिभा यादव, आरती बोरखेडकर, वैष्णवी देशपांडे, गौरी देशपांडे, अशोक आवताडे, संतोष कुलकर्णी, अनिरुध्द बडवेपाटील, वा. गो. भाळवणकर, प्रा. सी.जी. जगताप, सारिका कोठाडिया आदी सदस्य विशेष प्रयत्नशील आहेत.



# 'ओंकार'चे चेअरमन थेट फडात; जाणून घेतल्या समस्या

**पिलीव, दि.२५ डिसेंबर-**

ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी निमगाव म (ता. माळशिरस) येथील शेतकरी सुखदेव मगर यांच्या ऊसाच्या फडात जात एकरी १०० टनाच्या पुढे उत्पन्न कसे काढले. एका ऊसाला ४७ कांड्या आहेत हे जाणुन घेत शेतकरी मगर, वाहन मालक अरूण मगर, महिला कामगारांचा सन्मान केला.

ऊसाची पाहणी करून त्यांनी सर्वांच्या समस्या जाणून घेतल्याबद्दल सर्वजण भारावुन गेले. उच्चांकी दर दिल्याबद्दल बोत्रे-पाटील यांचा शेतातच सन्मान करण्यात आला. ज्यांनी एकरी १०० टन उत्पन्न काढले त्यांच्या परिश्रामाचे कौतुक केले. उच्चांकी दर देण्यास कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार बोत्रे-पाटील यांनी केला. यावेळी मॅनेजर भिमराव वाघमोडे, शरद देवकर, शेतकरी सर्जेराव पवार, प्रकाश मगर, शांतिलाल काटकर , सुरेंद्र मगर, अशोक मगर, मल्हारी मगर ,महावीर मगर, शेखर मगर, आण्णा जाधव, सुनिल पांढरे, संतोष पाटील, तानाजी साठे, रामचंद्र पवार व तोडणी कामगार उपस्थित होते.

> ऊसाच्या फडात येऊन आमची विचारपुस करून आमचा सन्मान करणारे बोत्रे-पाटील एकमेव आहेत. यापूर्वी असे कधीच घडले नाहे.
> -बिभीषण कांबळे, ऊसतोड मजूर.



# ‘मराठी’ भारताची भौगोलिक, ऐतिहासिक वारसा जपणारी अभिजित भाषा : श्रीकांत मोरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

आपली मराठी भाषा खऱ्या अर्थाने भारताची भौगोलिक, ऐतिहासिक वारसा जपणारी अभिजित भाषा आहे. त्यामुळे भाषेचे सर्व निकष जाणवतात. संत ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे मराठी असे आमची मायबोली, अमृताची खाण, मातीचा अभिमान, स्वराज्याची शान, मायबोली माझी अशी आपली मराठी भाषा आहे, असे प्रतिपादन मनोरमा मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीकांत मोरे यांनी केले.

मनोरमा बँक परिवार आणि मनोरमा सोशल फाऊंडेशन संचलित मनोरमा साहित्य मंडळी, सोलापूर, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मनोरमा एकदिवशीय साहित्य संमेलनात ते बोलत होते. व्यासपीठावर ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील, कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर, अ.भा.साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा.मिलिंद जोशी, गोवा अकादमीचे अध्यक्ष अनिल सामंत, मराठी विश्वकोष मंडळाचे अध्यक्ष रवींद्र शोभणे, माजी कामगार उपायुक्त संभाजीराव काकडे, वात्रटीकाकार रामदास फुटाणे, संमेलनाचे स्वागताध्यक्षा शोभा मोरे, कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड, कार्यवाह संतोष सुरवसे, संयोजक डॉ.सुमीत मोरे, ॲड. सुरेश गायकवाड, बी.पी. रोंगे, व्यंकटेश कुलकर्णी, डॉ.चैतन्य भंडारी, डॉ.आदित्य पाटील आदींची उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्याला साहित्यिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे.

**मनोरमा मराठी साहित्य संमेलन**

सोलापूर हे बहुभाषिक, संस्कृती व संस्कृतीचे सुंदर संगम असलेले शहर आहे. धार्मिक स्थळे व ऐतिहासिक वारसा लाभला आहे. येथे कन्नड, हिंदी, तेलुगू, उर्दू, दखनी, गुजराती यांसह अन्य भाषा बोलल्या जातात. सोलापूर हे स्वातंत्र्यपूर्व काळातील कापडासाठी भारतासह आशिया खंडात प्रसिध्द होते. सोलापूर जिल्ह्यात चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, बहामनी या राजवंशाने राज्य केले होते. जिल्ह्यामध्ये सापडलेल्या शिलालेखामुळे येथील साहित्याला वेगळेपण, वैविध्य आहे, असेही ते म्हणाले.

सोलापूर जिल्ह्याला भक्ती साहित्याचीही समृध्द परंपरा लाभलेली आहे. सिध्दरामेश्वर यांचे शिवयोगी पीठ, वारकरी संप्रदायाचे केंद्र पंढरपूर, वीरशैव साहित्यामध्ये सिध्दरामेश्वरांनी ६८ हजार वचने लिहिली आहेत. संत जनाबाई, संत चोखामेळा, संत सावता माळी, संत दामाजी, संत कान्होपात्रा, संत कुर्मदास, शुभराय महाराज यांनी श्रेष्ठ दर्जाचे लेखन करून जागतिक साहित्य व्यवहारात सोलापूरच्या भाषेचे आणि साहित्याचे स्थान अधोरेखित केले आहे. पेशवाईच्या काळात शाहीर राम जोशी, स्वामी निगडीकर, श्रीधर स्वामी नाझरेकर यांचे योगदान विचारात घेण्यासारखे आहे. आधुनिक काळात कवी कुंजविहारी यांची राष्ट्रीय कविता आणि साहित्यिक लेखन यांनी सोलापूरच्या साहित्याच्या दबदबा निर्माण केला, असेही त्यांनी सांगितले.

● **साहित्य, संगीतावर प्रेम करणारा राज्यातील पहिलाच जिल्हा :** जेष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन भरविणाऱ्या मनोरमा परिवाराचे कौतुक केले. राज्यातील मराठी शाळा चांगल्या पध्दतीने चालाव्यात, ग्रामीण भाग, वाडी-वस्तीवर पटावर शिक्षक न ठेवता कायमस्वरूपी शिक्षक ठेवावेत, अशी मागणी केली. एकही विद्यार्थी असला तरी त्या ठिकाणी शिक्षक कायमस्वरूपी नेमावा, अशी अपेक्षा त्यांनी संमेलनाद्वारे व्यक्त केली. विश्वास पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास थोडक्यात विशद केला. पाटील यांनी आजवर लिहिलेल्या काही पुस्तक, कादंबऱ्यातील आशयही यावेळी थोडक्यात मांडला. सोलापूर जिल्ह्यातील वाचक, साहित्यिकांचेही त्यांनी भरभरून कौतुक केले.

● **राज्यातील जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारावा :** वात्रटीकाकार रामदास फुटाणे यांनीही आपल्या काही काव्यात्मक पंक्ति सादर करीत उपस्थितांच्या टाळ्यांनी दाद मिळविली. राज्यातील अस्थिर नेत्यांच्या राजकारणावरही त्यांनी खंत व्यक्त केली. राज्यातील जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारणे गरजेचे असल्याचे सांगितले. कारण खासगी शाळांतील विद्यार्थी आणि शासनाच्या शाळात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांत आजही मोठी तफावत दिसून येत आहे. या शाळांतील वास्तवता त्यांनी आपल्या चारोळ्याच्या कवितांतून सादरीकरण केले. एकंदरीत, शासनाने मराठी शाळांतील मुलांकडे लक्ष दिल्यास मराठीचा भविष्यकाळही उज्वल राहील, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

● **काव्यसंमेलनाने संमेलनाची सांगता :** मनोरमा बँक परिवार आणि मनोरमा सोशल फाऊंडेशन संचलित मनोरमा साहित्य मंडळी, सोलापूर, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मनोरमा एकदिवशीय साहित्य संमेलन व राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार सोहळा होटगी रोडवरील पंचतारांकित हॉटेल बालाजी सरोवर येथे पार पडला. या संमेलन सोहळ्यातील प्रमुख उद्घाटन कार्यक्रमानंतर दुपारच्या सत्रात जेष्ठ साहित्यिक विश्वास पाटील, मनोरमाचे सर्व्हेसर्वा श्रीकांत मोरे यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम पार पडला आणि महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील मराठी भाषा या विषयावर परिसंवाद कार्यक्रम झाला. या परिसंवादात डॉ. राजशेखर शिंदे, महाराष्ट्र शासनाच्या मराठी विश्वकोष मंडळाचे अध्यक्ष रवींद्र शोभणे, माजी शिक्षणाधिकारी प्रदीप मोरे यांनी सहभाग नोंदविला. यानंतर काव्य संमेलन पार पडल्यानंतर पुरस्कार सोहळाही तितकाच रंजक होवून संमेलनाची सांगता झाली.

## महत्वाचे...

### एसीएस हॉस्पिटलच्यावतीने हृदयरोगाशी संबंधित जनजागृती प्रदर्शन व प्रात्यक्षिक

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या भैय्या चौक येथील एसीएस हॉस्पिटलतर्फे शनिवारी (दि. २७) सकाळी ९.३० वाजता डफरीन चौकातील आयएमए सभागृहात येथे सर्वसामान्य नागरिकांसाठी हृदयरोगाशी संबंधित जनजागृती प्रदर्शनी व थेट प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले आहे.या प्रदर्शनी आणि प्रात्यक्षिकाचे उद्घाटन प्रिसिजन कॅमशाफ्टचे व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनिष केत, तसेच आर.एम. ई. ए. चे चेअरमन नीलकंठ वाकचौरे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी हृदयविकार तज्ञ डॉ. प्रम ोद पवार, डॉ. सिद्धांत गांधी, डॉ. दीपक गायकवाड - पाटील, डॉ. राहुल कारीमुंगी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.यावेळी प्रगत हृदयविकार उपचार तंत्रज्ञान व अत्याधुनिक यंत्रसामग्री सोलापूरकरांना पाहता येणार आहे. तसेच एन्जोप्लास्टी म्हणजे नेमके काय, ती कशी केली जाते, स्टेंट कसा बसवतात, हृदयाचे छिद्र बंद करण्याची शस्त्रक्रिया कशी केली जाते, आर्टिफिशियल हार्ट म्हणजे काय, हृदयरोगावरील उपचारासाठी ए आय चा वापर कसा होतो याची माहिती नागरिकांना देण्यात येणार आहे. तसेच प्रगत उपचार पद्धतीचे थेट प्रात्यक्षिक, आंतरराष्ट्रीय दर्जाचे तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहण्याची संधी सोलापूरकरांना मिळणार आहे.सध्या हृदयरुग्ण असलेले, यापूर्वी हृदयरोगावर उपचार घेतलेले नागरिक तसेच ज्याला स्वतःच्या आणि आपल्या जिवलगांच्या हृदयाची काळजी आहे, असा प्रत्येकजण या प्रदर्शनीला भेट देऊ शकतो.सोलापूरकरांनी हृदयरोगाबाबत पडणाऱ्या प्रश्नांची सोप्या भाषेत उत्तरे मिळवण्यासाठी या जनजागृती प्रदर्शन आणि प्रात्यक्षिकांना उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ. प्रमोद पवार, डॉ. सिद्धांत गांधी, डॉ. दीपक गायकवाड - पाटील, डॉ. राहुल कारीमुंगी यांनी केले आहे.

Hruday Sankalp Pvt. Ltd. एसीएस हॉस्पिटल



### प्रधानमंत्री आदर्श गाव योजनेमुळे किरनळ्ळी गावचा विकास : सरपंच संगीता भंडारे

**अक्कलकोट, दि. २५ डिसेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील मौजे किरनळ्ळी गावात प्रधानमंत्री आदर्श गाव योजना ही सन २०२१-२२ मध्ये मंजूर झाली होती. यातील आराखड्याप्रमाणे किरनळ्ळी गावात सर्व कामे ग्रामपंचायत मार्फत करण्यात आल्याची माहिती किरनळ्ळी गावच्या सरपंच संगीता भंडारे यांनी दिली. अक्कलकोट तालुक्यातील किरनळी गाव हे सोलापूर जिल्ह्यातील मराठवाड्याच्या सीमेवर आहे. किरनळ्ळी गावच्या सरपंच पदाची धुरा संगीता भंडारे यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी गावच्या विकासाचा ध्यास घेतला आहे. सरपंच संगीता भंडारे यांनी किरनळी गावात विविध विकास कामे करत ग्रामस्थांना सुविधा दिल्या आहेत. गावांमध्ये मागासवर्गीय समाजाच्या स्मशानभूमीमध्ये पाणी पुरवठ्याची सोय, मिरगे प्लॉटमध्ये कॉंक्रिटीकरण, अंगणवाडी वॉल कंपाऊंड चे बांधकाम, अड्डीकदूयाजवळ कॉंक्रिटीकरण रस्ता करणे, आवश्यक ठिकाणी हायमास्ट दिवे बसविणे आदी कामे करण्यात आल्याची माहिती सरपंच संगीता भंडारे यांनी दिली. शासनाच्या विविध योजनांमुळे किरनळ्ळी गावातील घराघरात लाईट, पाणी, शौचालय ही व्यवस्था करण्यात आली आहे. सरपंच संगीता भंडारे यांच्या विकासाच्या दृष्टीमुळे आज किरनळी गावचे रुपडे बदलले आहे. विकास कामांमुळे ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. किरनळी गावच्या विकासासाठी ग्रामस्थांसह ग्रामपंचायत सदस्य यांचे सहकार्य लाभल्याची माहिती सरपंच संगीता भंडारे यांनी दिली. या काम ास ग्रामसेवक शिवपुत्र ढोपरे ,ग्रामपंचायत सदस्य पद्माकर भंडारे, राम भंडारे,तंटामुक्त समिती अध्यक्ष हुसेनबाशा सुभेदार, माजी सरपंच अरुण भंडारे, सुभाष भंडारे, राजेंद्र कणमुसे, साहेबलाल सुभेदार, शंकर गुमते, सिद्धेश्वर सोनकांबळे, मल्लिनाथ उणदे, चंद्रकांत सोनकांबळे, शंकर उणदे, डॉक्टर शिवाजी गायकवाड, प्राध्यापक कैलास भांगे, प्राध्यापक कमलाकर सोनकांबळे आदींचे सहकार्य लाभले आहे.

## फिरण्यास गेलेल्या व्यक्तीचा दुचाकीच्या धडकेत मृत्यू

**बार्शी, दि. २५ डिसेंबर**

बार्शी-पानगाव रोडवर सौंदरे गावाजवळ आज पहाटे एका भरधाव दुचाकीने दिलेल्या धडकेत ५८ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. राजेंद्र जनार्धन जाधव (रा. सौंदरे, ता. बार्शी) असे मृत व्यक्तीचे नाव असून, याप्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी अनंत राजेंद्र जाधव यांचे वडील राजेंद्र जाधव हे दररोजच्या प्रमाणे बुधवारी (दि. २४ डिसेंबर) पहाटे ५.३० वाजता बार्शी-पानगाव रोडने पायी फिरण्यासाठी गेले होते. पहाटे ५.४५ च्या सुमारास सौंदरे गावाजवळ समोरुन (पानगाव बाजूकडून) येणाऱ्या एका विनापरवाना व भरधाव दुचाकीने (क्र. एमएच १३ डीझेड ८२८१) त्यांना जोरदार धडक दिली. ही दुचाकी चुकीच्या बाजूने येत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.या भीषण अपघातात राजेंद्र जाधव यांचा डावा पाय मोडून त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. अपघातानंतर दुचाकी चालक विजय रावसाहेब चव्हाण आणि त्याच्यासोबत असलेला अजय भीमराव जाधव (दोघे रा. पानगाव) यांनी जखमीला तातडीने बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. मात्र, डोक्याला झालेल्या गंभीर दुखापती मुळे उपचार सुरु असतानाच राजेंद्र जाधव यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी मृताचा मुलगा अनंत जाधव याने दिलेल्या फिर्यादीवरुन दुचाकीचालक विजय रावसाहेब चव्हाण याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## ‘सहकार महर्षि’चा ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज,दि.२५ डिसेंबर-**



सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर-अकलूज या कारखान्याने ऊस उत्पादक सभासदांच्या आर्थिक हिताचे रक्षण करताना, ऊसाला दिलेला यथोचित व स्पर्धात्मक दर, कारखान्याचे सुयोग्य प्रशासन व पारदर्शकता, साखर उत्पादनातील तांत्रिक गुणवत्ता, उत्पादन खर्च बचत आणि कारखाना व्यवस्थापनातील विश्वासार्हता यांचा उत्तम संगम व समन्वय साधल्याने जागतिक सहकार वर्षानिमित्त कारखाना सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन व कॉसमॉस को-ऑप बँक लि., यांच्या संयुक्त विद्यमाने कारखान्यास रविवार दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी ग्रीन वर्ल्ड को प्राईड २०२५ पुरस्काराने गौरविण्यात आले.

सहकार महर्षि कै.शंकरराव मोहिते-पाटील उर्फ काकासाहेब यांनी सन १९६० मध्ये या सहकारी साखर कारखान्याची उभारणी करून माळिशरस तालुक्याचे नंदनवन केले तसेच याबरोबर विविध सहकारी संस्थांची व उद्योगांची उभारणी केलेली आहे. यामुळे कारखाना कार्यक्षेत्रात शेतकरी सभासदांचे आर्थिक जीवनमान उंचावले आहे. या उद्योग समूहा मुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती झालेली आहे त्यामुळे कुटुंबांना आर्थिक हातभार लावण्यास मदत झालेली आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व कारखान्याचे चेअरमन साहेब मा.श्री.जयसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली सदरचा कारखाना प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे. कारखान्याच्या संचालिका मा.कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतून सहकारी कारखाना व संलग्न असणाऱ्या सर्व संस्थांमधून सर्व घटकांना सोयी, सवलती व सेवा सुविधा देण्याचा प्रयत्न अविरतपणे करून सामाजिक बांधिलकी जोपासली जात आहे. तसेच विविध उपक्रमाचेही आयोजन करण्यात येत आहे. सहकार महर्षि कारखान्याने सहकाराच्या माध्यमातून ३३ मे.वॅट सहवीज निर्मिती प्रकल्प (वीज उत्पादन), प्रेसमड व बायो फर्टीलायझर, डिस्टिलरी, ईएनए, इथेनॉल, ॲसेटीक ॲसिड, बायोगॅस या उत्पादन प्रकल्पांची यशस्वीपणे उभारणी करून सर्व प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केले आहेत याचे सहकारामध्ये शाश्वत विकासाचे रोल मॉडेल निर्माण केले आहे.

सहकार मूल्यांवर आधारित या प्रगत, पारदर्शक आणि समाजाभिमुख कारखाना व्यवस्थापनाच्या गुणांचा अभ्यास करून राज्यातील नामवंत सहकारी साखर कारखाना म्हणून कारखान्यास सदरचा पुरस्कार कॉसम ॉस बँकेच्या सहकार सभागृहात महाराष्ट्र राज्यातील विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडला. सदरचा पुरस्कार कारखान्यास महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा.बाबासाहेब पाटील, राज्याचे साखर आयुक्त मा. विजय कोलते साहेब व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई प्रशासकविद्याधर अनास्करसो. व कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि, अध्यक्ष ॲड. प्रल्हाद कोकरे यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आला. कारखान्याच्या वतीने व्हाईस चेअरमन मा.श्री.शंकरराव राम चंद्र (आबासाहेब) माने-देशमुख व सेक्रेटरी अनिल काटे यांनी उपस्थित राहून तो स्वीकारला. या ८पुरस्काराने कारखान्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून संचालक मंडळ व्यवस्थापनावरील विश्वास सार्थ झाला आहे. कारखान्यास पुरस्कार प्राप्त झाल्याने सर्व सभासद शेतकरी, अधिकारी, कामगार यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## प्लिंथ इंटिमेशन आता सक्तीचे; नियमभंग केल्यास दंडात्मक कारवाई

### आयुक्त डॉ. ओम्बासे यांचा महत्त्वपूर्ण निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

सामासिक अंतरातील अनधिकृत बांधकाम ास आळा घालण्यासाठी प्लिंथ इंटिमेशन सक्तीचे करण्यात आले आहे. नियमभंग केल्यास दंडात्म क कारवाई करण्यात येणार आहे. सोलापूर म हापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या दि. १ डिसेंबर २०२१ रोजीच्या आदेशानुसार सोलापूर महानगरपालिकेत युडीसीपीआर नियमावलीनुसार संगणकीय प्रणालीद्वारे बांधकाम परवानगी विविध विकास परवाने प्रस्ताव संबंधित मिळकतधारकांच्या कागदपत्रांच्या आधारे नोंदणीकृत लायसन्स इंजिनीअर/आर्किटेक्ट यांच्यामार्फत सादर केले जात आहेत. हा प्रस्ताव सादर करताना नोंदणीकृत लायसन्स इंजिनीअर/आर्किटेक्ट यांच्याकडून "' APPENDIX ‘B’ – Form for Supervision स्वाक्षरीसह सादर करण्यात येतो. या प्रस्तावांची छाननी करून नगर रचना विभागाकडून मंजुरी देण्यात येते. मंजूर नकाशानुसार जागेवर बांधकाम करताना आवश्यक सामासिक अंतर (Setback) राखणे बंधनकारक आहे.मात्र, अलीकडील काळात मंजूर नकाशाप्रमाणे सामासिक अंतर न ठेवता



त्या जागेत वाढीव बांधकाम केल्याचे प्रकार निदर्शनास येत असून, त्यामुळे अनियमित व अनधिकृत बांधकामासंदर्भातील तक्रारींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. या प्रकारांना आळा घालण्यासाठी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ११ जुलै २०२५ रोजी परिपत्रक जारी करून कार्यपद्धती निश्चित करण्यात आली होती.

तथापि, प्लिंथ इंटिमेशनबाबतची कार्यवाही अधिक प्रभावीपणे अंमलात आणण्याच्या दृष्टीने सदर परिपत्रकात सुधारणा करण्यात आली आहे. यानुसार, नगर रचना विभागाकडून मंजुरी देण्यात येणाऱ्या प्रत्येक प्रकरणात UDCPR नियम २.८.४ नुसार Appendix-F नमुन्यात प्लिंथ इंटिमेशन देणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्लिंथ इंटिमेशन ही Architect / Licensed Engineer / Supervisor यांच्याकडून प्रमाणित करण्यात येणार असून, मंजूर नकाशानुसारच प्रत्यक्ष बांधकाम होत असल्याची खात्री यामध्ये दिली जाणार आहे.

प्लिंथ इंटिमेशन सादर करताना संबंधित नोंदणीकृत लायसन्स इंजिनीअर/आर्किटेक्ट यांनी - फोटोसह पोर्टलवर ऑनलाईन प्रमाणित माहिती सादर करणे आवश्यक राहील. जे नोंदणीकृत लायसन्स इंजिनीअर/आर्किटेक्ट या कार्यवाहीचे पालन करणार नाहीत, त्यांच्याविरुद्ध संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्याकडून नोटीस बजावण्यात येईल. नोटीशीद्वारे खुलासा मागवून त्यांना सुनावणीची संधी देण्यात येणार असून, हा खुलासा समाधानकारक नसल्यास संबंधितांवर ऑनलाईन दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.या निर्णयामुळे सामासिक अंतरातील अनधिकृत बांधकामास आळा बसून, मंजूर नकाशानुसार शिस्तबद्ध बांधकाम होण्यास मदत होणार असल्याचे सोलापूर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाने स्पष्ट केले आहे.

**निश्चित केलेली दंडात्मक कारवाई याप्रमाणे**

५०० चौ.मी. पर्यंत क्षेत्रफळाच्या बांधकाम ासाठी पहिला टप्पा ५ हजार रुपये, दुसरा टप्पा २५ हजार रुपये व तिसरा टप्पा १ लाख रुपये. ५०० चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या बांधकामासाठी पहिला टप्पा १० हजार रुपये, दुसरा टप्पा ५० हजार रुपये व तिसरा टप्पा २ लाख रुपये. चौथ्या वेळेस संबंधित इंजिनिअर/ आर्किटेक्ट यांची नोंद ६ महिन्यांसाठी निलंबित करण्यात येऊन बीपीएमएस प्रणालीवर नोंद “Hold” करण्यात येईल. पाचव्यांदा इंजिनिअर/ आर्किटेक्ट यांची नोंदणी पाच वर्षे कालावधी करिता निलंबित केली जाईल.

## बार्शीत रिक्षाचालकावर कोयत्याने जीवघेणा हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २५ डिसेंबर**

शहरातील लहुजी चौक परिसरात मंगळवारी पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास कोयता हातात घेऊन दहशत माजवणाऱ्या इसमामुळे एकच खळबळ उडाली. विनाकारण शिवीगाळ करत एका रिक्षाचालक तरुणावर जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला. नागरिकांच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला असून आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

आदित्य नारायण जाधव (वय २३, रा. लहुजी चौक, बार्शी) हे पहाटे घरी असताना एक अनोळखी इसम हातात धारदार लोखंडी कोयता घेऊन त्यांच्या घरासमोर आला. कोणतेही कारण नसताना तो जोरजोरात अश्लील शिवीगाळ करत दहशत निर्माण करु लागला. आरडाओरड ऐकून परिसरातील रोहित तेलंग, अभिजित लोंढे, योगेश लोंढे तसेच इतर नागरिक घटनास्थळी जमा झाले. यावेळी आदित्य जाधव यांनी त्या इसम ाला शिवीगाळ करण्याबाबत जाब विचारला असता, संतप्त झालेल्या आरोपीने कोयता उगारत आदित्य व जमावाच्या दिशेने धाव घेतली व सर्वांना जीवे मारण्याची धम की दिली. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच नागरिकांनी आरोपीला रोखण्याचा प्रयत्न केला. आरोपी ऐकण्याच्या मनःस्थितीत नसल्याने त्याच्या हातातील कोयता हिसकावून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी झालेल्या झटापटीत कोयत्याची धार लागून आदित्य जाधव यांच्या पाठीच्या उजव्या बाजूला, कमरेजवळ गंभीर जखम झाली, तसेच भिंतीला लागून त्यांच्या उजव्या हाताच्या मनगटालाही दुखापत झाली. नागरिकांनी तत्काळ सतर्कता दाखवत आरोपीला पकडून ठेवले. बार्शी शहर पोलीस काही मि निटांत घटनास्थळी दाखल झाले व आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने आपले नाव लहु सोमनाथ फोपले (वय ४०, रा. निजाम जवळा, ता. परांडा, जि. धाराशिव) असे सांगितले. आरोपी लहु फोपले याच्याविरुद्ध विनाकारण शिवीगाळ, धारदार शस्त्रासह अंगावर धावून जाणे व जीवे मारण्याची धमकी या कलम ान्वये गुन्हा दाखल केला आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ‘ऑर्किड’च्या बालचमुच्या भेटीला सांताक्लॉज

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

नागेश करजगी ऑर्किड स्कुलमध्ये प्रभू येशूख्रिस्त यांचा जन्मदिन अर्थात ख्रिसमस साजरा करण्यात आला. याअंतर्गत आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांबरोबर बालचमुंच्या भेटीला सांताक्लॉज आल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार करजगी यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या सचिवा वर्षा विभुते, स्कुल व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, स्कुलच्या मार्गदर्शिका मीना पारखे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी प्रभू येशूख्रिस्त यांच्या जन्मावर आधारित सुंदर अशा गाण्यावर नृत्य सादर केले. हर्षा गुडपल्ली यांनी सूत्रसंचालन केले.





**महत्वाचे...**

### ‘समृध्दी’च्या वतीने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

**सोलापूर ता.२५ डिसेंबर-**

राष्ट्रीय युवक दिन आणि राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून येथील समृध्दी कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने ११ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे राज्यस्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंडळाचे प्रमुख कार्यवाह संजय सावंत यांनी दिली. यावेळी समृद्धी कलामंचच्या पोस्टरचे प्रकाशन जेष्ठ पत्रकार अविनाश कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. तरुणाईला सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी व सोलापूरच्या विकासा संदर्भात महत्वपूर्ण प्रश्नांवर आपले विचार प्रभावीपणे मांडण्याच्या अनुषंगाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १५ हजार रुपये, ११ हजार रुपये, ७ हजार रुपये, ५ हजार रुपये आणि ३ हजार रुपये तसेच समृध्दी करंडक व प्रमाणपत्र असे बक्षिसाचे स्वरुप राहणार आहे. चला जगुया आनंदाने, राष्ट्र निर्मितीत युवकांची भूमिका, समाजातील नीतीमूल्यांचा ऱ्हास, प्राथमिक शिक्षणातील समस्या व उपाय, संत साहित्याचे योगदान, कृत्रिम बुद्धिमत्ता: संधी व आव्हाने, सोला१पूर जिल्ह्याच्या विकासाची दिशा आणि दशा, सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या समस्या व उपाय, सोलापुरातील नारीशक्तीचा प्रवास काल, आज व उद्या असे विषय राहणार आहेत. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी नाव नोंदणीसाठी डॉ.माधुरी भोसले (८७८८५१८३५५), अमोलिका जाधव (९५११६२८८५१), किरण लोंढे (९०११२७९११२) अथवा श्रीमंत कोळी (९४२०७८०४२१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.




### ‘डब्ल्यूआयटी’च्या भूषण शहरकर यांना पीएचडी

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर येथील इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभागातील संशोधक प्रा. भूषण भारत शहरकर यांना मध्यप्रदेशातील सेहोर येथील मन्सरोवर ग्लोबल विद्यापीठाकडून पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. प्रा. शहरकर यांनी ‘‘नोव्हेल ब्लॉकचेन-पॉवर्ड सिक्युरिटी स्कीम: ॲडव्हान्सिंग क्लाउड-बेस्ड ऑथेंटिकेशन फॉर वेअरेबल हेल्थ मॉनिटरिंग सिस्टिम’’ या विषयावर सखोल व नावीन्यपूर्ण संशोधन प्रबंध सादर केला होता. या संशोधनामध्ये वेअरेबल हेल्थ मॉनिटरिंग सिस्टीम साठी क्लाउड-आधारित प्रमाणीकरण अधिक सुरक्षित व विश्वासार्ह करण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करता येईल, याचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. आरोग्य क्षेत्रातील डिजिटल सुरक्षा, डेटा गोपनीयता आणि प्रणालीची विश्वासार्हता वाढवण्याच्या दृष्टीने हे संशोधन अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जात आहे. या संशोधन कार्यासाठी त्यांना डॉ. मनोज पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रा. भूषण शहरकर यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी व समस्त विश्वस्त, प्राचार्य डॉ. विजय आठवले, तसेच प्राध्यापकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



# मी तोंड उघडले तर...

## काँग्रेसला फटका भाजपाचा फायदा

## ॲड.प्रकाश आंबेडकर यांचा दावा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**

महाराष्ट्रासह देशभरात जोपर्यंत काँग्रेसने ओरबाडण्याचे धोरण सोडत नाही, तोपर्यंत त्यांच्याबरोबर बसायला कुणीही तयार होणार नाही. ज्यादिवशी मी तोंड उघडेन, त्यादिवशी ’काँग्रेस’ला देशभरात मोठा फटका बसेल. मात्र ‘भाजपा’ला फायदा होऊ नये म्हणून मी गप्प आहे, असा खळबळजनक दावा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी केले. गुरुवारी ते सोलापूरच्या दौऱ्यावर आले होते.

यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले, नगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसकडील हिंदू मतदार पूर्णपणे दूर गेला आहे. या निवडणुकीत काँग्रेसला मिळालेले थोडेफार यश हे केवळ आदिवासी भागात विशेषतः विदर्भापुरते मर्यादित आहे. बहुतांश भागांमध्ये काँग्रेसचे पूर्णपणे पानिपत झाले आहे. भारतीय जनता पार्टीवर निशाणा साधताना ते म्हणाले, सन २०१४ पासून ‘भाजपा’ने युतीचे राजकारण केले आहे. मात्र हे राजकारण पूर्णपणे सिलेक्टिव्ह आहे. कधी अजित पवारांना जवळ केले जाते. कधी एकनाथ शिंदेंना बाजूला ठेवले जाते. तर कधी एकनाथ शिंदेंना सोबत घेऊन अजित पवारांना दूर केले जाते. भाजपचे ‘धर-सोड’ धोरण जोपर्यंत संपत नाही, तोपर्यंत कोण कोणाशी युती करेल, हे सांगता येणार नाही.

भारतीय जनता पार्टी लोकशाहीला हुकूमशाहीमध्ये परिवर्तित करीत आहे. १९७५-७६ च्या काळात आणीबाणी आणि हुकूमशाही आम्ही अनुभवली त्याची झलक आता दिसत आहे, असेही त्यांनी सांगितले.

भाजपा सोडून कोणासोबतही युती करा. दोन्ही राष्ट्रवादी, शिवसेना आणि काँग्रेस बरोबर युती केली तर चालेल. युती वा आघाडी करण्याचे सर्वाधिकार त्या-त्या महापालिका क्षेत्रातील जिल्हाध्यक्ष आणि शहराध्यक्षांना दिले आहेत, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

या पत्रकार परिषदेस डॉ.नितीन ढेपे, जिल्हाध्यक्ष अविनाश मडिखांबे, शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, रवी गायकवाड, अतिश बनसोडे, अनिरुध्द वाघमारे, विक्रांत गायकवाड, महेश कांबळे, विनोद इंगळे आदी उपस्थित होते.

**▸ उध्दव ठाकरे यांनी मराठी कॉन्ट्रॅक्टर घडवला का?**
उध्दव ठाकरे वारंवार ‘मराठी माणूस’ अशी घोषणा करतात. मात्र मुंबई महापालिकेत दरवर्षी सुमारे ३० हजार कोटी रुपयांची कंत्राटे दिली जातात. या कंत्राटांमध्ये एकतरी मराठी कॉन्ट्रॅक्टर त्यांनी घडवला का? हे सांगावे, असा सवालही यांनी उपस्थित केला.

**▸ राज ठाकरे यांच्याकडे सत्ता नव्हती**
राज ठाकरे यांना हा प्रश्न विचारता येणार नाही. कारण त्यांच्याकडे सत्ता नव्हती. उध्दव ठाकरे व राज ठाकरे हे सत्तेसाठी नव्हे तर स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी एकत्र आले आहेत, असा टोलाही त्यांनी लगाविला.

**▸ परिवहन सेवा कोलमडली**
सोलापूर शहरात सध्या सहा ते आठ दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. येथील परिवहन सेवा पूर्णतः कोलमडली आहे. सोलापूर महापालिका निवडणुकीत सोलापूरकरांनी वंचित बहुजन आघाडीला संधी दिल्यास अवघ्या तीन महिन्यात दररोज पाणीपुरवठा केला जाईल. परिहवन सेवा पूर्ववत सुरु केली जाईल, असे सांगायलाही ते विसरले नाहीत.



## एमआयएमचे माजी नगरसेवक हुंडेकरीसह १० जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

नई जिंदगी परिसरातील शांती नगजवळील आयेशा नगर येथे सार्वजनिक रस्त्यावर बेकायदेशीररित्या जमाव जमवून विनापरवाना मेळावा घेतल्याप्रकरणी एमआयएमचे माजी नगरसेवक अजहर हुंडेकरी यांच्यासह दहा जणांवर एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या वतीने गुन्हा दाखल करण्यात आला.

एमआयएमचे माजी नगरसेवक अजहर हुंडेकरी, अजहर जागीरदार, शोहेब चौधरी, मुन्वर शेख, जब्बार शेख यांच्यासह इतर चार ते पाच अनोळखी इसमांनी दि.२४ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ९.१५ वाजण्याच्या सुमारास आयेशा नगर येथे सार्वजनिक रस्त्यावर मेळावा घेतला होता.

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता सुरु आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत पाच किंवा अधिक व्यक्तीच्या कोणत्याही संमेलनासह प्रतिबंध करण्यात आला आहे. असे असताना एमआयएमचे माजी नगरसेवक हुंडेकरी यांनी सदर मेळावा घेतला

पोलिस कॉन्स्टेबल महेश रामचंद्र माळी यांनी याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यावरुन भारतीय न्याय संहिता कलम २२३, १८९/२, १९० महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७/३ सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले.

## दोन सराईत गुन्हेगारांची कारागृहात रवानगी

**सोलापूर ता.२५ डिसेंबर-**

हातभट्टी दारू विक्री करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांची सोलापूर जिल्हा मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्याचा आदेश विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी दिला.

राजेश राजाराम आंबट (रा. न्यू सुनील नगर), श्रीनिवास व्यंकटेश दासरी (रा.साईबाबा चौक) अशी त्यांची नावे आहेत. जेलरोड पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांनी प्रस्ताव पाठवला होता. चांगली वर्तणूक ठेवण्याच्या अटीवर २५ हजार रुपयांचे एक वर्ष मुदतीचे अंतिम बंधपत्र घेतले होते. बंधपत्राच्या कालावधीत त्यांच्यावर पुन्हा गुन्हा दाखल झाल्याने त्यांना २५ हजार रुपये दंड भरण्याबाबतची नोटीस देण्यात आली होती. त्यांची सोलापूर जिल्हा मध्यवर्ती कारागृहात ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## ‘महायुती’बाबत स्थानिक नेत्यांशी चर्चा करुन सन्मानजनक तोडगा : पालकमंत्री गोरे

**शिवसेना शिंदे गटाकडून ५० जागांचा प्रस्ताव**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना शिंदे गटाकडून ५० जागांची मागणी करण्यात आली आहे.

‘महायुती’बाबत स्थानिक नेत्यांशी पुन्हा एकदा चर्चा करुन सन्मानजनक तोडगा काढण्यात येणार आहे, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले. हॉटेल बालाजी सरोवर येथे भाजपा आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात बैठक झाली. या बैठकीस माजी मंत्रीद्वय सिध्दाराम म्हेत्रे, उत्तमप्रकाश खंदारे, शिवसेना शिंदे गटाच्या प्रवक्त्या प्रा.डॉ. ज्योती वाघमारे, जिल्हाध्यक्षद्वय अमोल शिंदे, अमर पाटील आदी उपस्थित होते.

२०१६-१७ साली झालेल्या नगरपालिका निवडणुकीवेळी सोलापूर जिल्ह्यात भाजपचे दोन मंत्री होते. त्यावेळी अवघ्या २ नगरपालिका ‘भाजपा’च्या ताब्यात आणि ३१ नगरसेवक निवडून आले होते. यंदाच्या निवडणुकीत मात्र ‘भाजपा’चे ४ नगराध्यक्ष, १३२ नगरसेवक निवडून आलेले आहेत, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, शिवसेना शिंदे गटाचे संपर्क प्रमुख संजय कदम यांनी सांगितले की, पालकमंत्री गोरे यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत शिवसेना शिंदे गटाला ५० जागा देण्यात याव्या, असा प्रस्ताव मांडण्यात आला. स्थानिक पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन मार्ग काढणार असल्याची ग्वाही पालकमंत्री यांनी दिली आहे.

**संभाव्य उमेदवारांचा प्रचार सुरु**

महापालिका निवडणुकीसाठी संभाव्य उमेदवारी मिळणाऱ्या विविध पक्षातील कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आपापल्या प्रभागात आताच प्रचार सुरु केला आहे. लोकांच्या गाठीभेटी घेण्यासाठी डोअर टु डोअर हे उमेदवार जात असल्याचे दिसून येत आहे.



## शरणम् शरणम् अय्यप्पा... पंबावासा शरणम् अय्यप्पा...

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

शरणम् शरणम् अय्यप्पा...पंबावासा शरणम् अय्यप्पा... स्वामीएऽऽऽ शरणम् अय्यप्पा... आदी जयघोष करत मोठ्या भक्तीमय वातावरणात अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील भंडारी सन्निधानम् येथे श्रीअय्यप्पा स्वामी भक्तांनी महापडीपूजा अर्थात १८ पायऱ्यांची पूजा केली.

महापडीपूजानिमित्त ११ हजार ५०० जणांना महाप्रसाद वाटण्यात आले. कार्तिक पौर्णिमा ते मकर संक्रांती अशा ४८ दिवसांच्या कालावधीत अय्यप्पास्वामींची दीक्षा घेतले जाते. सोलापुरात यंदा १०४ भक्तगणांनी ही दीक्षा घेतली आहे. गुरुस्वामी कृष्णन कल्लमपिल्ले यांच्या दिव्य सानिध्यात महापडीपूजासह महागणपती पूजन, होमहवन, अभिषेक, सुब्रमण्यमस्वामी अभिषेक, धर्मशास्ता आवाहनम, महाआरती करण्यात आली. सच्चिदानंदस्वामी, कृष्णाहरी पोट्टावत्री, जगनमोहन क्यातम, मनोहर गुंडेटी, राजू गुज्जेटी, राम स्वामी, चंद्रकांत होटकर यांच्या भजनाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सत्यनारायण भंडारी, रचन भंडारी, प्रकाश चन्ना, भूमण्णा कोंडी, अरविंद जिल्ला, विकास पलगंटी, अनिल चिप्पा, नरेश भंडारी, राकेश गरदास, आयलेश यल्ला, श्रीनिवास सुरा, सुधीर मासम, श्रीनिवास राव, वासुदेव शेरला, नरेश मैले, हरिदास बुरा, संतोष माटेटी, रोहित इप्पलपल्ली, सुहास पल्ली, किरण पल्ली, विशाल नल्ला परिश्रम घेतले.

### जनतेचा भाजपवर विश्वास सिध्द : चव्हाण

**सोलापूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे विकासाभिमुख राजकारण व भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे संघटन कौशल्य आणि अचूक निवडणूक नियोजन यांच्या जोरावर भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्रात प्रथमच नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक निकालात अभूतपूर्व असे यश मिळवले आहे.

कार्यकर्त्यांच्या मुखातून देवेंद्र आणि रविंद्र या जोडगोळीचा नेहेमी होणार आदरार्थी उल्लेख आजच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालांनी आज सार्थ ठरवला. प्रचारगीतातून गाजलेले ‘‘तुमची आमची भाजपा सर्वांची‘‘ हे बोल महाराष्ट्रातील जनतेने खरे करून दाखवले, हे या निकालावरून सिद्ध झाल्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

**खूनप्रकरणी जेलमध्ये असलेल्या**

## नवऱ्यापासून घटस्फोटासाठी बायकोची न्यायालयात धाव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

खुनाच्या प्रकरणात जेलमध्ये असलेल्या नवऱ्यापासून घटस्फोट मिळावा यासाठी बायकोने सोलापूर दिवाणी न्यायालयात घटस्फोटाचा दावा दाखल केला आहे. राज्यातील अशा प्रकारचा हा पहिलाच खटला आहे. दरम्यान, पत्नी नांदावयास यावी, अशा आशयाचा दावा पतीने कौटुंबिक न्यायालयात केला. पण, तो दावा प्रलंबित आहे.

यात हकीकत अशी की, या पती-पत्नीचे २०२१ साली लग्न झाले. लग्नानंतर माहेरवरुन पैसे घेऊन येण्याच्या कारणावरुन पतीने शारीरिक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. दि.१५ जुलै २०२२ रोजी त्यांना मुलगा झाला. सन २०२३ च्या दिवाळीला आई माहेरला नेण्यासाठी आली असताना तिला देखील नवऱ्याने मारहाण केली. आणि घरातून हाकलून दिले. जानेवारी २०२४ मध्ये नवऱ्याने माहेरला येऊन मारहाण केली. पतीविरुध्द पत्नीने कौटुंबिक हिंसाचारसंदर्भात तक्रार दाखल केली. बाळाचा ताबा मिळावा म्हणून मोहोळ न्यायालयात अर्ज दाखल केला. न्यायालयाने तो अर्ज मंजुर करुन बाळाचा ताबा बाळाच्या आईकडे द्यावा, असा आदेश दिला. परंतु, पतीने बाळाला घेऊन न्यायालयातून पळून गेला. दि.२७ एप्रिल २०२५ रोजी पतीने पत्नीच्या वडिलांचा खून केला. त्यामुळे त्याच्यासोबत नाते अस्तित्वात ठेवणे अशक्य आहे, असे या अर्जात म्हटले आहे. या अर्जाची सुनावणी न्यायाधीश संगीता वनकोरे यांच्या न्यायालयात होणार आहे. यात पिडीत पत्नीच्या वतीने ॲड. अभय बिराजदार, ॲड.राहुल गायकवाड तर पतीच्या वतीने ॲड.जयदीप माने, ॲड.मनोज गिरी हे काम पाहत आहेत.

**अशा प्रकारचा राज्यातील पहिलाच खटला**

## रील हिरो आणि रियल हिरो यातला भेद करता येणं गरजेचे : मकरंद अनासपुरे

**‘व्हिजिएस तरंग २०२५’ या तीन दिवसीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ डिसेंबर-**

‘समाजामध्ये जे घडत आहे ते पाहता आजच्या घडीला मुलांना सुसंस्कृत करणे ही खूप मोठी जबाबदारी आहे. रील हिरो आणि रियल हिरो यातला भेद करता येण हे विद्यार्थ्यांसाठी खूप गरजेचे आहे, असे प्रतिपादन सुप्रसिध्द अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी केले.

येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ‘व्हिजिएस तरंग २०२५’ या तीन दिवसीय आंतरशालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या समारोपप्रसंगी बोलताना ते पुढे म्हणाले, आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगला पाहिजे. कारण तीच आपली खरी ओळख आहे. देशप्रेम केवळ घोषणेत असण्यापेक्षा ते कृतीत असणे अधिक महत्वाचे आहे आणि समाजाला आपण काहीतरी देणं लागतो ही जाणीव असणे गरजेचे आहे.




या महोत्सवात पंढरपूरसह सोलापूर, बार्शी, लोणी काळभोर, कोथरूड, छत्रपती संभाजीनगर, सांगली, नवी मुंबईतील उळवे या आठही शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. गायन, नृत्य, वादविवाद, अभिनय यांसारख्या सांस्कृतिक कलाविष्कारांसोबतच धावणे, जलतरण, थाळी फेक, गोळा फेक, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल अशा विविध क्रीडा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले. दरम्यान, श्रीलंका येथे पार पडलेल्या दृष्टिहीन महिलांच्या टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या विजेत्या भारतीय संघाच्या उपकर्णधार गंगा कदम यांनी आपल्या प्रेरणादायी प्रवासाविषयी बोलताना विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर कोणतेही आव्हान पेलता येते असा संदेश दिला. अध्यक्षीय भाषणात संस्थेच्या विश्वस्त आणि महासचिव प्रा.स्वाती कराड-चाटे म्हणाल्या भारतीय ज्ञानपरंपरा आणि आधुनिक शिक्षणपद्धतीचा संगम साधत एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबर मूल्याधारित शिक्षणावर भर देत आहे. आमचे ध्येय केवळ ज्ञानदान नसून, सामाजिक जबाबदारीची जाण असलेले सुजाण आणि संवेदनशील नागरिक घडवणे आहे.

यावेळी राघवेंद्र चाटे, शीतल वर्मा, प्रा.के.सी. मिश्रा, कर्नल डी.के. उपाध्याय, मुख्याध्यापक शिवाजी गवळी, प्राचार्य डॉ. स्वप्निल सेठ यांच्यासह एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या सर्व शाखांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. ओंकार दीक्षीत यांनी सूत्रसंचालन केले. रंजिता चौकेकर यांनी आभार मानले.पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३०८

**तयांचेनि मुखे निघे । तेतुलें आदरें चांगें ।**
**ऐकोनियां आंगें । मनें होती ।।**

प्रकृती पुरुषाचे ज्ञान ज्याला होते, तो ज्ञानी असतो. हा ज्ञानी देहामुळे सर्व तऱ्हेची कामे करतो. परंतु तो कर्मसगांने मळत नाही. आकाश तसे धुक्याने मळत नाही, तसे ज्ञानी व्यक्ती कर्मापासून अलीप्त असतो. बरेच लोक सांख्य योगाव्दारे आत्म्याकडे मन लावतात. तर कित्येक कर्म योगाव्दारे आत्म्याकडे जात असतात. विविध मार्गाचा अवलंब करून लोक भव भ्रमांच्या भोवऱ्यातुन बाहेर येतात. भवभ्रमातुन बाहेर पडण्यासाठी माणसाला पुर्णत: त्यांच्यातील अभिमान काढून टाकावा लागतो. अभिमान काढून टाकल्यानंतर सद्गुरुंच्या वचनावर विश्वास ठेवून कार्य, आचरण करावे लागते. शिष्याला आपण सांगितलेले कळेल काय ? त्याच्यासाठी आपण सांगतो ते योग्य आहे काय ? शिष्याचे हित कशात आहे ? या सर्व प्रश्नाची उत्तरे शोधण्याची जबाबदारी सदगुरु स्विकारत असतात. म्हणून शिष्याचे सदगुरूवर विश्वास ठेवून वागणारे शिष्य सद्गुरूरूप होऊन जात असतात. असे शिष्य सद्गुरु रूप कसे होऊन जातात, हे सांगतांना माऊली म्हणतात, तयांचेनि मुखे निघे । तेतुलें आदरें चांगें ।ऐकोनियां आंगें । मनें होती ।। अर्थात सद्गुरुच्या मुखातुन जेवढे आणि जे बाहेर पडेल तेवढे ऐकुन वागणारे शिष्य अंगाने आणि अंत:करणाने ते तसेच सदगुरू रूप होऊन जातात. गुरू मुखातुन जे शब्द बाहेर पडतील, तेच आपले कर्म, धन इत्यादी ते समजत असतात. गुरुमुखाच्या अक्षरावरून, शब्दावरून ते आपल्या जीवाचे लिंबलोण उतरून टाकतात.



क्षेत्रक्षेत्रज्ञांच्या अनुषंगाने बोलता-बोलता भगवंतानी सदगुरु आणि शिष्य हा विषय घेतला आहे. अर्जुनाला जसे रूचेल पचेल तसे सांगण्याचा भगवंताचा प्रयत्न आहे. वायुच्या संयोगांने तसे पाण्यावर लाटा येतात, त्याप्रमाणे या क्षेत्रक्षेत्रज्ञांच्या एकमेकांच्या संबंधात सर्व प्राणी जन्म पावत असतात. अखिल चराचर आणि जे काही शरीरधारी जीव या संज्ञेने ओळखले जातात, ते सर्व क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ या दोघांच्या संयोगापासून उत्पन्न झालेले असतात. हे सर्व भुतमात्र क्षेत्र-क्षेत्रज्ञांपासुन उत्पन्न होत असल्याने ती सर्व एकच असल्याचा अर्जुनाने अनुभव घ्यावा असे भगवंताना वाटते, अर्जुना भुतमात्राच्या बाबतीत तु भेदभावाला तुझ्या अंत:करणात अजिबात जागा देऊ नकोस असे भगवंत म्हणाले. अर्जुनाचे भाग्य फार थोर आहे. त्याच्या मनात प्रश्न उपस्थित होण्याआगोदरच भगवंत त्याचे प्रश्न, शंका ओळखून स्व:तच स्पष्टीकरण करीत असतात. अर्जुनाला ऐकण्याची जेवढी ईच्छा असेल त्यापेक्षाही भगवंताला सांगण्याची जास्त ईच्छा असल्याचे भगवंताच्या बोलण्यावरून जाणवते. आपणही अर्जुनाप्रमाणे भाग्यशाली आहोत, कारण आपल्या मनात प्रश्न, शंका उत्पन्न होण्यापुर्वीच माऊली त्या सर्व शंका, प्रश्नाचे स्पष्टीकरण करीत आहेत, माऊलीच्या ओव्यांचा सहवास आपल्या मनात कसलीही शंका राहू देणार नाही यात शंका नाही. जय जय राम कृष्ण हरी ।

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# महापालिका प्रशासनाने काढले एकूण ३११५ बॅनर, १०१ झेंडे

## आदर्श आचारसंहितेचे सर्वांनी पालन करावे : अतिरिक्त आयुक्त वीणा पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

निवडणूक आयोगासाठी निवडणूकांच्या काळात माध्यमे आयोगाचे कान आणि डोळे आहेत. माध्यमात पैसे किंवा वस्तूच्या मोबदल्यात (प्रिंट किंवा इलेक्ट्रॉनिक्स) कोणतेही प्रसारीत किंवा प्रकाशित वृत्त यावर माध्यम संनियत्रंणचे विशेष लक्ष व नियत्रंण राहणार आहे, असे अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी राजकीय पक्ष प्रतिनिधी, इच्छुक उमेदवार यांच्याकरिता आयोजित बैठकीदरम्यान स्पष्ट केले.

१५ डिसेंबर २०२५ पासून शहरांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याकरिता एकूण ३११५ बॅनर फलक,१०१ झेंडे हे काढून टाकले आहेत. आदर्श आचारसंहितेचे पालन हे प्रत्येकाने करायचे असून, कोणताही पक्ष अथवा उमेदवार यांनी धार्मिक तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करू नये. प्रतिस्पर्ध्यांच्या खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर



टीका करण्यात येऊ नये. तसेच प्रार्थना स्थळाचा निवडणूक प्रचाराचे व्यासपीठ म्हणून वापर केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबत राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांच्याकडील ४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या आदर्श आचारसंहिता बाबत एकत्रित आदेशातील सर्व सूचना या सर्व उपस्थितांना देण्यात आल्या व आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याचे आव्हान करण्यात आले.

इलेक्ट्रॉनिक माध्यमे व सोशल मीडिया जसे की टीव्ही, रेडिओ, फेसबुक, इंस्टाग्राम ,ट्विटर इत्यादी यांचा वापर करून प्रचार करण्याबाबत कोणत्या दक्षता घ्याव्यात याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

सोलापूर महानगर पालिके करिता आयुक्त तथा निवडणूक अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. यामध्ये महानगरपालिका आयुक्त (अध्यक्ष) , पोलीस आयुक्त (सदस्य),अतिरिक्त आयुक्त -१( सदस्य),आचारसंहिता कक्ष प्रमुख (सदस्य),जनसंपर्क अधिकारी म.न.पा सोलापूर (सदस्य सचिव) आदी सदस्य आहेत.

### प्रचाराबाबतची पूर्व परवानगी, प्रमाणीकरण बंधनकारक

नॉर्थकोट प्रशाला येथे सदर समितीचे व मीडिया कक्षाचे कामकाज सुरु करण्यात आलेले आहे. याबाबतची माहिती आज रोजी सर्व राजकीय पक्ष प्रतिनिधी उमेदवार देण्यात आली. यामध्ये उमेदवारांनी प्रचार करीत असताना प्रचाराबाबतची पूर्व परवानगी व प्रमाणीकरण करणे शासनाच्यावतीने बंधनकारक करण्यात आलेले आहे. याबाबतही माहिती देण्यात आली.



# दिव्यांगाना धनादेश केला सुपूर्द; सीईओ स्वत: बसले जमिनीवर

### सीईओ कुलदीप जंगम यांनी दिव्यांगाना दाखवली संवेदनशीलता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी कोणतीही औपचारिकता न ठेवता एका दिव्यांग बांधवासोबत खाली बसून त्यांनी धनादेशाचे आपुलकी व सन्मानाने करून आपला मनाचा मोठेपणा दाखविला.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रा.पं.सालसे (ता. करमाळा) येथे ग्रामपंचायत तपासणी दरम्यान जिल्हा परिषद प्रशासनाचा एक अत्यंत संवेदनशील व भावनिक क्षण अनुभवास आला. सालसे गावातील या वेळचा तो क्षण केवळ धनादेश देण्याचा नव्हता तर तो दिव्यांग बांधवांना एक विश्वास देण्याचा, व आत्मसन्मान जागवण्याचा होता. शिवाय जिल्हा परिषदेचे प्रशासन हे सर्वसामान्य माणसाच्या बाजूने उभे आहे याची जाणीव करून देण्याचा होता.

यावेळी धनादेश मिळताच दिव्यांग बांधवांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे अश्रू आणि समाधानाचे भाव उपस्थितांच्या प्रत्येकाच्या डोळ्यांत पाणी आणणारे होते. जिल्हा परिषदेच्या प्रशासनाकडून आम्हाला मिळालेली ही मदत आमच्या आयुष्याला नवी दिशा देण्यासाठी वापरणार आहोत तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये आम्हीही सक्रियपणे सहभागी होऊ असा आशावादही यावेळी दिव्यांग बांधवांनी व्यक्त केला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) सूर्यकांत भुजबळ, गट विकास अधिकारी डॉ. अमित कदम, सी. आर. सी. उमेश येळवणे, सरपंच सतिश ओहोळ, माजी उपसरपंच सुदामती घाडगे, दशरथ घाडगे, ग्रामपंचायत अधिकारी अनिल कब्जेकर, सदस्य मधुकर हांडे, गाजराबाई काळे, अशोक सालगुडे, समुदाय वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहल राशनकर, मुख्याध्यापक हेळगर यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर व ग्रामस्थ उपस्थित होते.

# राष्ट्रवादीचे किसन जाधव, नागेश गायकवाड यांचा अखेर भाजपात प्रवेश

### पालकमंत्री जयकुमार गोरे यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आणि सोलापूर महानगरपालिकेतील माजी गटनेते किसन जाधव आणि माजी नगरसेवक नागेश गायकवाड यांनी बुधवारी रात्री उशिरा भारतीय जनता पार्टी प्रवेश केला. हॉटेल बालाजी सरोवर येथे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश झाला.



यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, भारतीय जनता पार्टीत प्रवेश केल्यामुळे आपल्या भागाचा, प्रभागाचा तसेच शहराचा विकास अधिक चांगल्या पद्धतीने करता येईल. अशीच भावना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा मनपाचे माजी गटनेते किसन जाधव, माजी नगरसेवक नागेश गायकवाड यांच्यासारख्या अनेक नेत्यांची आहे. त्यांचे शहरातील समाजकारण आणि राजकारणात चांगले नाव आहे. ते भारतीय जनता पार्टीच्या कुटुंबात आल्याचा आनंद आहे. जाधव आणि गायकवाड यांच्या प्रवेशामुळे प्रभाग क्रमांक २२ मधील चारही उमेदवार भारतीय जनता पार्टीच्या चिन्हावर निवडून येतील, याचा आम्हाला विश्वास आहे, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे याप्रसंगी म्हणाले. याप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी नगरसेवक विनायक कोंड्याल, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगांवकर आदी उपस्थित होते.

याप्रसंगी टकारी समाजाचे युवक अध्यक्ष विनोद जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस युवकचे प्रदेश सरचिटणीस चेतन गायकवाड, टकारी समाजाचे माजी अध्यक्ष सचिन जाधव, अमोल लकडे, सागर कांबळे, दत्ता वाघमारे, उमेश जाधव, स्वप्निल शिंदे व माऊली जरग आदींनीही भाजपामध्ये प्रवेश केला.

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५**
**विक्रम संवत् २०८२ । शके - १९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - पौष शु. षष्ठी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- शततारका (०८.५९)**
**योग - सिद्धी (१४.००) ।**
**करण - गर (२५.३०)**
**राहू काल : गुरुवार : दु. १.३० ते ३.००**

**दिनविशेष : १९१४: कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी आयुष्य वाहून घेणारे डॉ. मुरलीधर देविदास ऊर्फ बाबा आमटे यांचा जन्म.**
**१९१७: साहित्यिक डॉ. प्रभाकर माचवे यांचा जन्म.**
**१९९७: विंदा करंदीकर यांना महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार.**
**२००६: अभिनेते दाजी भाटवडेकर यांचे निधन.**

## सोलापुरातील पूरग्रस्तांना मदतीचा हात

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने सोलापूर येथे अलिकडच्या पुरामुळे बाधित झालेल्या समुदायांना आपत्तीत मदतीचा हात पुढे केला आहे. उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने प्रभावित भागातील १ हजार कुटुंबांना रेशन किटचे वाटप केले. प्रत्येक किट एका महिन्यासाठी चार जणांच्या कुटुंबाला आधार देण्यासाठी तयार केले होते. ज्यामुळे पुनर्प्राप्ती टप्प्यात आवश्यक अन्नपदार्थांची उपलब्धता राखण्यास मदत होते. या उपक्रमामुळे ४ हजारहून अधिक व्यक्तींना मदत मिळाली आणि २ डिसेंबर २०२५ रोजी हे वितरण पूर्ण झाले आहे.

# जयकुमार गोरे शब्दांचे पक्के.....!

**''जब दोस्त बनाके काम हो सकता है तो फिर दुश्मन क्यू बनाये..!**

जयकुमार गोरे हे शब्दाचे पक्के आहेत.. ''जब दोस्त बनाके काम हो सकता है, तो फिर दुश्मन क्यूँ बनाये'' हा संवाद फक्त सिनेमातला नाही, तर सोलापूरच्या राजकारणात प्रत्यक्ष उतरलेला आहे. आणि तो उतरवणारे आहेत सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे उर्फ जयाभाऊ...जयाभाऊंच्या एका भाषणातच त्यांची राजकीय भूमिका स्पष्ट होते. '' जयकुमार गोरे शब्दाचा पक्का आहे. सहज कुणाला शब्द दिला तर पूर्ण झाल्याशिवाय सोडत नाही, मग कुणीही मधे आले अन् काहीही घडलं तर फरक पडत नाही. आपण असंच आहे. पसंत पडलं तर व्हय म्हणा... आपल्याला काही फरक पडत नाही. आपला स्वभाव असाच आहे. आपण भूमिका घेऊन काम करतो.. माझा इतिहास नाही अन् भूगोलही नाही. माझा कारखाना नाही. बँक नाही. माझे वडील काही आमदार - खासदार नव्हते. आपला इतिहास आपणच लिहायला चालू केला. आई - वडिलांनी जन्म दिला आणि तिथून पुढे आपला इतिहास लिहायला चालू केला. त्यामुळे फार काही चिंता करत नाही. लिहू बी आपण अन् पुसू बी आपणच.... यामुळे फरक पडत नाही....!''



हे भाष्य आहे, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणजेच जयाभाऊ यांचे.....! हे शब्द आत्मकथन नाहीत, तर आत्मविश्वासाचे जाहीर घोषवाक्य आहे. या भाषणातून जया भाऊ हे किती शब्दाचे पक्के आहेत याची खात्री पटते.. यातून आत्मविश्वास आणि विकासाची दूरदृष्टी दिसून येते. भूमिका घेऊन काम कसे करतात याची प्रचिती जयाभाऊ यांच्या कार्यातून स्पष्ट होते. राजकारणात अनेक जण शब्द देतात, पण तो पाळतातच असे नाही. ते ''शब्दाचे पक्के'' म्हणून ओळखले जातात.




काही दिवसांपूर्वीच सोलापूर जिल्ह्यातील बारा नगरपालिकांच्या निवडणुकीचा निकाल लागला. त्यानंतर विरोधकांसह काही जणांनी पालकमंत्री गोरे झाले फेल... निवडणुकीत भाजपा अपयशी... अशा आशयाचे निष्कर्ष काढले... कॉमेंट्स केले....! पण राजकारणात आकडे बोलतात, अफवा नाही. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापुरात येऊन नगरपालिकेच्या निवडणूक निकालावर खुलासा केला. या निवडणुकीत भाजपा अपयशी ठरला नाही. तर अपेक्षित यश मिळाले नाही, असे स्पष्ट केले. सन २०१६-१७ मध्ये झालेल्या सोलापूर जिल्ह्यातील नगरपालिकेच्या निवडणुकीत त्यावेळी भाजपाचे दोन नगराध्यक्ष निवडून आले होते. तर सर्व मिळून एकूण ३१ नगरसेवक होते. त्यानंतर यावर्षी नुकत्याच झालेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात भाजपाने वास्तविक पाहता चांगले यश मिळवले आहे. जिथे भाजपचे अस्तित्व नव्हते तिथे भाजपाला यशस्वीपणे पोहोचवण्यात यश मिळवले आहे.

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात भाजपला पोहोचवता आले. या नगरपालिका निवडणुकीत भाजपचे चार नगराध्यक्ष निवडून आले. तेथे सत्ता आली. जिल्ह्यात एकूण १३२ नगरसेवक विजयी झाले. संख्याबळाच्या दृष्टिकोनातून पाहिले तर भाजपाचे हे मोठे यश आहे. याच निवडणुकीत भाजपा एक नंबर वन ठरला आहे. यावरून पालकमंत्री ''जयाभाऊ'' यांची ''रणनीती'' यशस्वी झाली असल्याचे चित्र दिसून येते. पालकमंत्री या नात्याने या जिल्ह्यात भाजपाचा विस्तार करतानाच ज्या ठिकाणी भाजपा कमजोर आहे त्या ठिकाणी जोर लावून सक्षम करण्याचा प्रयत्न केला, अशी जनमानसात चर्चा आहे.

इतर पक्षातील लोकांना प्रवेश दिला जात असल्याची टीका विरोधकांबरोबरच खुद्द भाजपा अंतर्गत होत आहे. वास्तविक पाहता ज्या ठिकाणी भाजपा कधीही निवडून आले नाही त्या ठिकाणी सोलापूर शहर - जिल्ह्यात इनकमिंगवर भर दिला. विशेष म्हणजे काँग्रेस पक्षातील मातब्बर माजी नगरसेवकांना भाजपात आणले. ''जब दोस्त बनाके काम हो सकता है तो फिर दुश्मन क्यू बनाये....'' हा वन्स अपॉन टाईम या चित्रपटातील डायलॉग जयाभाऊंनी वास्तवात उतरवला आहे.

मोठ्या प्रमाणात बेरजेचे राजकारण पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी करून दाखवले आहे. आरोप प्रत्यारोप टीका होत असली तरी एक दूरदृष्टी ठेवून भाजपाला सक्षम करण्याच्या दृष्टिकोनातूनच एक रणनीती आखून ती वास्तवात उतरवली. शेवटी राजकारणात ''जो जीता वही सिकंदर'' हा नियम महत्त्वाचा ठरतो. हेच व्हिजन घेऊन पालकमंत्री म्हणून जयाभाऊ यांनी राजकीय पटलावर खेळी खेळल्या आहेत. सोलापूरच्या राजकीय पटावरील ते ''वजीर'' ठरले आहेत.

सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचा प्रयत्न त्यांनी नेहमीच केला आहे. सोलापुरात देवेंद्र कोठे आणि सचिन कल्याणशेट्टी या दोन आमदारांसह पालकमंत्र्यांचा गट असल्याचे बोलले जाते. परंतु अशी टीका होत असली तरीही मोठ्या मनाने आ. विजयकुमार देशमुख आणि आ. सुभाष देशमुख यांच्या घरी जाऊन जयाभाऊंनी सकारात्मक चर्चा करत सर्वांना मान आणि सन्मान दिला. हे कुणीही नाकारणार नाही.

सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक शहरातील तीनही आमदार आणि शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्या नेतृत्वाखाली होईल, असे दिलदारपणे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करत सोलापूरची विमानसेवा सुरू केली. उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून प्रशासनाला प्रोत्साहन दिले. सोलापुरात आयटी पार्क उभारणे याला मान्यता मिळाली. अनेक कामे मार्गी लावली. विरोधकांनाही सन्मानाची वागणूक पालकमंत्री म्हणून नेहमीच दिली. इतरांवर टीका करताना कधीही मर्यादा ओलांडली नाही. साताराचे असले तरीही सोलापूरची नाळ जुळवली. वेळोवेळी सोलापुरात येऊन प्रशासकीय तसेच राजकीय पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. यापूर्वी इतर जिल्ह्यातील पालकमंत्री लाभले.

ते सोलापूरला किती वेळा हजेरी लावत होते या संदर्भात होणाऱ्या उघड उघड टीका आज ही सर्वश्रुत आहेत. वेळोवेळी ''जयाभाऊ'' सोलापुरात येत असल्याने सातारकरांपेक्षा सोलापूरकर म्हणूनच त्यांची आता नवीन ओळख निर्माण होऊ घातली आहे. महापालिका निवडणुकीसाठी तर ते तळ ठोकून राहणार आहेत. पालकमंत्री म्हणजे एक जबाबदारी हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे.

अनेक विकास कामे मार्गी लावली. सोलापूरकरांच्या विविध मागण्या आणि अपेक्षा पूर्ण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. दिलेला शब्द पूर्ण केला. सहज कुणाला शब्द दिला तर पूर्ण केल्याशिवाय सोडत नाहीत. यामुळेच भाजपावरील विश्वास वाढला. परिणामी महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपाकडे तब्बल बाराशे इच्छुकांनी अर्ज दाखल केले. यापूर्वी असे कधीही घडले नव्हते.

जुन्या नव्यांचा समन्वय साधला. सोलापूर महापालिका निवडणुकीत आपकी बार ७५ पारचा नारा घेऊन सर्वांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.एक ''धुरंधर'' नेता म्हणून पालकमंत्री ''जयाभाऊ'' यांची ओळख निर्माण होत आहे.

# हल्ला करुन गंभीर दुखापत केल्याप्रकरणी आरोपींना जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

महंमद साहब जावेद शेख (रा. ५१३ राहुल गांधी झोपडपट्टी सोलापूर) यांना आरोपी नामे समीर उर्फ अब्दुल्ला रोकडा, जिलानी शेख, सिकंदर शेख, आसिफ शेख, शाहीर शेख ,दाऊद अशपाक शेख राहणार मुस्लिम पाच्छापेठ सोलापूर यांनी ते चालवत असलेल्या इंस्टाग्राम झिरो चार या ग्रुप वर तु का येत नाही म्हणून फिर्यादी हे दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास त्यांचे फळ विक्रीचा व्यवसाय बंद करून जात असताना बाहुबली कार्पेटच्या समोर समीर रोकडा, जिलानी शेख, असिफ शेख, सिकंदर शेख, शाहीर शेख, दाऊद शेख व इतर दहा ते बारा लोक यांनी विटाने लाकडी दांडक्याने मारहाण केली.

समीर रोकडा असिफ शेख व जिलानी शेख त्याने त्यांच्या हातातील चाकूने फिर्यादी व त्याच्या मामाचा मुलगा सुफियान त्याच्या हातावर व कपाळावर वार करून गंभीर दुखापत केली म्हणून फिर्याद जेलरोड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला होता. त्यावरून आरोपी समीर रोकडा जिलानी शेख असिफ शेख यांना पोलिसांनी १० डिसेंबर २०२५ रोजी अटक करून मे. कोर्टासमोर हजर केले असता कोर्टानी आरोपींना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती त्यानंतर पुन्हा पोलिसांकडून पाच दिवसाची पोलीस कस्टडीचे मागणी करण्यात आली होती.

परंतु कोर्टाकडून सदरची मागणी फेटाळून आरोपींना न्यायालयीन कोठडीत रवाना करण्यात आले होते त्यानंतर आरोपीच्या वतीने ॲड. डी.एन. भडंगे व ॲड. एन.एन. भडंगे यांनी आरोपींच्या जामीनाचा अर्ज ठेवला होता. या जामीन अर्जास सरकारी वकिलांकडून तसेच मूळ फिर्यादीच्या खाजगी वकिलांकडून तीव्र विरोध दर्शवण्यात आला तसेच मूळ फिर्यादीकडून कलम वाढीचा अर्ज दाखल केला होता तसेच आरोपीला जामीन मिळू नये म्हणून फिर्यादी व साक्षीदाराचे प्रतिज्ञापत्र दाखल करून साक्षीदारांच्या हातावर ३५ टाके पडले आहेत व कपाळावर ६ टाके पडले आहेत अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र दाखल करून त्यांचे फोटोग्राफ्स दाखल करून त्यांना कोर्टात समक्ष हजर करून आरोपीच्या जामीन अर्जावर तीव्र विरोध दर्शवून अद्याप तपास पूर्ण झालेला नाही.

तसेच आयपीसीचे कलम ३०७ हे वाढण्याची दाट शक्यता असल्याने आरोपींना जामीन देण्यात येऊ नये असा युक्तिवाद केला होता परंतु आरोपीच्या वतीने सदर गुन्ह्यातील कलम हे सध्याच्या केसला लागू पडत नाहीत तसेच आरोपींनी कोणताही गुन्हा केलेला नाही आरोपी हे मागील तेरा दिवसापासून कस्टडीमध्ये आहेत व मूळ फिर्यादी कडून जाणून-बुजून आरोपींच्या जामीन अर्जावर सुनावणी होऊ नये म्हणून एनकेएन प्रकारे अर्ज देऊन विलंब लावला जात आहे, असे युक्तिवाद केला. कोर्टानी आरोपीकडून केलेला युक्तिवाद व बचाव ग्राह्य मानून मे.ज्युडीशीयल मॅजेस्ट्रेट वर्ग एक एम.पी.मर्ढेकर यांनी आरोपींना २५ हजारच्या जामीनावर साक्षीदारांवर दबाव आणणार नाही तसेच पोलीस स्टेशनला हजेरी लावून आरोपींचा जामीन अर्ज मंजूर केला. या आरोपीच्या वतीने ॲड. डी. एन. भडंगे व ॲड. एन.एन.भडंगे, ॲड. योगेश पवार, ॲड. दिपाली गायकवाड यांनी काम पाहिले

## महत्वाचे...



### परमशेट्टी हायस्कूलमध्ये राष्ट्रीय गणित दिन उत्साहात संपन्न

**अक्कलकोट, दि.२५ डिसेंबर-**

थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त श्री एस जी परमशेट्टी हायस्कूलमध्ये राष्ट्रीय गणित दिन उत्साहात संपन्न झाला.

दुधनीतील गणित शिक्षक शांतेश धोडमनी, प्राथमिक कन्नड शाळेचे शिक्षक गणपती पवार ,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश कुंभार, पर्यवेक्षक एल.एस. गद्दी व अन्य शाळेतील शिक्षक वर्ग यांच्या उपस्थित पार पडला. प्रभारी मुख्याध्यापक एम. एस. स्वामी अध्यक्षपदी होते. यावेळी विद्यार्थ्यांनी थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचे महत्व पटवून देणारे भाषण, गणितीय समूहगीत, गणित कोडे, गणित शायरी असे विविध कार्यक्रम सादर केले. यामध्ये उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. अविनाश भैरुणगी यांनी प्रास्ताविक केले. गणपती पवार, धोडमनी, चंद्रशेखर खंडाळ यांचे मनोगत झाले. अध्यक्षीय भाषणात श्री. स्वामी यांनी मार्गदर्शन केले. कुमारी साक्षी सिन्नूर व कुमारी लक्ष्मी जंबगी यांनी सूत्रसंचालन केले. कुमार आशिष येगदी यांनी आभार मानले. गणित विभाग प्रमुख सिद्धाराम नुला, गणित शिक्षक चंद्रशेखर खंडाळ, अविनाश भैरुणगी, श्रुती दिवटे, महादेवी कोरे, शाळेतील अन्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



### कृषी कन्यांकडून शेतकरी महिलांना मूल्यवर्धित पदार्थांचे प्रशिक्षण

**टेंभुर्णी, दि.२४ डिसेंबर-**

लवंग (ता. माळशिरस) येथे रत्नाई कृषी महाविद्यालय, अकलूज येथील कृषी कन्यांनी शेतकरी महिलांना पपईपासून मूल्यवर्धित पदार्थ तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्नित रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत मंगळवारी कृषी कन्यांनी लवंग गावास भेट दिली. यावेळी त्यांनी महिलांना पपईपासून 'टुटी-फ्रुटी' तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष दाखवून दिली. मूल्यवर्धन म्हणजे कच्च्या शेतमालाचे स्वरूप बदलून उच्च गुणवत्तेचे अंतिम उत्पादन तयार करणे होय. त्यामुळे उत्पादनाचे पोषणमूल्य वाढते तसेच काढणीनंतर होणारे नुकसान कमी करण्यास मदत होते, असे मार्गदर्शन कृषी कन्यांनी यावेळी केले. या प्रात्यक्षिकात कृषी कन्या प्राजक्ता जाधव, गौरी होले, प्रेरणा पवार, ऋतुजा पवार, वैष्णवी शेळके, वैष्णवी खाडे, साक्षी डोंबाळे व सीमा सतपुते यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, प्राचार्य आर. जी. नलावडे, कार्यक्रम समन्वयक एस. एम. एकतपूरे, कार्यक्रम अधिकारी प्रा. एम. एम. चंदनकर व प्रा. एच. व्ही. खराडे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी लवंग गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बार्शीची वारणा दूध डेअरीला भेट

**बार्शी दि.२५ डिसेंबर**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित ,महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बार्शीची इयत्ता अकरावी कला शाखेची कौशल्याधारित शिक्षण शालेय उपक्रमांतर्गत वारणा दूध डेअरी व अॅग्रो इंडस्ट्रीज लि. शाखा बार्शी येथे क्षेत्र भेट आयोजित करण्यात आली होती. या क्षेत्र भेटी दरम्यान वारणा दूध संघ बार्शीचे जनरल मॅनेजर प्रशांत घेवारी व प्रोडक्शन मॅनेजर प्रदीप मगर यांनी सर्वांचे स्वागत केले. नंतर प्रदीप मगर यांनी दूध संकलन, दूध शीतकरण, पाश्चरायझेशन, दूध पॅकेट पॅकिंग या सर्व प्रक्रियेची प्रत्यक्ष सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच तेथील प्रत्येक विभाग सांभाळणारे कर्मचारी, त्यांचे कॉलिफिकेशन, त्यांना असणारे मशीन दुरुस्तीचे कौशल्य याबद्दल सविस्तर व सखोल माहिती दिली. या विद्यार्थ्यांनी दिलेल्या क्षेत्र भेटीसाठी त्यांनी समाधान व्यक्त केले. कला विभाग प्रमुख संजय बागल यांनी सर्व वारणा डेअरीच्या कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले. विद्यालयाच्या प्राचार्य के.डी.धावणे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले. या सदर क्षेत्र भेटीसाठी विभाग प्रमुख एस. बी .बागल, के. आर. जाधव , जे.पी.डमरे व सर्व विद्यार्थी यांनी वारणा दूध डेअरीला भेट दिली.

### भाकपच्या शताब्दी वर्षानिमित्त बार्शीत आज व्याख्यान

**बार्शी, दि.२५ डिसेंबर**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असून, त्याग, संघर्ष आणि बलिदानाच्या शताब्दी वर्षानिमित्त सोलापूर जिल्हा कमिटीच्यावतीने 'बुद्धीजीवी वर्ग व कष्टकऱ्यांची चळवळ' या विषयावर सोलापूरचे लेखक व पत्रकार सरफराज अहमद, तसेच 'फॅसिझमची नवी रुपे' या विषयावर भाकप माजी राज्य कार्यकारिणी सदस्य कॉ. प्रा. तानाजी ठोंबरे यांचे व्याखायन होणार आहे. अध्यक्षपदी कॉ. डॉ. प्रविण मस्तुद आहेत. कार्यक्रम आज शुक्रवार दि. २६ डिसेंबर रोजी आयटक कामगार केंद्र भगवंत मैदान येथे होणार आहे. या कार्यक्रमासाठी कष्टकरी जनतेने उपस्थित राहण्याचे अहवान सोलापूर जिल्हा कौन्सीलच्यावतीने करण्यात आले आहे.

# बँकेत न जाता पीक कर्ज; सोलापूर जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर उपक्रम सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

शेतकऱ्यांना पिक कर्ज मिळविण्यासाठी अनेकदा बँकेची पायरी चढावी लागते. मात्र काही तरी त्रुटी काढून पात्र असणार्या शेतकर्यांनाही पिक कर्ज मिळत नसल्याची ओरड शेतकर्यांकडून होत होती. या पार्श्वभूमीवर शेतकर्याकडून ई सेवा केंद्र व सेतू सुविधा केंद्रात पिक कर्ज मागणीचा अर्ज ऑनलाईन प्रणालीने भरुन घेण्यात येत असून पात्र शेतकर्यांना एका तासात कर्ज मंजूरी मिळणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली.



शासनाच्या सूचनेनुसार सोलापूर जिल्ह्यात हा प्रयोगशील उपकूम सुरु करण्यात येत आहे. यासाठी पुढील आठवडयापासून सेतू कार्यालयात व ग्राम पंचयातीच्या ई सेवा केंद्रात शेतकर्यासाठी शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे.

जनसमर्थक या नावाने पिक कर्ज वाटपासाठी प्रशासनच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी शेतकर्यांचे फॉर्मर आयडी, आधार कूमांक, बैंक खाते, मोबाईल क्रमांक आदी संकलीत करुन पात्र असलेल्या शेतकर्यांचा प्रस्ताव संबंधित बँकाकडे पिक कर्जासाठी पाठविण्यात येणार आहे. कागदपत्रांची पडताळणी करुनच बँकेकडे ऑनलाईन प्रणालीने कर्ज प्रकरण जाणार असल्याने बँकांना आता या शेतकर्यांना कर्ज नाकारता येणार नसल्याची माहितीही जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिली. पिक कर्जाची उदिष्टपुर्ती होण्यापुर्वी यापुर्वीच बँकांचा आढावा बैठक घेण्यात आली आहे. खरीप हंगामात पिक कर्ज वाटपही सुरु करण्यात आले आहे. बँकांच्या कर्जवितरणात अधिक पारदर्शकता निमर्ण व्हावी, पात्र शेतकरी कर्जापासून वंचित राहू नये या हेतूने हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

### मतदानाच्या दिवसात बदल करण्याचा प्रस्ताव आयोगाकडे पाठविला

सोलापूर महापालिकासाठी १५ जानेवारी रोजी मतदान घेण्यात येत आहे. मात्र या दरम्यान सोलापूरची गड्डा यात्रा आहे. यात्रेमुळे मतदानावर परिणाम होणार असल्याने मतदानाच्या दिवसात बदल करण्यात यावा अशी मागणी अनेक संघटना व पक्षाकडून करण्यात आली आहे. त्यानुसार हा प्रस्ताव निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात आला आहे. आयोगाकडून याबाबत अद्याप सूचना आले नाहीत असेही जिल्हाधिकारी यांनी यावेळी सांगितले.

सोलापुरातील २२ गृहनिर्माण संस्थेबाबत विधी आयोगाकडून मार्गदर्शन मागविले सोलापुरातील २२ गृहनिर्माण संस्थांच्या जागेचे क्षेत्र हे वनीकरणात आहे. त्यामुळे या गृहनिर्माण संस्थांचा विकास रखडला आहे. याबाबत राज्य शासनाच्या विधी आयोगाकडून मार्गदर्शन मागविण्यात आल्याची माहितीही जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिली.

## जिल्ह्यातील ९४ हजार शेतकऱ्यांनी ६५ हजार ४६४ हेक्टर क्षेत्रावर भरला रब्बी पिकविमा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

जिल्ह्यातील ११ तालुक्यातील ९४ हजार १६१ शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी ६५ हजार ४६४ हेक्टर क्षेत्रावर पिकविमा भरला असल्याची माहिती जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

जिल्ह्यातील ११ तालुक्यात अतिवृष्टीमुळे उशिरा रब्बी पेरणी झाली आहे. सप्टेंबर ते ऑक्टोबर हा कालावधी पेरणी योग्य असताना नैसर्गिक कारणामुळे पेरणीचे उद्दिष्टे पूर्ण करता आले नाही. जिल्ह्यात सिना, भीमा नदिकाठच्या भागात उशिरा पेरणी केली आहे. ज्वारी, कांदा, भुईमूग, सोयाबीन, तूर, मूग, उडीद व इतर पिके सद्य स्थितीमध्ये काढणीसाठी येतात मात्र अजूनही काही भागात हातभर पिके आली आहेत. सध्या ९०% पेरणी झाली असून, अजूनही पेरणी चालूच आहे.



**पिकविमा भरलेली तालुका शेतकरी संख्या**

| तालुका | शेतकरी |
|---|---|
| अक्कलकोट | ५,०३० |
| बार्शी | २२,५९० |
| करमाळा | ७,४६० |
| माढा | ७,२०८ |
| माळशिरस | ५,३१२ |
| मंगळवेढा | ११,६१५ |
| मोहोळ | २,८४७ |
| पंढरपूर | ६०१ |
| सांगोला | २६,१७१ |
| उत्तर सोलापूर | २,८३८ |
| दक्षिण सोलापूर | २,४८९ |
| एकूण | ९४,१६१ |

## जिल्ह्यात ५५ हज़ार ३४३ कुणबी दाखल्यांचे वितरण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

महाराष्ट्र सरकारकडून कुणबी दाखल्यांचे वितरण वेगाने सुरू आहे, विशेषतः मराठा समाजातील ज्यांच्या जुन्या नोंदींमध्ये कुणबी असा उल्लेख आहे; त्यांना हे दाखले मिळत आहेत, सोलापूर जिल्ह्यांमध्येही दाखल्यांचे वितरण झाले असून, या प्रक्रियेला गती देण्यासाठी सरकारी यंत्रणा कार्यरत आहे. आजतागायत जिल्ह्यात ५५ हजार ३४३ कुणबी दाखल्याचे वितरण झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली.

२ सप्टेंबर २०२५ रोजी राज्य सरकारने मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा यांना ओबीसी श्रेणीत समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला. यानंतर सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाने सेवा पंधरवडा उपक्रमही जाहीर केला आहे.

या उपक्रमांतर्गत शासनाच्या नवीन जीआरनुसार मराठा समाजातील पात्र लाभार्थ्यांना कुणबी-मराठा प्रमाणपत्र देण्यासाठी विशेष मोहीम राबवली होती. या काळात अर्जदारांना मार्गदर्शन आणि कागदपत्रांची पडताळणी करण्याची सुविधा शिबिरांमध्येच उपलब्ध करून दिली. हा उपक्रम छत्रपती शिवाजी महाराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षपूर्तीनिमित्त आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जयंतीपासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत चालला.

आजतागायत झालेल्या दाखला वितरणामध्ये कुणबी ५५ हजार १४३, मराठा कुणबी ३१ आणि कुणबी-मराठा १६९ दाखले वितरित झाले आहेत. तर ५२० दाखले कागदपत्रांच्या त्रुटीमुळे व इतर काही कारणास्तव नाकारले आहेत. दरम्यान, हैदराबाद गॅझेटमध्ये येणारी जिल्ह्यात ५८ गावे असून, या गावात अजून एकही दाखला वितरित झाला नाही. महसूल विभाग जुन्या नोंदी (उदा. निजामकालीन कागदपत्रे) तपासून हे दाखले देत आहे, ज्यांना पात्र आहेत त्यांना दाखले मिळत आहेत. या दाखल्यांमुळे मराठा समाजातील काही लोकांना ओबीसी कोट्यातील आरक्षणाचा लाभ मिळणार आहे.

सोलापूरमध्ये कुणबी दाखल्यांच्या संदर्भात सध्या मराठा आरक्षण चळवळीमुळे अनेक नोंदी सापडत आहेत, ज्यात पंढरपूर तालुक्यातील भोसे गावात जुन्या नोंदी आढळल्याचा दावा आहे. तसेच, हैदराबाद गॅझेटमधील नोंदींच्या आधारे सोलापूर जिल्ह्यातील ५८ गावांनाही कुणबी दाखले मिळण्याची आशा आहे, ज्यासाठी तुळजापूर तालुक्यातील नोंदी पुरावा म्हणून ग्राह्य धरल्या जात आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयानेही नोंदी शोधण्यासाठी आणि प्रमाणपत्र वाटपासाठी सुधारित परिपत्रक काढले आहे. जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी सोलापूर विभाग सोलापूर क्र. १ यांच्या अखत्यारित २४ हजार ७६६ दाखले वितरित केली आहेत. उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डुवाडी यांनी ५५ दाखले वितरित केली आहेत.

उपविभागीय अधिकारी , पंढरपूर यांच्याकडे ८६१० दाखले वितरित केले आहेत. उपविभागीय अधिकारी मंगळवेढा यांनी १३८ आणि उपविभागीय अधिकारी माळशिरस विभाग अकलूज यांनी ७६४ दाखले वितरित केले आहेत. एकंदरीत, जिल्ह्यात आजतागायत ५५ हजार ३४३ कुणबी दाखल्यांचे वितरण केल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

## कासेगावात जनसमर्थ पोर्टल अंतर्गत पीक कर्ज शिबीर

**पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने कर्ज वाटप; महाराष्ट्रातून प्रायोगिक तत्त्वावर सोलापूरची निवड**



**तभा वृत्तसेवा,**
**कासेगाव,दि.२५ डिसेंबर-**

यावर्षी सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी व संततधार पावसामुळे पिके वाया गेली आहेत. जमिनीची माती खरडून गेली आहे. शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांना कर्जरूपाने एक आधार मिळावा कमी कालावधीत कमी खर्चात बँकेकडे हेलपाटे न मारता सहज कर्ज उपलब्ध व्हावे म्हणून ऑनलाइन जन समर्थ पोर्टल योजना राबविण्यासाठी दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथे एक दिवशीय शिबिराचे आयोजन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्या हस्ते जिल्हा कृषी अधिक्षक शुक्राचार्य भोसले, दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे व दक्षिण तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे यांच्या उपस्थित करण्यात आले.

यावेळी यावेळी उपस्थित मान्यवरांचा सरपंच यशपाल वाडकर व शेतकऱ्यांकडून सन्मान करण्यात आला. यावेळी उपकृषी अधिकारी पी.सी.निंबाळ, महसूल अधिकारी आरिफ हुडिवाले, ग्रामपंचायत अधिकारी कलाल, हमीद शेख, कृषी सहाय्यक ए. एन.देवकर, विशाल सूर्यवंशी, काशिनाथ गाढवे, लक्ष्मण वाडकर, ताजुद्दीन शेख, केदार ढेकळे, मारुती सरसंबे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले म्हणाले कासेगाव येथील शेतकऱ्यांसाठी चांगली संधी असून शहराकडे न हेलपाटे मारता सहज कर्ज उपलब्ध होणार आहे. दक्षिण तालुक्यातील कासेगाव सह परिसरात अतिवृष्टी झाल्याने पिकाचे नुकसान झाले. शेतकरी अडचणीत आला. शासनाने नुकसान भरपाई दिली. त्याचबरोबर शेतकऱ्याला एक आधार म्हणून अल्पावधीत कमी खर्चात बिगर व्याज पीक कर्ज मिळणार आहे. त्याचा कासेगावातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे यांनी केले. या शिबिरात जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखरडे यांनी कर्ज प्रकरणाविषयी कागदपत्राची माहिती दिली. त्यामध्ये शेतकऱ्यांचा फार्मर आयडी, आधार कार्ड, मोबाईल नंबर, आधार कार्ड बँकेसी लिंक आवश्यक, ई-पिक पाणी, केवायसी, आयएफसी कोड सह बँक पासबुक , सातबारा उतारा आदी कागदपत्रांसह सेतू ग्राहक सेवा किंवा पंचायत समिती मध्ये जाऊन आवेदन पत्र भरणे आवश्यक आहे. या शिबिरास गावातील शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद देऊन ऑनलाईन पद्धतीने प्रकरण दाखल केले. सागर सुतार यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

कासेगाव परिसरात द्राक्ष बागेचे मोठे क्षेत्र आहे. अतिवृष्टीमुळे द्राक्ष बागेत आती पाणी साचल्याने बागेची गर्भधारणा झाली नाही. त्यामुळे बागेचे उत्पादन १०० टक्के घटले आहे. त्यामुळे इतर पिकांप्रमाणे द्राक्ष बागेसाठी नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी कासेगाव येथील द्राक्ष निर्यातदार शेतकरी दशरथ कादे यांनी केली.



## जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेत राष्ट्रीय गणित दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.२४ डिसेंबर-**

गौडगाव बु!! येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आला. संस्थेचे प्रतिनिधी योगीराज हिरेमठ यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी होते. व्यासपीठावर प्रशालेचे माजी विद्यार्थी इसुब शेख, जेऊरवाडीचे सरपंच संदीप राठोड, ज्येष्ठ शिक्षक महेश स्वामी, शरणया हिरेमठ, शिवपुत्र चोले उपस्थित होते. यावेळी अंबिका नागलगाव, अंजली धनशेट्टी, अंजली चव्हाण, कुमारी कुंभार, सुनीता हिंडोळ यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणित सूत्र चार्ट प्रतिकृतीची प्रदर्शन भरवण्यात आले होते. अपार बुद्धिमत्तेची जोरावर त्यांनी गणितीय विश्वास निर्माण केले गणितातील विविध प्रकारचे सूत्रे, प्रमेय, सिद्धांत लिहिले, असे मुख्याध्यापक देशेट्टी यांनी सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारती पोतदार, सुभाष घोडके. मृत्युंजय सालीमठ, लक्ष्मी चौधरी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेतले. पर्यवेक्षक लाडाप्पा शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन काशिनाथ दानशेट्टी यांनी केले. पोपट सोनकांबळे यांनी आभार मानले.

## जिद्द आणि परिश्रमाची 'गगनभरारी' शेळगावची कन्या डॉ.ऋचा गोडगे

**यूपीएससीत देशात ८४ वी**

**बार्शी तालुक्यासह जिल्ह्याचा नावलौकिक**

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि.२५ डिसेंबर-**

बार्शी तालुक्यातील शेळगाव (आर) येथील प्राथमिक शिक्षक दांपत्याच्या कन्येने आपल्या जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर यशाचे उत्तुंग शिखर गाठले आहे. डॉ. ऋचा विष्णू गोडगे हिने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशात ८४ वा क्रमांक पटकावत आयएएस होण्याचे आपले स्वप्न साकार केले आहे. तिच्या या यशाने केवळ बार्शी तालुक्याचाच नव्हे, तर संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचा नावलौकिक वाढला आहे.

डॉ. ऋचा यांचे प्राथमिक शिक्षण शेळगाव (आर) येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. त्यानंतर त्यांनी जवाहर नवोदय विद्यालय, पोखरापूर येथून दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. उच्च शिक्षणासाठी त्यांनी वैद्यकीय क्षेत्राची निवड केली आणि देशातील अग्रगण्य संस्था असलेल्या 'एम्स' रायपूर येथून



एमबीबीएस पदवी संपादन केली. डॉ. ऋचा केवळ अभ्यासातच नव्हे, तर क्रीडा क्षेत्रातही तितक्याच सक्रिय आहेत. त्या टेबल टेनिसच्या राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू असून त्यांनी अनेक स्पर्धांमध्ये घवघवीत यश मिळवले आहे. अभ्यासासोबतच छंद जोपासल्याने एकाग्रता वाढण्यास मदत झाल्याचे त्या सांगतात.

### ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आदर्श

स्पर्धा परीक्षेची तयारी करताना काही काळ त्यांनी घरातून अभ्यास केला आणि नंतर दिल्ली येथे जाऊन विशेष तयारी केली. ग्रामीण भागात राहून, मर्यादित साधनसामग्री असतानाही केवळ सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर डॉ. ऋचा यांनी मिळवलेले हे यश राज्यातील तमाम तरुण-तरुणींसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

शाळेत असल्यापासूनच मी अभ्यासात सातत्य ठेवले. आई-वडील शिक्षक असल्याने त्यांच्याकडून मला नेहमीच प्रेरणा मिळाली. आजचे यश हे माझ्या पालकांच्या कष्टाचे फळ आहे. इतर मुलींनीही जिद्दीने अभ्यास करून आपल्या पालकांचे नाव उज्ज्वल करावे.

**डॉ. ऋचा गोडगे**

### शिक्षक पालकांची प्रेरणा

ऋचा यांचे वडील विष्णू गोडगे आणि आई दीपाली गोडगे हे दोघेही उत्तर सोलापूर तालुक्यात प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी मुलांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करून त्यांना उच्च शिक्षणासाठी सतत प्रोत्साहन दिले. ऋचा यांचा भाऊ हर्षवर्धन हा देखील व्हीआयटी (तखढ), वेल्लोर येथे संगणक अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## समरसता आयामतर्फे जांबमुनी महाराज यांना अभिवादन



**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**
जांबमुनी मोची समाजाचे कुलदैवत श्री जांबमुनी महाराज जयंती दिनानिमित्त विश्व हिंदू परिषदेच्या सामाजिक समरसता आयामतर्फे दि. २२ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता सात रस्ता चौक येथे श्री चे मूर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सोलापूर जनता बँकेचे संचालक व विश्व हिंदू परिषदेचे विशेष संपर्कप्रमुख पुरुषोत्तम उडता,जिल्हा मंत्री संजयकुमार जमादार, विभाग सहमंत्री विजयकुमार पिसे, बजरंग दलाचे अभय कुलथे व कृष्णा देशपांडे, हितेश मालू, प्रवीण जिल्हा, अमित सारोळकर, रमेश बेंबळकर, चन्नाबसवेश्वर सोलापूरे, संतोष बेदरकर, विकास कुलकर्णी आणि सामाजिक समरसता आयाम प्रमुख चंद्रकांत कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी विशेष उपस्थिती जेम्स स्वामी यांची होती. बाबा ग्रुप सामाजिक बहुउद्देशीय संस्थेतर्फे जयंती उत्सव साजरा करण्यात आला. संस्थापक बाबा करगुळे, अध्यक्ष बसवराज घटे, उपाध्यक्ष भीमा बज्जार आणि सागर पुंडा, कार्याध्यक्ष शंकर बट्टी, खजिनदार श्रीकांत गट्टू या सर्वांनी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांचे स्वागत केले व धन्यवाद व्यक्त केले.



# कॉरिडॉरमध्ये विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरातील एकही वीट पडू देणार नाही

**तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे प्रमुख भगीरथ भालके यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ डिसेंबर -**
शहरातील संभाव्य कॉरिडॉर बाबत आम्ही मंदिर परिसरातील स्थानिक लोकांसोबत आहोत. पुर्वी (स्व.) भारतनाना भालके यांनी अभिवचन दिले होते की मंदिर परिसरातील एक वीट ही पडू देणार नाही. हेच वचन पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहोत असे प्रतिपादन विठ्ठल सह.साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष तथ नगरपालिका निवडणूकीतील तिर्थक्षेत्र विकास आघाडीचे प्रमुख भगीरथ भालके यांनी केले.



येथील हिंदू महासभा भवना मध्ये नुकतेच नूतन नगराध्यक्ष डाॅ.प्रणिता भालके तसेच नूतन नगरसेवक ओंकार जोशी, प्रसाद कळसे, लोकेश यादव, आदित्य फत्तेपूरकर यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आलेले होते. त्या प्रसंगी मार्गदर्शन करताना भगिरथ भालके बोलत होते. यावेळी हिंदू महासभेचे अभयसिंह इचगावकर, वैभव बडवे, वैष्णवी बडवे, चिंतामणी उत्पात, श्रीरंग उत्पात, महेश खिस्ते, डॉ प्राजक्ता बेणारे, ज्येष्ठ पत्रकार विलास उत्पात, बालाजी बडवे, व्यंकटेश कुलकर्णी आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी भगीरथ भालके म्हणाले १९८२ साला पासून मंदिर परिसरातील स्थानिक लोकांवर अन्याय सुरू आहे. आधी रस्ता रुंदीकरण करण्यात आले. मग बडवे उत्पात सेवाधारी यांच्या हक्कावर गदा आणली, मंदिरातून बाहेर काढले आणि आता तर त्यांची घरेदारे उध्वस्त करून देशोधडीला लावण्यात येत आहे.विधानसभा निवडणुकीत उमेदवारांनी कॉरिडॉर बाबत दिशाभूल केली. उद्या कॉरिडॉर झाला तर पंधरा हजार कुटुंबे उध्वस्त होणार आहेत, मात्र लोकांना उध्वस्त करून विकास होत नसतो. देऊळ गेले तेव्हा (स्व.) भारतनाना भालके यांनी विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करून बडवे उत्पात सेवाधारी यांची बाजू मांडली होती. कुणाचे चांगले करता येत नसेल तर करू नका पण कोणाचे वाईट देखील करू नका ही शिकवण आम्हाला (स्व.) भारतनाना भालके यांनी दिली. काहीही झाले तरी मी मनापासून तुमच्यासोबत आहे असे आश्वासन देखील यावेळी त्यांनी दिले.

नूतन नगराध्यक्षा डाॅ.प्रणिता भालके मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, मंदिर परिसरातील स्थानिक लोकांच्या अडचणी सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. जातीपातीचा विचार समस्या सोडविताना केला जाणार नाही. आम्ही माणूस हा धर्म, आणि माणुसकी ही जात मानणारी माणसं आहोत. एक चांगले तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूर शहराचे नाव शिर्डी, शेगाव प्रमाणे घेतले जावे, शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा मनापासून प्रयत्न केला जाणार आहे असेही आश्वासन यावेळी त्यांनी दिले.

### डर के आगे जीत है : भालके

नगरपालिका निवडणुकीत सक्षम असणाऱ्या उमेदवारांना विरोधी गटाकडून डावलण्यात आले. त्यांना तिकीट दिले नाही. मात्र त्यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवली आणि निवडून देखील आले. आज जर ते घरी बसले असते तर पुढच्या काळात कोणीही त्यांना विचारले नसते असे मत यावेळी तिर्थक्षेत्र विकास आघाडीचे प्रमुख भगिरथ भालके यांनी अपक्ष नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या अँड.ओंकार जोशी यांचा सत्कार करते वेळी सांगितले.

# टेंभुर्णीच्या गायरान व गावठाणचा प्रश्न मार्गी लावा



**पालकमंत्री गोरे यांनी मागणीची दखल घेऊन दिल्या जिल्हाधिकारी यांना सूचना; विकासकामांचा घेतला आढावा**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२५ डिसेंबर -**
टेंभुर्णीतील गायरान व गावठाण जमीन या प्रलंबित विषयावर सरपंच सुरजाताई बोबडे व भाजपाचे तालुकाध्यक्ष योगेश बोबडे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे लक्ष वेधत सविस्तर चर्चा केली. गांभीर्य लक्षात घेऊन पालकमंत्री गोरे यांनी तत्काळ जिल्हाधिकारी आशीर्वाद व मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांना संपर्क साधून सदर प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक त्या ठोस उपाय करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या तातडीच्या हस्तक्षेपामुळे टेंभुर्णीतील गायरान व गावठाण जमिनीच्या प्रश्नावर लवकरच सकारात्मक निर्णय होण्याची आशा निर्माण झाली आहे. बोराटवाडी (दहिवडी) येथे पालकमंत्री गोरे यांची भेट घेऊन ही चर्चा केल्याचे सरपंच बोबडे यांनी सांगितले. यावेळी गावातील पायाभूत सुविधा, नागरी सोयीसुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच ग्रामीण विकासाशी निगडित विविध योजनांची माहिती देण्यात आली. पालकमंत्री गोरे यांनी कामांबाबत समाधान व्यक्त करत उर्वरित कामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. ही भेट टेंभुर्णी गावाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची व आशादायक ठरली असून, गावाच्या विकासासाठी निश्चितच सकारात्मक ठरेल, असे मत सरपंच बोबडे यांनी व्यक्त केले.




## सुलाखे कॉलेजमध्ये विशेष गुणवत्ता वाढ विकास शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२५ डिसेंबर-**
येथील बी.पी सुलाखे कॉमर्स कॉलेजमध्ये इयत्ता बारावी कला व वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांसाठी दि. १८, १९ व २० या तारखेला गुणवत्ता वाढ व विकास या विषयावर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये इयत्ता बारावी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना त्यांना बारावीला असलेल्या सर्व विषयाचे, तज्ञ मार्गदर्शक शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इयत्ता बारावी बोर्ड परीक्षा २०२६ ला सामोरे जाताना पेपर कसे सोडवावेत, अभ्यास कसा करावा, अवघडातून सोप्याकडे कसे जावे, असे मार्गदर्शन प्रा. फडतरे, प्रा. अर्जुन सुतार, प्रा.डॉ. सुशांत काकडे, प्रा.अंबादास पाटील, प्रा. पोहोळकर व प्रा. वडणे या तज्ञ मार्गदर्शक शिक्षकांनी मार्गदर्शन केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्ता वाढीसाठी त्यांचा नक्कीच उपयोग होईल. वाढीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस.बी करंडे, समन्वयक प्रा. काळे एच.डी, प्रा. पोहोळकर व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.

## आंध्र प्रदेशच्या भक्तांकडून कमला भवानी चरणी देणगी

**करमाळा, दि.२५ डिसेंबर-**
येथील कमलादेवी मंदीर जतन संवर्धन कामास यलमनचिली (आंध्रप्रदेश) येथील कनिका वेंकटेश कट्टा यांच्याकडून दहा हजाराची देणगी प्राप्त झाली. मंदिर समितीचे राजेंद्र वाशिंबेकर, रत्नदीप पुजारी, रामदास सोरटे, भारत सोरटे, अशोक गाठे यांनी त्यांचा सत्कार केला. कुंकु गल्ली



येथील रेखा पांढरे यांच्याकडून १ हजार १२१ रुपये देणगी प्राप्त झाली. जयदीप पुजारी, रघु खटके यांनी सत्कार केला.

# मोहोळमध्ये सत्तेचे त्रांगडे; विकासाचा वनवास पाचवीला पुजलेला

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ,दि.२५ डिसेंबर-**
मोहोळ नगर परिषद निवडणुक निकालानंतर बहुमत भाजपचे तर नगराध्यक्ष शिंदे सेनेचा अशी परिस्थिती झाल्यामुळे पुन्हा मोहोळच्या विकासाच्या माथी वनवास येण्याची शक्यता निर्माण झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

मोहोळमध्ये २० पैकी ११ नगरसेवक भाजपाचे, ८ नगरसेवक शिंदे सेनेचे व १ नगरसेवक उबाठा सेनेचा अशी विभागणी झाली. थेट जनतेतून नगराध्यक्षपदी शिंदे सेनेच्या सिद्धी वस्त्रे या २२ वर्षीय तरुण मुलीने बाजी मारली. भाजपाच्या शीतल क्षीरसागर यांना त्यांनी पराभूत केले. तर उबाठासेना तिसऱ्या क्रमांकावर फेकली गेली. राष्ट्रवादी शरद पवार गट व काँग्रेसचे तर नामोनिशाण सुद्धा राहिले नाही. अजित पवार राष्ट्रवादीने शिंदेसेनेस पाठिंबा दिला होता. शिंदे सेनेचे रमेश बारसकर यांनी माजी आमदार राजन पाटील व उबाठा सेनेचे दीपक गायकवाड यांच्यावर घणाघाती टीका केली होती . एक पालकमंत्री, चार माजी आमदार, एक जिल्हाध्यक्ष अशी टीम रमेश बारसकर यांना पराभूत करण्यासाठी एकत्र आली अशी टीका शिंदे सेनेने केली होती. तर भाजपाने मोहोळचा विकास करावयाचा असेल तर भाजपाला सत्ता द्या असा प्रचार केला होता. परंतु मोहोळकर मतदारांनी आश्चर्यचकित करणारा कौल दिला. या निवडणुकीमध्ये विकासाच्या अजेंड्यावर एकाही पक्षाने भर दिला नाही. केवळ एकमेकावर आरोप करत सभा गाजवल्या. शिंदे सेनेकडून विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपाकडून पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सदाभाऊ खोत, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, दीपक गायकवाड, आमदार सचिन कल्याण शेट्टी, माजी आमदार राजन पाटील आदींनी जाहीर सभा गाजवल्या. २० नगरसेवकाच्या एकूण मतदानामध्ये १०३८ मते शिवसेना पेक्षा जास्त आहेत. म्हणजे १७५०९ मतदानामध्ये भाजपला ५१९ लोकांनी जास्त मतदान केले असून, भाजपा म्हणून नगरसेवकाचे मतदानामध्ये एक नंबरची मते घेऊन ११ नगरसेवक निवडून आले आहेत. प्रत्येक वेळी भाजपाच्या विरोधात असणाऱ्या मुस्लिम समाजाने यावेळी भाजपाला मतदान केले असल्याची जोरदार चर्चा आहे.



| मोहोळ नगरपरिषद राजकीय पक्षनिहाय पडलेले मतदान |
|---|
| **१. भाजपा : १३०८७ (२० उमेदवार).** पडलेली मते- ६१०३. |
| **२.शिवसेना (शिंदे) : १२०४८ (२० उमेदवार).** पडलेली मते ६२७३ |
| **३. शिवसेना (उद्धव ठाकरे) : ७३१९ (१९ उमेदवार).** पडलेली मते ३६५९.५ |
| **४. काँग्रेस : १२४७. (६ उमेदवार).** पडलेली मते ६२३.५ |
| **५.राष्ट्रवादी शरदचंद्र पवार : ७७७ (१० उमेदवार).** पडलेली मत ३८८.५ |
| **६. अपक्ष : २५३ (४ उमेदवार) १२६.५** |
| **७. नोटा : ३०६ व १५३** |
| एकूण : ३५०१८ व १७५०९ |

- राजन पाटील यांनी भाजपात प्रवेश केल्याच्या विरोधात काही प्रमाणात फटका.
- भाजपाच्या प्रचार यंत्रणेत ज्येष्ठ व निष्ठावंत कार्यकर्त्यांचा समावेश केला नाही तर ग्रामीण भागातील व पोरगळ बारगळ कार्यकर्त्यांच्या हातात प्रचार यंत्रणा दिल्याने त्याचा फटका भाजपाला बसला
- २ नगरसेवक वगळता ९ नगरसेवक राजन पाटील गटाचेच विजयी झाल्याचे चित्र स्पष्ट
- मुस्लिम, ब्राह्मण, मागासवर्गीय भाजपा कडे तर लिंगायत मराठा ओबीसी शिंदेसेनेस तर बहुतांश मराठा समाजाने उबाठा ला मतदान केल्याची जोरदार चर्चा नागरिकात सुरू.



# ‘पांडुरंग’ने केले पाच लाख टनाचे गाळप

### चेअरमन परिचारक यांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ डिसेंबर -**
यंदाच्या चालू गळीत हंगामात पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने नुकताच पाच लाख मे.टन ऊस गाळपाचा टप्पा यशस्वीपणे पार केला आहे. हे यश सर्व ऊस उत्पादक शेतकरी बांधव, ऊस तोडणी मजूर, वाहतूकदार, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या अहोरात्र मेहनतीचे फळ आहे असल्याचे प्रतिपादन अध्यक्ष प्रशांत परिचारक यांनी केले.

यावेळी त्यांनी साखर कारखान्यातील ऊस गाळपाची प्रक्रिया, साखरेचा उतारा आणि एकूण कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. कारखान्याची यंत्रणा पूर्ण क्षमतेने सुरू असून शेतकरी बांधवांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत, यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे असे आश्वासन देखील यावेळी प्रशांत परिचारक यांनी देवून ऊस उत्पादक शेतकरी, कामगार आणि वाहतूकदार बांधवांच्या कष्टाच्या जोरावर पांडुरंग कारखान्याचा हा चालू गळीत हंगाम निश्चितच यशस्वी होईल, असा विश्वास देखील यावेळी त्यांनी व्यक्त केला. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी यांच्यासह व्हाईस चेअरमन सर्व संचालक उपस्थित होते.

### बळीराजाचा विश्वास हाच आमचा ध्यास

आपल्या कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सह.साखर कारखान्याने चालू गळीत हंगामात पाच लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचा टप्पा यशस्वीपणे पार केला असून बळीराजाचा विश्वास हाच आमचा ध्यास आहे असे देखील परिचारकांनी सांगितले.

# श्रीपूरच्या ‘कर्मयोगी’स तांत्रिक कार्यक्षमतेचा तृतीय पुरस्कार जाहीर

### यशाच्या उज्वल परंपरेत आणखी एक मानाचा तुरा

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.२४ डिसेंबर-**
श्रीपूर (ता. माळिशरस) येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट मांजरी (पुणे) यांचा गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल तांत्रिक कार्यक्षमतेचा तृतीय पुरस्कार जाहीर झाला असून त्याचे वितरण पुणे येथे दि.२९ डिसेंबर रोजी मान्यवरांच्या हस्ते होणार असल्याची माहिती चेअरमन परिचारक यांनी दिली.

यावेळी व्हा.चेअरमन कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना चेअरमन परिचारक यांनी कारखान्याचे व्हा. चेअरमन कैलास खुळे, संचालक मंडळ व डॉ यशवंत कुलकर्णी व अधिकाऱ्यांनी केलेले उत्कृष्ट नियोजन व तत्परतेमुळे पुरस्कार मिळाला असून पुरस्कार मिळिवण्याची मालिका अखंडित सुरु ठेवली असल्याचे सांगितले. तर कार्यकारी संचालक डॉ.कुलकर्णी यांनी कारखान्याचे चेअरमन परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व संचालक अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने हा पुरस्कार मिळाला असून या पुरस्कारासह आजपर्यंत कारखान्यास राज्य व देश पातळीवरील ६१ पुरस्कार प्राप्त झाले असल्याचे सांगितले.





गळीत हंगाम २०२४-२५ कारखान्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. या हंगामात कारखान्याने ८ लाख १ हजार १५१ मे. टन ऊस गाळप करून ७.६४ लाख क्विंटल साखर उत्पादित केली असून ११ टक्के साखर उतारा मिळवला आहे. कारखान्याच्या तांत्रिक कार्यक्षमतेचा पुरेपूर वापर करून कारखान्याने या हंगामात अखेरपर्यंत उसाचे गाळप करून कमीत कमी लॉसेस ठेवून विनाखंड गाळप केले. वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट मांजरी बु.पुणे यांनी कारखान्याच्या गाळप क्षमतेत वाढ, साखर उताऱ्यात वाढ, कमीत कमी लॉसेस, स्टीमचा कमीत कमी वापर, जास्तीत जास्त वीज एक्स्पोर्ट, कारखाना बंदचे प्रमाण खूपच कमी इत्यादी मध्ये उल्लेखनीय काम केल्यामुळे कारखान्यास राज्य पातळीवरील तांत्रीक कार्यक्षमतेचा तृतीय पुरस्कार दिला आहे. राज्यपातळीवर पुरस्कार मिळालेबद्दल कारखान्याचे चेअरमन परिचारक व व्हा. चेअरमन कैलास खुळे यांनी कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी व अधिकारी वर्गाचे, कर्मचारी वर्गाचे अभिनंदन केले.

यावेळी संचालक दिनकरराव मोरे, दिलीपराव चव्हाण, उमेशराव परिचारक, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, बाळासाहेब यलमर, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैरू वाघमारे, गंगाराम विभुते, सुदाम मोरे, विजय जाधव, हनुमंत कदम, किसन सरवदे, दिलीप गुरव, शामराव साळुंखे, राणू पाटील, दाजी भुसनर आदीसह कारखान्याचे अधिकारी उपस्थित होते.

कारखान्याचे ऊस उत्पादक सभासद शुक्राचार्य खंडू गवळी मु.पो.भाळवणी ता.पंढरपूर यांना मध्य विभागात हेक्टरी २५५.०२ मे.टन ऊस उत्पादन केल्यामुळे वसंतदादा शुगर इन्स्टीट्युटचा ऊस भुषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

# मोहोळ येथे रविवारी प्रज्ञा मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२५ डिसेंबर-**
मोहोळ येथे २८ डिसेबर रोजी दुसऱ्या प्रज्ञा मराठी साहित्य संमेलना चे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजक अॅड. आकाश कापुरे यांनी दिली. लोकसेवा हॉल येथे होणाऱ्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद धर्मकीर्ती महाराज परभणीकर हे भूषवणार आहेत.

उद्घाटन बहुजन शिक्षण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर हे करणार आहेत. स्वागताध्यक्ष नंदकुमार फाटे हे राहणार असून कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रकाश गव्हाणे, काँग्रेस महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा शाहीन शेख, स्वराज्यवादी बहुजन महासंघाचे अध्यक्ष विशाल लोंढे, डॉ.किरण पराग हे उपस्थित राहणार आहेत. या संमेलनाच्या दुसऱ्या सत्रामध्ये संत कबीर यांच्या साहित्याची विविध पैलू या विषयावर ह.भ.प.सूर्याजी भोसले हे मांडणी करणार आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यापीठ सोलापूरचे पाली भाषा विभाग प्रमुख विजयकुमार झुंबरे, संत साहित्याचे अभ्यासक गजानन वाघमारे, डॉ.स्मिता पाटील आदि उपस्थित राहणार आहेत. तिसऱ्या सत्रामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते विशाल विमल यांची मुलाखत घेण्यात येणार आहे. चौथ्या सत्रामध्ये कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून या सत्राचे अध्यक्ष हृदय मानव अशोक हे भूषविणार आहेत. अनुराधा पंडित, विमल माळी, अनिल राऊत, शंकर माने, बाळासाहेब जाधव, सिकंदर मुजावर, कुमार ढवळे, अभिजीत गायकवाड, तन्मय ननवरे, बाबा लोंढे, दादासाहेब खरात, स्वाती बंगाळे, सुभाष पाटील आदी सहभागी होतील. संमेलन अध्यक्ष धर्मकीर्ती महाराज परभणीकर हे असतील. समारोपीय अध्यक्ष अमोल वाघमारे राहतील. भारतीय बौद्ध महासभा मंगळवेढ्याचे अध्यक्ष विठ्ठल सरवदे, सुलतान भाई शेख उपसरपंच शेजबाभळगाव हे उपस्थित राहणार आहेत. बाबासाहेब सुतकर, ॲड प्रेमनाथ सोनवणे, कुमार ढवळे ,ॲड आकाश कापूरे, संजय आठवले, शशिकांत ठोकळे, अशोक पाचकुडवे, सुनिल गायकवाड, धर्मराज चवरे, सुधाकर काशीद, प्रज्ञा साहित्य मंडळ, युवा जागृती मंच, पंचाशिल मंडळाचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.